रविवार, 28 ऑगस्ट 2022
⊙ किंमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - 02 ⊙ अंक - 31
Title Code : MAHMAR51117

# आधुनिक केसरी

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● SUNDAY 28 AUGUST 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-31 ● TITLE CODE : MAHMAR51117 ● PAGE-14 ● PRICE-5

# पुन्हा इतिहासाची पुनरावृत्ती होणार

## आज दुबई आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर भारत आणि पाकिस्तान यांच्यात महालढत





आधुनिक केसरी न्यूज

**दुबई : युएईमध्ये आशिया कप स्पर्धेला शनिवारपासून सुरुवात झाली. आज दुबई आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर भारत आणि पाकिस्तान यांच्यात महालढत होणार आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामन्याचा एकही क्षण क्रिकेट विश्वात कोणी चुकवत नाही. त्यामुळे आशिया चषक स्पर्धेत भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामना संध्याकाळी ७ वाजता सुरु होणार आहे. बऱ्याच कालावधीनंतर भारत आणि पाकिस्तान हे दोन्ही देश आमने सामने आले आहेत. या स्पर्धेत मात्र दोन्ही संघांना मोठे धक्के बसले आहेत. कारण या स्पर्धेत भारताचा वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह खेळणार नाही, त्याचबरोबर दुखापतीमुळे हर्षल पटेलही या स्पर्धेत खेळू शकणार नाही. पाकिस्तानच्या संघाला तर शाहिन आफ्रीदीच्या रुपात मोठा धक्का बसला आहे. कारण आफ्रिदी हा संघाचा मख्य वेगवान गोलंदाज होता. त्यामुळे आफ्रिदी खेळणार नसल्यामुळे आता पाकिस्तानच्या संघात त्याची जागी कोण घेणार, याची उत्सुकता सर्वांना असेल.**


हा सामना चाहत्यांसाठी तसेच खेळाडूंसाठी खूपच रोमांचक असतो. या सामन्यात दोन्ही संघांच्या खेळाडूंना कोणत्याही किंमतीत सामना जिंकायचा असतो. भारत-पाकिस्तान सामन्यात खेळाडू बाद झाला तरी प्रेक्षक रडू लागतात. अगदी भावनिक नाते असलेला हा सामना पाहणं क्रिकेटप्रेमींसाठी एक पर्वणी असते. आशिया चषक स्पर्धेवर आतापर्यंत १४ पैकी सर्वाधिक ७ वेळा भारताने वर्चस्व गाजवले आहे. याशिवाय श्रीलंकेने ५ वेळा आणि पाकिस्तानने २ वेळा जेतेपद पटकावले. बांगलादेशने ३ वेळा अंतिम फेरी गाठूनही अद्याप एकदाही ही स्पर्धा जिंकलेली नाही. २०१८मध्ये संयुक्त अरब अमिरातीत झालेल्या याआधीच्या अशिया चषक (५० षटकांच्या) स्पर्धेत अखेरच्या चेंडूवर भारताने बांगलादेशवर तीन गडी राखून निसटता विजय मिळवला होता. त्यावेळी केदार जाधवने लेगबायद्वारे काढलेली एक धाव भारतासाठी निर्णायक ठरली होती. यंदाच्या स्पर्धेच्या कार्यक्रमपत्रिकेनुसार, अ-गटात भारत, पाकिस्तान, हाँगकांगचा आणि ब-गटात अफगाणिस्तान, बांगलादेश, श्रीलंकेचा समावेश आहे. साखळी सामन्यांनंतर प्रत्येक गटातून दोन अव्वल संघ दुसऱ्या फेरीसाठी (सुपर फोर) पात्र ठरतील. त्यामुळे अ-गटातून भारत, पाकिस्तान यांची आगेकूच निश्चित असली, तरी ब-गटातून दुसरी फेरी गाठणारे दोन संघ कोणते, हे सांगणे कठीण आहे.

श्रीलंकेला आशिया चषकाचे यजमानपद देण्यात आले होते. परंतु २०२०मध्ये करोनामुळे ही स्पर्धा लांबणीवर पडली. मग श्रीलंकेतील राजकीय आणि आर्थिक अराजकतेमुळे श्रीलंकेऐवजी संयुक्त अरब अमिरातीला यजमानपद बहाल करण्यात आले. आशिया चषक स्पर्धा ही एकदिवसीय प्रकाराची म्हणजेच ५० षटकांची खेळवण्यात येते. परंतु ऑस्ट्रेलियात ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये होणाऱ्या ट्वेन्टी-२० विश्वचषक स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर ती ट्वेन्टी-२० प्रकाराची खेळवण्याचा निर्णय आशियाई क्रिकेट परिषदेने घेतला. याआधी याच कारणास्तव २०१६मध्ये आशिया चषक स्पर्धा ट्वेन्टी-२० प्रकाराची खेळवण्यात आली होती.

नियमित कर्णधार
रोहित शर्मा, दुखापतीतून सावरलेला उपकर्णधार केएल राहुल आणि माजी कर्णधार कोहली या त्रिकुटावर भारताच्या फलंदाजीची प्रमुख भिस्त असेल. ट्वेन्टी-२० प्रकारात छाप पाडणारा आणि शतक नोंदवणारा सूर्यकुमार यादवच्या कामगिरीकडेही आशेने पाहिले जात आहे. ऋषभ पंत, दिनेश कार्तिक, हार्दिक पंड्या, रवींद्र जडेजा सामन्याचे चित्र पालटण्यात वाकबदार आहेत. भुवनेश्वर कुमार, अर्शदीप सिंग, आवेश खान आणि हार्दिक वेगवान माऱ्याची धुरा सांभाळतील. तसेच अश्विन, यजुर्वेंद्र, जडेजा, बिश्नोई हे फिरकी गोलंदाज संघात आहेत.

## महत्त्वाची बातमी

### देशाच्या सरन्यायाधीशपदी न्यायमूर्ती यू.यू. ललीत



आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** न्यायमूर्ती यू. यू. लळीत यांनी आज देशाचे सरन्यायाधीश म्हणून शपथ घेतली. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी त्यांना सरन्यायाधीशपदाची शपथ दिली. राष्ट्रपती भवनात शपथविधी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. न्यायमूर्ती लळीत हे भारताचे ४९ वे सरन्यायाधीश बनले आहेत. या शपथविधी सोहळ्यास उपराष्ट्रपती जगदीप धनखर, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि इतर अनेक केंद्रीय मंत्री उपस्थित होते.

नवे सरन्यायाधीश न्या. उदय लळीत यांचा कार्यकाळ तीन महिन्यांपेक्षाही कमी असणार आहे. ८ नोव्हेंबर रोजी ते निवृत्त होणार आहेत. या दरम्यान महाराष्ट्रातील सत्तासंघर्षासह इतर महत्त्वांच्या प्रकरणांचा निकाल लागणार का याकडे सगळ्यांच लक्ष लागलं आहे.

“प्रत्येक प्रकरणांच्या यादीत पारदर्शकता आणण्याचा माझा प्रयत्न असेल. तसेच तातडीची प्रकरणे संबंधित खंडपीठांसमोर मुक्तपणे मांडता येतील यासाठी प्रयत्न करणार असून वर्षभर चालेल, असे एक घटनापीठ बनवण्याची इच्छा त्यांनी वयक्त केली.

**लळीत यांच्या घराण्यात पिढीजात वकिली**

न्या. लळीत यांचा जन्म ९ नोव्हेंबर १९५७ रोजी सोलापूरमध्ये झाला. न्यायमूर्ती लळीत यांच्या घराण्यात वकिली पिढीजात चालत आलेली आहे. ललित यांचे आजोबा रंगनाथ ललित हे स्वातंत्र्यापूर्वी सोलापुरात वकील होते. न्यायमूर्ती यू यू ललित यांचे ९० वर्षीय वडील उमेश रंगनाथ ललित हे देखील व्यावसायिक वकील आहेत. नंतर त्यांनी उच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून काम पाहिले. याशिवाय न्यायमूर्ती ललित यांना हर्षद आणि श्रेयश ही दोन मुले असून त्यांनी अभियांत्रिकीचे शिक्षण घेतले आहे. मात्र, नंतर श्रेयश ललितने कायद्याचे शिक्षण घेतले आहे. त्यांची पत्नी रवीनाही वकील आहे.

## ...तर महागाई नियंत्रणात आली असती

### केजरीवालांचा भाजपाला टोला, जीएसटीवरुन साधला निशाणा

आधुनिक केसरी न्यूज



**नवी दिल्ली :** आम आदमी पक्षाचे संयोजक आणि दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी महागाईवरून भाजपा सरकारला लक्ष्य केले आहे. सरकार पाडण्यासाठी ६ हजार ३०० कोटी खर्च केले नसते तर देशातील महागाई नियंत्रणात आली असती, असे केजरीवाल यांनी म्हटले आहे. दही, ताकासह जीवनावश्यक वस्तूंवर लादलेल्या जीएसटीवरूनही केजरीवाल यांनी भाजपा सरकारला धारेवर धरले आहे.

गहू, तांदुळ, दही, ताक, मधावर लादण्यात आलेल्या जीएसटीतून सरकारला वर्षाकाठी ७ हजार ५०० कोटींचा महसूल मिळणार आहे. तर आत्तापर्यंत सरकार पाडण्यासाठी सरकारने ६ हजार ३०० कोटींचा खर्च केला आहे. सरकार पाडण्याचा प्रयत्न झाला नसता तर जीवनावश्यक वस्तूंवर जीएसटी लादण्याची वेळ आली नसती. जनतेला महागाईचा सामना करावा लागला नसता, असा संताप ट्वीट करत केजरीवाल यांनी व्यक्त केला आहे.

दिल्लीचे उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांच्या निवासस्थानावरील सीबीआय छापेमारीवरुनही केजरीवाल यांनी भाजपा सरकारला खडेबोल सुनावले आहेत. सीबीआयने १४ तास सिसोदिया यांच्या घरावर छापेमारी केली. यादरम्यान त्यांना दागिने, रोख रक्कम किंवा संपत्तीचे कुठलेही दस्तावेज आढळून आले नाहीत. सीबीआयने खोट्या माहितीच्या आधारे ही छापेमारी केली होती, असे केजरीवाल यांनी म्हटले आहे.

गुजरात विधानसभा निवडणुकीपूर्वी केंद्र सरकारकडून आम आदमी पक्षाच्या नेत्यांविरोधात खोटे खटले रचले जात असल्याचा आरोपही केजरीवाल यांनी केला. दिल्लीतील ‘आप’चे सरकार लोकप्रिय आहे. या सरकारविरोधात देशविरोधी शक्ती एकत्रित आल्या आहेत. या शक्तींना आम्हाला तोडायचे आहे. मात्र, आमचे सर्व आमदार एकसाथ आहेत. गुजरात निवडणुकीपर्यंत आमच्यावर खोटे खटले दाखल होत राहणार आहेत, असा आरोप केजरीवाल यांनी केला आहे.



## इंडिगोचे चेन्नई-दुबई विमान बॉम्बने उडवण्याची धमकी

आधुनिक केसरी न्यूज

चेन्नई : इंडिगो कंपनीचे चेन्नईहून दुबईला जाणारे विमान बॉम्बने उडवून देण्याची धमकी आल्याने मोठी खळबळ उडाली होती. या धमकीमुळे या विमानाच्या उड्डाणाला तब्बल सहा तासांचा उशीर झाला. त्यामुळे प्रवाशांना मोठा मनस्ताप सहन करावा लागला.

इंडिगो ही सर्वसामान्यांच्या खिशाला परवडेल अशी विमान सेवा देणारी कंपनी आहे. या धमकीबाबत माहिती देताना कंपनीकडून सांगण्यात आले की, विमान उडवून देण्याची धमकी आली होती. पण या धमकीनुसार धोक्याची शहानिशा केल्यानंतरच विमानाला टेकऑफची परवानगी देण्यात आली.

प्रोटोकॉलनुसार, इंडिगोचे विमान 6E 65 जे चेन्नईहून दुबईला जाणार होते ते विमान उडवून देण्याची धमकीचा कॉल आल्याने त्याच्या उड्डाणाला उशीर झाला. यानंतर प्रोटोकॉलनुसार विमान रिमोट बे मध्ये नेण्यात आले. त्यानंतर या धमकीची शहानिशा करण्यात आली. त्यानंतर सहा तासांनंतर या विमानाने चेन्नईहून उड्डाण केले, असे कंपनीकडून सांगण्यात आले.

## नेता म्हणून मिरवलो नाही : संभाजीराजे छत्रपती



आधुनिक केसरी न्यूज


**मुंबई :** संभाजीराजे छत्रपती यांचे नेतृत्व आम्हाला मान्य नाही, अशी भूमिका मराठा क्रांती मोर्चाने घेतली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत सह्याद्री अतिथीगृहावर मराठा आरक्षणासंदर्भात झालेल्या बैठकीनंतर त्यांनी ही भूमिका मांडली. यानंतर मी कधीही स्वतःहून हे नेतृत्व स्वीकारले नाही. नेता म्हणून मिरवले नाही. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या शिकवणीप्रमाणे समाजाचा एक सेवक म्हणूनच कार्यरत राहिलो व यापुढेही राहीन. समाजासाठीचा माझा हा लढा मराठा समाजाला आरक्षण मिळेपर्यंत सुरूच राहील, अशी प्रतिक्रिया संभाजीराजे छत्रपती यांनी दिली.

संभाजीराजे आमचे नेतृत्व करू शकत नाही. ते गादी आहेत त्या गादीचा आम्ही मान ठेवतो. परंतु, त्यांच्या आजूबाजूचे जे लोक आहेत त्यांनी स्वतःच्या राजकीय महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्यासाठी डाव रचला आहे, असे औरंगाबादेत माध्यमांशी बोलताना मराठा क्रांती मोर्चाचे पदाधिकारी म्हणाले होते. त्यानंतर संभाजीराजे छत्रपती यांनी नुमद प्रतिक्रिया फेसबुक पोस्टमध्ये लिहिली आहे.

मराठा आरक्षण रद्द झाल्यानंतर समाजाचे नुकसान होऊ नये यासाठी आम्ही सरकारकडे काही मागण्या केल्या होत्या. त्यासाठी आझाद मैदानात बेमुदत उपोषणही केले होते. तत्कालीन नामदार एकनाथ शिंदे यांनी उपोषणस्थळी येऊन जी आश्वासने दिली होती ती आता मुख्यमंत्री म्हणून नैतिक जबाबदारीने पूर्ण करावीत. असे निवेदन त्यांना दिले होते, असे संभाजीराजे यांनी फेसबुक पोस्टमध्ये लिहिले आहे.

नियुक्त्यांचा विषय मार्गी लागला. हे त्या उपोषणाचेच यश आहे. समाजाच्या याच मागण्यांसाठी त्यांनी बैठक बोलाविली होती. बैठकीत सारथी संस्थेची स्वायत्तता, समाजासाठी अनेक योजना असे विषय मार्गी लागले. मात्र, बैठकीत काही लोकांनी शिष्टाचार पाळला नाही. मुद्द्यांवर बोलण्यापेक्षा काही जणांनी भर बैठकीत एकमेकांवरच पातळी सोडून वैयक्तिक टिप्पणी केल्याने मी शांततेचे आवाहन केले. मात्र, हा प्रकार वारंवार होत राहिल्याने समाजाच्या मुद्द्यांवर बोलण्यापेक्षा तुमचे हेच चालू राहणार असेल, तर अशा पातळीहीन बैठकीत बसण्यापेक्षा मीच बाहेर जातो, तुमचं चालुद्या; अशी भूमिका मला घ्यावी लागली. मी कधीही कुणाचा आवाज दाबणे शक्य नाही. परंतु, समाजाच्या नावाने उभे राहत असताना पातळीहीन वागून कुणी समाजाची नाचक्की करणार असेल, तर ते देखील मी सहन करू शकत नाही, असेही संभाजीराजे यांनी लिहिले आहे.

## उगवतीचे रंग



विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# जहाँ डाल डाल पर...

आधुनिक केसरी

भारतीय स्वातंत्र्याचा आपण नुकताच अमृतमहोत्सव साजरा केला. घराघरांवर तिरंगा डौलाने आणि अभिमानाने फडकत होता. या दिवशी अनेक ठिकाणी देशभक्तीपर गाणी लावली गेली होती. एका ठिकाणी सिंकदर-ए-आजम या चित्रपटातील मो. रफी यांनी गायिलेले ' जहाँ डाल डाल पर सोने की चिडिया करती हैं बसेरा, वो भारत देश हैं मेरा ' हे गाणी कानावर पडलं. अंगावर रोमांच उभे राहिले. मन विचार करता करता भूतकाळात गेलं. खरंच एके काळी माझा देश सोने की चिडिया होता, सोन्याची खाण होता. तो सुवर्णकाळ होता. सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवावा असा इतिहास होता. माझ्या पूर्वजांचा अभिमान वाटावा असा गौरवशाली इतिहास होता.
श्रीमंत असणारं सोरटी सोमनाथ देवालय आणि परिसर, देवगिरीच्या यादव राजांचा परिसर, हंपी आणि विजयनगर येथील समृद्ध राज्य, दक्षिण भारतातील मदुराई, पद्मनाभ आदी ठिकाणची आधुनिक स्थापत्यशास्त्रालाही आव्हान देतील अशी मंदिरं, गुजरात, सौराष्ट्र, उत्तर प्रदेश, हिमालयातील केदारनाथ, बद्रीनाथ आदी मंदिरं हे सगळं भारताचं वैभव होतं आणि आहे. सोरटी सोमनाथाचं मंदिर गुजरातमधील वेरावळ या प्राचीन बंदराजवळ आहे. येथून भारतीय व्यापारी आपला माल परदेशात विक्रीसाठी घेऊन जात असत. परदेशातील व्यापारी खरेदीसाठी या बंदरात उतरत. सोमनाथ मंदिरामुळे या क्षेत्राला प्रसिद्धी मिळाली होती. तसेच व्यापारामुळे हा प्रदेश संपन्न होता. या सोमनाथच्या मंदिरावर गझनीच्या महंमदाने अनेक स्वाऱ्या करून येथील अमाप संपत्ती लुटून नेली. महमंद गझनी केवळ एवढे लूटूनच थांबला नाही तर हिमालयाच्या उतरणीवर असलेले नगरकोटमधील पवित्र देवालय त्याने लुटले. त्यावेळी लाहोर भारतातच होते. लाहोर, कनौज, मथुरा, ग्वाल्हेर आदी ठिकाणी स्वाऱ्या करून तेथील देवालये उध्वस्त करून अमाप संपत्ती त्याने लुटून नेली. प्राचीन भारतीय पराक्रमी राजांची परंपरा भारतात आहे. मौर्य साम्राज्य, गुप्त साम्राज्य, विजयनगर साम्राज्य, देवगिरीचे यादव सम्राट अशा कितीतरी राजांनी आणि राजघराण्यांनी भारताचा गौरव वाढवला आहे. परंतु भारतातील राजांमध्ये असलेले आपसातील हेवेदावे, असूया, मत्सर इ गोष्टींचा फायदा परकीय आक्रमकांनी वेळोवेळी करून घेतला. भारताच्या अस्मितेवर घाला घातला आणि प्रचंड संपत्ती लुटून नेली. पण या ठिकाणी आपल्याला विचार करायचा आहे तो भूतकाळातील वैभवशाली भारताचा. इतिहास समजून घेतल्याशिवाय वर्तमानात जगता येत नाही आणि भविष्यकाळाची आखणी करता येत नाही. फक्त इतिहासाचे गोडवे गाऊन भागत नाही. त्यापासून बोध घ्यावा लागतो, प्रेरणा घ्यावी लागते. देशाला प्रगतीपथावर न्यायचे असेल हा इतिहासाचा जागर आवश्यक ठरतो. **(क्रमशः)**



## आनंदी पहाट

# देखल्या देवाला दंडवत

आधुनिक केसरी

देखल्या देवाला दंडवत घालण्याची प्रथा देखील पूर्वापार चालत आलेली आहे. रस्त्याने चालताना, वाहनांतून प्रवास करताना अनेकदा चौकात रहदारी अडवणाऱ्या देवळातील देवाला देखील नमस्कार करायचे सोपस्कार केले जाताना आपण अनेकदा पाहतो. देखल्या देवाला दंडवत घालणाऱ्या ह्या भक्तांची नमस्कार करण्याची तऱ्हा बघितली तर, बघणारी व्यक्ती नक्कीच अचंबित होईल, अशाच त्या तऱ्हा असतात. काही शहरांमध्ये चौकाचौकात निरनिराळ्या देवांची छोटी देवळे असतात, वाहनांतून प्रवास करताना, त्या प्रत्येक देवाला घाईघाईने नमस्कार करण्याची धडपड आणि केविलवाणी धावपळ सुरु असते. शांतपणे कोणत्याही एकाच देवाला, परंतू शास्त्रोक्त नमस्कार करण्यासाठी ह्याच मंडळींना वेळ मिळत नाही, हीच उणिव म्हणावी लागेल.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

ईतर कोणत्याही नमस्कारापेक्षा राजकीय नमस्काराला राजकारणांत अनन्यसाधारण महत्व असते. ह्याबाबतीत तर जेष्ठ व्यक्ती देखील जेव्हा त्यांच्यापेक्षा वयाने, अनुभवाने, कार्याने, शिक्षणाने लहान असलेल्या, परंतू राजकीय पक्षांत घराणेशाहीमुळे एखादे स्थान मिळवलेल्या असतात, त्यांच्यापुढे नतमस्तक होतात, तेव्हा तो नमस्कार चमत्कारिक वाटतो. केवळ प्रचार आणि लाचार ह्याच दोन बाबी ह्या नमस्कारात सामावलेल्या असतात. नेत्यांचे नमस्कार तर अनेकदा केवळ निवडणुकींच्या मतापुरतेच असतात, हे अनेकांच्या बाबतीत आपण अनुभवतो. निवडणुकीपूर्वी हे नेते मतदारांना नमस्कार करताना दिसत असतात, तर निवडून आल्यावर त्याच नेत्यांना सतत नमस्कार करून, काहीवेळा नतमस्तक होऊन भेटावे लागते. केवळ एका मतासाठी केलेला नमस्कार किती मोलाचा असतो ते फक्त एखादा नेताच जाणू शकतो. केवळ एका नमस्काराने पाच वर्षांची सत्ता उपभोगणे हेच ज्याचे उद्दिष्ट असते, त्यांना त्यांच्या कर्तव्याची आणि जबाबदारीची जाणीव आपण करून देणारच नाहीत का?

## संस्कार धन



सौ.मंगला चौरे
संपर्क क्र. 9422711515

भाग-36

# वलय...

आधुनिक केसरी

शांत स्थिर पाण्यात खडा टाकला की त्यावर वलय निर्माण होते. सुरुवातीला ते लहान असतात. मग हळूहळू ते मोठे होत जाऊन संपूर्ण पाण्याचा पृष्ठभाग व्यापून घेतात. तसेच आपल्या जीवनाचे आहे. आपल्याभोवती एखादे वलय निर्माण झाले की आपल्याला अंतर्बाह्य व्यापून घेते. जसे की आपले नाव ठेवताना आई-वडील खूप विचारपूर्वक ते नाव ठेवतात. जेणेकरून त्या शुभ नावाचे वलय आपल्या भोवती तयार होईल व आपले जीवन सुखकर होईल. उदाहरणार्थ जया, यश, कीर्ती किरण, सुरज, विजय, जय, शुभदा, श्री, विजय, श्री कृष्णा, गणेश, महेश, अर्जुन, राम, कैवल्य, ज्ञानेश्वर, अरविंद, करुणा, दया, स्वामी इत्यादी इत्यादी. असे कितीतरी सुंदर सुंदर नाव आहेत. त्या नावात खूपच सुंदर अर्थ दडलेला आहे. नाव विचारपूर्वकच ठेवावे. जेणेकरून मुलांभोवती ते वलय निर्माण होईल. काही लोकांच्या भोवती राजकारण-समाजकारणाचे वलय असतात. तर काहींना अध्यात्मिक वलय असतात. जसे वलय वाढत जातात तसे आपले कार्य वाढणारे असावे. घर, संसार, नोकरी, मित्र याही पलीकडे आणखी जग आहे याचे भान आपल्याला असावे. याची जाणीव आपण मुलांनाही करून द्यावी. आपण काय करणार होतो काय करत आहोत आणि काय केले पाहिजे याचे भान असावे. बेभान होऊन कधीच वागू नये. आपले भान सुटले की मुले बेभान होतात. घर, संसार, नोकरी, मित्र, नातलग हे सांभाळत असताना इतरही समाजकार्य करावे, जेणेकरून सेवानिवृत्तीनंतर समाजसेवेचे आपल्याकडे कार्य असेल. सेवानिवृत्तीनंतर किती पैसे मिळणार यापेक्षा समाजसेवा किती झाली याचेही एकदा सिंहावलोकन व्हावे. जगण्यासाठी पैसा सुद्धा लागतो पण तो आपल्या कष्टाचा असावा. नात्यांचे, मैत्रीचे, प्रेमाचे सुंदर वलय आपल्याभोवती निर्माण करूया...

# धैर्य धरा!

आधुनिक केसरी

२० वर्षात मेहनत करून कमावलेले एका वर्षात ९०% पेक्षा जास्त गमवावे लागते.
शिवाय स्वतःचे आणि कुटुंबाचे आयुष्य पणाला लागून कॉम्पिटिटर च्या समोर जाऊन उभं रहावं लागतं.
कॉम्पिटिटर पुढील सहा महिने हजार किलोमीटर दूरवर स्वतःच्या लोकेशन पासून दूर ठेवतो आणि त्या तरुणाला संपवण्याचा प्लॅन करतो. केवढा धक्का! केवढं फ्रस्ट्रेशन!! केवढा सेटबॅक!!!
तो ३६ वर्षांचा तरुण आत्महत्या करत नाही... त्या ही परिस्थितीत मनोधैर्य उंचावून आधी त्याची टीम बाहेर काढतो आणि मग स्वतः कॉम्पिटिटरच्या जाचातून सुटका करवून घेतो. पेशन्स ठेवत कंसिस्टंट मजल मारत स्वतःच्या लोकेशनवर पोहोचतो आणि २० वर्षांच्या मेहनतीने उभारलेले जे गमावलं होतं ते पुढील फक्त १ वर्षात पुन्हा कमवतो इतकंच नाही तर कॉम्पिटिटर ला हि मोठे तडाखे देतो..
फ्रस्ट्रेशनचा उपाय सुसाईड नाही तर क्वांटम लीप मध्ये शोधणारा तो ३६ वर्षीय तरुण : "छत्रपती शिवाजी महाराज"
आणि तो झालेला सेटबॅक म्हणजे पुरंदर चा तह ज्यात ९०% किल्ले छत्रपतींनी त्या औरंग्याला दिले. चार पाच पावले मागे आले म्हणणे नव्हे तर २० वर्षे मागे गेले आणि पुढच्या ८ वर्षात ३६० किल्ले केले.

**क्वांटम लीप**
**गरुड भरारी**
**हीच असते**

निराश होऊन धोकादायक पाऊल टाकण्या आधी शिवस्मरण करणे छत्रपतींचा आदर्श समोर ठेवणे ही आज काळाची आणि परिस्थितीची गरज आहे.

# "निरुपण"

आधुनिक केसरी


**इष्टाविशिष्टमतयोऽपिययादयार्द्र-**
**दृष्ट्यात्रिविष्टपपदं सुलभं लभन्ते ।**
**दृष्टिःप्रहृष्टकमलोदरदीप्तिरिष्टां**
**पुष्टिं कृषीष्टममपुष्करविष्टरायाः** ॥९॥

विशिष्ट बुद्धि संपन्न माणसे जिचे प्रीतिपात्र होऊन तिच्या दयादृष्टीच्या प्रभावाने स्वर्गपद सहज प्राप्त करून घेतात, त्या पद्मासना पद्मेची विकसित कमलाच्या उदरासमान असणारी कान्तीमती दृष्टी मला मनोवांछित पुष्टी प्रदान करो.



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

# कारणावाचून आनंद, तो खरा



आधुनिक केसरी

जगण्यामध्ये काहीतरी आनंद असला पाहिजे. जगणे हे आनंददायक आहे, मग आपल्याला दुःख का होते ? म्हणजे, मनुष्य आनंदासाठी जगतो, आणि दुःख करतो. याचे कारण असे की, आपण कशाकरिता काय करतो हेच विसरतो. मनुष्य आनंदासाठी न जगता वस्तूसाठी जगतो. वस्तू ही सत्य नसल्यामुळे तिचे रूप अशाश्वत असते. अर्थात तिच्यापासून मिळणारा आनंद हा देखील अशाश्वत असतो.
मी आनंदात राहावे असे प्रत्येकाला वाटते; म्हणजेच भगवंताकडे जावे असे वाटते, कारण भगवंत आनंदस्वरूपच आहे.
आपल्याला अशी एक सवय लागली आहे की, काहीतरी कारणाशिवाय आपण आनंद भोगूच शकत नाही. प्रत्यक्ष कारण सापडत नसेल तर आपण आपल्या कल्पनेचे राज्य उत्पन्न करतो, आणि त्यापासून आनंद भोगतो. आनंद मिळवण्यासाठीच प्रत्येक मनुष्याची खटपट आहे; पण कारणावर अवलंबून असणाऱ्या आनंदाची वाट दुःखामधून आहे, आणि त्या आनंदासाठी मनुष्य दुःखदायक प्रपंचाची कास धरतो. म्हणून, कोणतेही कारण नसलेला आनंद भोगण्याची आपण सवय लावून घ्यावी. कारणावर अवलंबून असणारा आनंद हा अर्थात अशाश्वत असणार, म्हणून तो खरा आनंद नाही. कारणाशिवाय आनंद मिळवण्यासाठी अगदी स्वस्थ बसायला शिकावे. हे 'काहीही न करणे' ही फारच उच्च अवस्था आहे. काहीतरी करण्यापेक्षा ती फारच कठीण आहे. भगवंताशी अगदी अनन्य होणे, आपले कर्तेपण पूर्ण मारणे, ही ती अवस्था आहे. आनंद पाहिजे असेल तर तुम्ही आनंदातच राहा ! कशाही परिस्थितीत आनंद राहावा. आपल्या मनासारखी गोष्ट घडून आली तर समाधान वाटावे. कुणीही मनुष्य स्वतःसाठीच सर्व करतो. समजा, आपल्याला त्रास देणारा कुणी आहे; आपल्याला त्रास दिला तर त्याला बरे वाटते; म्हणजे आपल्याला दुःख दिले तर त्याला आनंद होतो, म्हणून तो नुसता स्वतःसाठीच माझ्याशी तसा वागतो; हे जसे खरे, तसेच, त्याने दिलेला त्रास मी का घ्यावा ? त्याने काहीही केले तरी आपला आनंद का बिघडू द्यावा ? असे आपण वागावे. काल जे झाले त्याबद्दल दुःख करू नये, उद्या काय होणार याची काळजी करू नये, आज मात्र आनंदात आपले कर्तव्य करावे आणि भगवंताच्या अनुसंधानात राहावे. यातच सर्व आले.
**आजचे बोधवचन :** भगवंताची प्राप्ती व्हावी असे वाटणे हे जन्माचे सार्थक आहे.

**– श्री सद्गुरु ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज**

# अमृताची गोडी तुझ्या भजनात

आधुनिक केसरी न्यूज

भक्ती म्हणाले की ती बाब अंतःकरणाशी संबंधीत होय. बाह्यदर्शनी सजावट करत असतांना ते पाहताच सर्वत्र व्याप्त असलेला परमात्मा प्रसन्न होणे महत्वाचे, त्वमेव वस्तु गोविंद, तुभ्यमेव समर्प्यते. कुठलीही कलाकृती ही मनुष्याला आकर्षीत करते याचाच अर्थ जीव हा सर्व गोष्टींचा उपभोग घेतांना पाच ज्ञानेंद्रिये व मन यांच्या संमिलनातून ही क्रिया घडते.

**श्रोत्रं चक्षुः स्पर्शनं च रसनं घ्राणमेव च |**
**अधिष्ठाय मनश्चायं विषयानुपसेवते ||**

वरील गोष्टींशिवाय भावजाग्रती ही अंतःप्रेरणा असते व त्यातुनच माझ्या हृदयातील परमात्म्यामुळेच हे घडते असे लक्षात येऊन त्याबद्दल जो कृतज्ञतेचा भाव निर्माण होऊन बाह्य घडणाऱ्या क्रियांचे समर्पण म्हणजेच भक्ती होय.
श्री सद्गुरु दासगणु महाराजांचे काव्य व प.पू.स्वामी वरदानंद भारती महाराजांच्या रचना, लेखांमध्ये येणारे उल्लेख याचे रसिकता व भक्ती अशा दोन्ही माध्यमातुन एकाग्रतेने अवलोकन कराल तर भक्तीवर्धक प्रासादिक भुमिका कशी असते हे सहज लक्षात येईल.

**जय सच्चिदघन श्रीहरी, पाव लौकरी ||**
**मी बुडतो भवसागरीं, मजशी उद्धरी ||**
**कठोरता ऐसी न धरणें बरी, येई गा बसून गरुडावरी ||**
**केला वास भिमेच्या तिरीं, पंढरपुरी |**
**देवा तूं दीनांचा कैवारी, लोटी ना मज अनाथा दुरी ||**
**मी अजाण दुबळा खुळा, जाण घननीळा |**
**भक्तीचा गरळा पाजी हरी, गणु हा नत समचरणांवरी ||**

भक्तीची पार्श्वभूमी पाहून झाल्यानंतर, भक्तीचे स्वरुप अंतःकरणात आकारास येते व यातुनच सहृदयता व त्यानंतर भगवंताचीच असलेली मन नावाची विभुति त्या परमात्म्याच्या निर्गुण, निराकारात मिसळुन गेली की बाहेर बोलावयास देखील द्वैती भाव शिल्लक राहत नाही व अशा वेळी जे शब्दविचारकाव्य निर्माण होते त्यातीलच हे पद होय.
ज्याकरीता मनुष्य देह आकारास आला त्या परमात्म्याची आराधना जयजयकारातूनच सच्चिदानंद परमात्म्याचा जयजयकार अंतःकरणात उमलतो व या भवसागरातील काही बनण्याची ओढ आता नकोशी वाटते आहे, माझा उद्धार कर याचा अर्थ बस यही तमन्ना है की अब कोई ख्वाहिश न हो.
कठोरता ऐसी न धरणे बरी, म्हणजेच ईच्छा आकांक्षा या लोकेषणा, दारेषणा, धनेषणा यांनीच युक्त असतात. तर पांडुरंगा तु माझ्या हाकेला ओ देऊन गरुडावर बसुन आल्यानंतर मग अंतिम लक्ष म्हणजेच मोक्ष हेच सिद्धीस जाईल.
श्री पांडुरंगा तु भिमेच्या काठी पंढरपुरास स्थिरावलास, विषयलोलुप विचारांनी लोकांची हृदये विदिर्ण होताहेत त्यामुळे एक प्रकारची दीनता प्रत्ययास येते आहे, तु दीनांचा कैवारी आहेस, मजसारख्या शरणांगताला तु आता दूर लोटु नको.

**विषयजनीत सौख्ये सुख होणार नाही |**
**तुजविण रघुनाथा ओखटे सर्व काही |**
**यातुनच जन विषयांचे किडे, त्यांची धाव बा ह्याकडे |**
**आपणं करु शुद्ध रसपान रे ||**

श्री पांडुरंगा तु मला एकदा आपलेसे केलेस की तुझ्या चरणामृताची गोडी लाभली की तुझ्यात अन् माझ्यात भेद शिल्लक राहत नाही. तसे पहावयास गेले की द्वैताच्या पार्श्वभूमीवर तु म्हणजे परिपूर्ण ज्ञान व अहंच्या भुमिकेतून मी अल्पज्ञ, अज्ञानी हे घननीळा तु ओळखुन घे व अमृताची गोडी तुझ्या भजनात, मनाचा विसावा दुःखी जीवनात याप्रमाणे भक्तीचे अमृतपान मला करव याकरीताच हा गणु सुखदुःख, मानापमान, शीतोष्ण या समानतेच्या पायांवर नतमस्तक आहे.

# भोकर येथील डॉ.शंकरराव चव्हाण बाजार समितीच्या वतीने उभारण्यात आले शेतकऱ्यांसाठी लिलाव शेड

## 1 कोटी 64 लाख रुपये खर्च ; शेतकऱ्यांचा माल राहील सुरक्षित

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** मराठवाड्यातील नामांकित बाजार समिती म्हणून परिचित असलेल्या भोकर येथील डॉ. शंकरराव चव्हाण कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने शेतकऱ्यांसाठी भव्य लिलाव शेड उभारण्यात आले असून शेतकऱ्यांचा माल सुरक्षित राहण्यासाठी या शेडचा उपयोग होणार आहे. सदर कामासाठी १ कोटी ६४ लाख रुपये खर्च झाला असल्याची माहिती सभापती जगदीश पाटील भोसीकर यांनी दिली आहे.

भोकर कृषी उत्पन्न बाजार समिती ही पूर्वीपासूनच्या व्यापारासाठी नावाजलेली आहे. पूर्वीच्या आंध्र प्रदेशातून येथे मोठ्या प्रमाणावर मालाची आवक येत असे आजूबाजूच्या शहरातील तालुक्यातील चांगल्या प्रकारची आवक येथील बाजार समितीला होती शेतकऱ्यांना योग्य भावही मिळत होता त्यातून बाजार समितीला चांगले उत्पन्नही झाले होते. 180 व्यापारी गाळे व शेतकऱ्यांना सुविधा बाजार समितीच्या वतीने करण्यात आल्या. रस्ते, पिण्याचे फिल्टर पाणी, मुताऱ्या, शौचालय, ऑनलाइन पद्धतीने मालाची नोंदणी, रोखीने व्यवहारअशी कामे इथे होत असून मराठवाड्यातील सुसज्ज भव्य अशी ३ मजली सर्व सोयींनी युक्त बाजार समितीची इमारत उभारण्यात आली, अशा पद्धतीने विकासाकडे वाटचाल चालू आहे.

**शेतकऱ्यांसाठी उभारण्यात आले लिलाव शेड**




भोकर येथील डॉ. शंकरराव चव्हाण कृषी उत्पन्न बाजार समिती मार्फत वाढत जाणारा बाजार व मालाची आवक-जावक लक्षात घेता मोठ्या प्रमाणावर येणारा शेतकऱ्यांचा माल भिजू नये शेतकऱ्यांच्या मालाचे नुकसान होऊ नये यासाठी शेतकरी व व्यापारी वर्गातून लिलाव शेडची मागणी माजी मुख्यमंत्री तत्कालीन सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्याकडे करण्यात आली होती. त्यानुसार ही बाब लक्षात घेऊन अशोकराव चव्हाण यांनी सदरील प्रश्न मार्गी लावला. त्यांच्या हस्ते वर्षभरापूर्वी भूमिपूजनही करण्यात आले होते. कामाला गती आली आणि आजच्या स्थितीमध्ये काम पूर्णत्वाकडे आलेले आहे. 100/ 150 अशा आकाराचा लिलाव शेड आठवडाभरात तयार होऊन उपयोगात येईल.

सदर लिलाव शेड झाल्यामुळे शेतकऱ्यांचा येणारा माल भिजणार नाही, माल सुरक्षित राहील, व्यापारी वर्गाला देखील अडचण जाणार नाही, अशी माहिती सभापती जगदीश पाटील भोसीकर, सचिव पी.जी. पुजेकर यांनी दिली.

# 'खो खो' चे ज्येष्ठ संघटक रमेश भंडारी यांना यंदाचा जीवनगौरव पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज



**औरंगाबाद :** हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीच्या निमित्ताने औरंगाबाद जिल्हा ऑलिम्पिक संघटनेतर्फे खेळासाठी योगदान देणाऱ्या खेळाडु, क्रीडा शिक्षक आणि संघटकांचा गौरव करण्यात येतो. यंदाचा संघटनेचा जीवनगौरव पुरस्कार खो खो खेळाचे ज्येष्ठ संघटक रमेश भंडारी यांना प्रदान करण्यात येणार आहे. हा गौरव सोहळा रविवारी (ता.२८) सकाळी ९ वाजता संत एकनाथ रंगमंदिर येथे होणार आहे. यावेळी राज्याचे सहकार मंत्री अतुल सावे ओलिम्पियन तथा अर्जुन पुरस्कारार्थी दत्तू भोकनळ आणि यांच्या उपस्थितीत होणार आहे. या कार्यक्रमात जिल्हाभरातील विविध राष्ट्रीय खेळाडूंचा देखील गौरव होणार आहे. पुरस्कारार्थी पुढील प्रमाणे : आदर्श क्रीडा शिक्षक पुरस्कार - डॉ. निलेश गाडेकर (सोयगाव), निलेश गायकवाड (पैठण), बाबासाहेब माने (सिल्लोड), विजय बारवाल (कन्नड), भाऊसाहेब खरात (वैजापूर), नामदेव पवार (फुलंब्री), कैलास वाहूळे (औरंगाबाद), राजेंद्र गंगावणे (खुलताबाद), निलेश माने (गंगापूर). सत्कारमूर्ती आंतरराष्ट्रीय खेळाडू : अदिती निलंगेकर (पॅरा ऑलिम्पिक), सृष्टी साठे (सुवर्ण पदक, आशियाई कनिष्ठ बॉक्सिंग), शर्वरी कल्याणकर (सुवर्ण पदक, आशियाई कनिष्ठ बॉक्सिंग), तनिशा बोरामणीकर (रौप्य पदक, आशियाई बुद्धिबळ), गौरव म्हस्के (कांस्य पदक, आशियाई ज्युनियर बॉक्सिंग), कशीष भराड (आशियाई तलवारबाजी), वैदेही लोया (आशियाई तलवारबाजी), साक्षी चितलांगे (रौप्य पदक, आशियाई बुद्धिबळ), तेजस शिरसे (आशियाई अथलेटिक्स स्पर्धा), रिद्धी हत्तेकर, सिद्धी हत्तेकर (आशियाई जिम्नॅस्टिक स्पर्धा), अभय शिंदे (आशियाई तलवारबाजी), श्रेयस जाधव (आशियाई तलवारबाजी), संदीप गुरमे (आयर्नमॅन) यांच्यासह विविध खेळांतील राष्ट्रीय खेळाडू, क्रीडा मार्गदर्शकांचा देखील सत्कार केला जाणार आहे.

या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हा ऑलिम्पिक संघटनेचे अध्यक्ष पंकज भारसाखळे, उपाध्यक्ष डॉ. उदय डोंगरे, सचिव गोविंद शर्मा, सहसचिव डॉ. दिनेश वंजारे, कोषाध्यक्ष विश्वास जोशी आदींनी केले आहे.

# माळीवाडा येथे लक्ष्मी आईची जत्रा मोठ्या उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**माळीवाडा :** कोरोनाच्या दोन वर्षांच्या कालखंडानंतर यंदा माळीवाडा येथे प्रतिवर्षी प्रमाणे यंदाही शनिवारी दि. २७ रोजी पोळ्याच्या पाडव्यानिमित्त बारागाड्या ओढण्यात आल्या. यावेळी नवस केलेल्या भाविकांनी बारागाड्या ओढत लक्ष्मी आई की जय म्हणत नवस पूर्ण केला जातो, ही यात्रा नवसाला पावणारी लक्ष्मी देवीची यात्रा म्हटली जाते.

या यात्रेला माळीवाडा व परिसरासह व जिल्ह्याभरातुन व परजिल्हा मुंबई, नाशिक, मालेगाव, लासलगाव, मनमाड, अहमदनगर, कोपरगाव, श्रीरामपूर, धुळे, जालना अश्या अनेक ठिकाणाहून भाविक नवसासाठी येतात. नवस पूर्ण करण्यासाठी मंदीराजवळ राहाट (लाकडाच्या विस्तावा) वरून चालण्याची परंपरा आहे व बारागाडे ओढण्याची परंपरा अनेक वर्षांपासून सुरु आहे. बारागाडे दौलताबाद वेशीपासून सकाळी अकरा वाजता सुरु होऊन संध्याकाळी आठ वाजता लक्ष्मी माता मंदिरापर्यंत ओढण्यात येतात. त्यानंतर गावात बैलांची मिरवणूक काढण्यात येते. यानंतर लहान तमाशे, वाघामुरळीची गाण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. खेळणी दुकाने, पाळणे, खाऊ दुकाने आदी थाटली होती.

यावेळी बाबासाहेब मुळे, बाळु बनसोडे, राजु आढाव, सचिन देवतकर, कृष्णा मुळे, धमपाल गायकवाड, जनार्धन वाघमोडे, सुधाकर हेकडे, तुकाराम मुळे, शिवाजी मुळे, उत्तम पल्हाळ, कारभारी गाजरे, जनार्धन शेरकर, नंदकिशोर मुळे, शिवनाथ धनायत, धनु शेरकर, गोरखनाथ हेकडे, कैलास हेकडे, भरत मुळे, नवनाथ आढाव, मनोज शिरसाठ व महिलांसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या वेळी दौलताबाद स्टेशनच्या पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.






# आनंद दिघे यांच्या पुण्यतिथीनिमित्त महारक्तदान शिबिर

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष व डॉ. श्रीकांत शिंदे फाऊंडेशन धर्मवीर स्व.आनंद दिघे याच्या पुण्यतिथीनिमित्त महारक्तदान शिबीराचे पैठण येथे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून राज्याचे रोजगार हमी तथा फलोत्पादन मंत्री संदीपान भुमरे तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष मंगेश चिवटे (मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष प्रमुख) यांची उपस्थिती होती.

यावेळी मंगेश चिवटे यांनी शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष स्थापने पासून तर मिळणार असलेल्या सुविधाची सखोल माहिती दिली. मंत्री भुमरे यांनी शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष व डॉ. श्रीकांत शिंदे फाऊंडेशन च्या माध्यमातून विविध आजारावर मोफत उपचार केला जातो तसेच मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून गरजवंतांना नक्कीच मदत केली जाते, असा विश्वास व्यक्त केला. आयोजित महारक्तदान शिबिरात जवळपास ७० जणांनी रक्तदान केले. यावेळी नंदलाल काळे, शेखर शिंदे, गायके यांची उपस्थिती होती.

# अण्णाभाऊंच्या जयंतीला आज कृषिमंत्री सत्तार यांची उपस्थिती

आधुनिक केसरी न्यूज

**सिल्लोड :** तालुक्यातील भवन (माणिकनगर) येथे होणाऱ्या साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त उद्या रविवार दि. 28 रोजी महाराष्ट्र राज्याचे कृषिमंत्री तथा सिल्लोड-सोयगांव विधानसभा मतदारसंघाचे आमदार अब्दुल सत्तार यांची उपस्थिती राहणार असून ते या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असणार आहेत.

भवन येथील सामाजिक कार्यकर्ते अशोक कांबळे, मातंग एकता आंदोलनाचे जिल्हाध्यक्ष संदीप मानकर, विजय खाजेकर व संजय कांबळे यांच्या आयोजनाखाली होत असलेल्या या जयंती उत्सव सोहळ्यास तालुक्यातील समस्त मातंग समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले असून या कार्यक्रमात अण्णाभाऊंच्या विचारासोबतच सामाजिक विषयांवर व समाजाच्या विविध समस्यांवर देखील हितगुज होणार आहे.



# रोहित पवारांच्या अडचणी वाढणार ?; ईडी कारवाई सुरू

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राष्ट्रवादीचे नेते व आमदार रोहित पवार हे संचालक राहिलेल्या ग्रीन एकर कंपनीने आर्थिक घोटाळा केल्याची तक्रार ईडीला (सक्तवसुली संचालनालय) प्राप्त झाली असून या संदर्भात ईडीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. या संदर्भात लवकरच प्राथमिक चौकशी होणार असून त्यात जर काही तथ्य आढळले तर या चौकशीचे धागे रोहित पवार यांच्यापर्यंत जाण्याची शक्यता आहे.

उपलब्ध माहितीनुसार, ग्रीन एकर रिसॉर्ट अँड रिटेलर्स प्रा. लि. या कंपनीमध्ये रोहित पवार हे सन २००६ ते २०१२ पर्यंत संचालक होते. त्यांचे वडिल राजेन्द्र पवार हे देखील या कंपनीमध्ये सन २००६ ते २००९ या कालावधीमध्ये संचालक होते. तसेच, या कंपनीशी येस बँक-डिएचएफएल घोटाळा प्रकरणी सध्या अटकेत असलेले राकेश वाधवान व सारंग वाधवान यांचा देखील अत्यंत जवळून संबंध असल्याचे समजते. मात्र, वाधवान बंधूंचे नाव येस बँक-डिएचएफएल घोटाळ्यात पुढे आल्यानंतर रोहित पवार यांनी या कंपनीच्या संचालकपदाचा राजीनामा दिल्याचे समजते. या कंपनीत आर्थिक घोटाळा झाल्याची तक्रार ईडीला प्राप्त झाली असून या तक्रारीच्या अनुषंगाने ईडीचे अधिकारी चौकशी करणार आहेत.



# बाप्पाच्या स्वागतासाठी दीड लाख चाकरमाने लालपरीतून होणार कोकणकडे रवाना !

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** गणेशोत्सवासाठी एसटी महामंडळाने सोडलेल्या गणपती स्पेशल जादा गाड्यांना चाकरमान्यांनी दिलेल्या उत्स्फर्त प्रतिसादामुळे ३१ ऑगस्ट २०२२ पर्यंत सुमारे ३ हजार ४१४ गाड्या हाऊस फुल झाल्या आहेत. यापैकी १ हजार ९५१ गाड्यांना ग्रुप बुकिंगचे प्राधान्य मिळाले आहे. त्यामुळे यंदा बाप्पाच्या स्वागतासाठी सुमारे १.५० लाखांहून अधिक चाकरमानी कोकणात रवाना होणार असल्याची माहिती एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक शेखर चन्ने यांनी दिली.

गणेशोत्सव हा कोकणातील महत्वाचा सण म्हणून ओळखला जातो. गणपती व कोकणातील चाकरमान्यांचे एक अतुट नाते बनले आहे. गेली दोन वर्षे कोरोनाच्या संकटानंतर यंदा मोठ्या संख्येने चाकरमानी गणेशोत्सवासाठी कोकणकडे रवाना होत आहेत. गौरी-गणपती उत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांसाठी एसटी महामंडळ दरवर्षी जादा गाड्यांचे नियोजन करते. यंदा महामंडळाने गणेशोत्सवासाठी मुंबई, ठाणे, पालघर, रायगड तसेच पुणे येथून २ हजार ५०० गाड्या सोडण्याचा निर्णय घेतला होता. गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या गाड्यांना सुरुवात झाली आहे. चाकरमान्यांनी सुरक्षित प्रवास म्हणून एसटीच्या जादा गाड्यांना पसंती दिल्याने ३१ ऑगस्ट २०२२ पर्यंत तब्बल ३ हजार ४१४ गाड्यांचे आरक्षण फुल झाले आहे.



प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्ने
संपर्क क्र. ७५८८४२४२५४

# पोळलेया सुनेयापरी असावे

आधुनिक केसरी

**बाजारात आज-काल अनेक प्रकारचे यशस्वी होण्याचे विविध पुस्तके आली आहेत. अल्पावधीत आणि चाणाक्षपणे आपण यशस्वी कसे होऊ यावर या पुस्तकांमधून विवेचन केलेले असते; परंतु ही सर्व पुस्तके व्यक्तीच्या वैयक्तिक, आर्थिक यशस्वीपणाकडे लक्ष देताना दिसून येतात. केवळ व्यक्ती यशस्वी होऊन चालणार नाही, तर तो व्यक्ती ज्या समाजाचा घटक आहे, तो पूर्ण समाजच उर्ध्वगामी विकसनशील दिशेकडे वाटचाल करणारा, पारस्परिक सहानुभूती बाळगणारा आणि व्यक्तीला प्रगतीच्या संधी प्राप्त करून देणारा असावा. भारतात फार पूर्वीपासून - काही अपवाद वगळता - व्यक्तीविकसनाकडे जाणीवपूर्वक लक्ष दिले गेले.**

यशस्वी होणे म्हणजे काय? आणि यशस्वीपणाची लक्षणे कोणती? या गोष्टीचा मात्र सांगोपांग विचार कोणी करताना दिसत नाही. कारण वैयक्तिक स्वार्थपरायणता म्हणजेच यशस्वी होणे, असे एक साधे सरळ सूत्र आम्ही स्वीकारल्याचे दिसून येते; परंतु जोपर्यंत आपल्या आजूबाजूचा परिसर आपले जाणते अजाणते भाऊबंद यशस्वी होणार नाहीत, तोपर्यंत आपल्या वैयक्तिक प्रगतीला काही अर्थ उरणार नाही. वासरात लंगडी गाय कितीही शहाणी असली तरी बाहेर निघाल्यानंतर तिची काही किंमत नसते. त्याप्रमाणे अप्रगत लोकांमध्ये एखादाच सर्वार्थाने प्रगत असलेला माणूस त्या ठिकाणी उठून दिसत असला तरी, ज्यावेळेस तो व्यक्ती अन्य ठिकाणी जाईल त्या ठिकाणी त्याची किंमत तेवढीच असेल असे सांगता येणार नाही. दुसरा महत्त्वाचा मुद्दा असा की, आपली ही वैयक्तिक प्रगती इतरांना अज्ञानात ठेवून, त्यांचे शोषण करून जर होत असेल तर ते सर्वतः निषिद्ध आहे. आपल्याकडील ज्या काही महत्त्वाच्या पंचवीस-तीस चळवळी आजपर्यंत झाल्या, त्यांचा साधा धावता आढावा घेतला तरी एकूण मानव्याचे कल्याण हाच धागा त्यामधून दिसून येतो. या पार्श्वभूमीवर आजच्या युवकांची फार मोठी जबाबदारी आहे. कारण युवक जे करू शकतो ते अन्य कोणी करू शकणार नाही; परंतु आजच्या युवकाला सामाजिक जाणिवेचे धडे देणे अत्यंत आवश्यक आहे. या युवकांमध्ये वैयक्तिक आणि सामाजिक दायित्व पेलण्याचा आत्मविश्वास भरावा लागेल. आजचा युवक थोडासा गोंधळलेला आणि भविष्याप्रती अजाण असलेला असला तरी, हाच युवक आपल्या समाजाला, देशाला आणि एकूणच मानवी कल्याणाला मदतगार ठरणार आहे. म्हणून आपली सर्व भिस्त युवकांचे भरणपोषण कसे होईल यावर असली पाहिजे. महागाई, वाढती स्पर्धा, दारिद्र्य, बेरोजगारी आणि आर्थिक शोषण यामुळे आजचा युवक संभ्रमित झालेला आहे. आपल्या राष्ट्रांमध्ये राजकीय स्थिरता असली तरी या राजकीय स्थिरतेमधून युवकांच्या कल्याणाची जबाबदारी पार पडते आहे का? हा खरा मोठा ग्रहण प्रश्न आहे. कारण कामाच्या शोधात घरदार सोडून जे युवक अन्यत्र भटकंती करताना दिसतात त्यांचे काय हाल झाले, हे आपण कोरोना काळात अनुभवले आहे. घराची जबाबदारी, रोजगार मिळवण्याची धडपड आणि रोजगाराची अनुपलब्धता यामुळे




आजचा युवक गोंधळलेला, वैफल्यग्रस्त आणि तणावात असल्याचे दिसते. या कारणांमुळे तो एक प्रकारे मानसिक दोलायमान स्थितीत आहे. याच गोंधळलेल्या मानसिकतेचा फायदा राजकारणातील मुरब्बी लोक करून घेतात आणि युवकांच्या दृष्टीने जे महत्त्वाचे साध्य आहे, त्यावरून लक्ष विचलित करून नको त्या ठिकाणी त्यांना लक्ष घालायला भाग पाडतात. यामधून अनेक प्रकारच्या समस्यांचा, प्रश्नांचा जन्म होतो. व्यसनाधीनता, चौर्य प्रवृत्ती, धर्मांधता, वाढता जातीयवाद, सामाजिक कलह आणि मूल्यहीन जगणे हा त्याचाच परिपाक होय. जणू काही युवक हाच एक समस्या असावा, अशी परिस्थिती तुम्ही आम्ही सर्वांनी निर्माण केली आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात युवकांच्या मनात एक निश्चित प्रकारचे ध्येय तरी होते; परंतु स्वातंत्र्योत्तर काळ हा युवकांच्या दृष्टीने दिशाहीन, कोणत्याच प्रकारचे ध्येय नसण्याचा काळ आहे की काय? अशी परिस्थिती सर्वत्र पहावयास मिळत आहे. याला जबाबदार कोण? असा प्रश्न जेव्हा आपल्यासमोर येतो, त्यावेळेस खूप विचारांती कुटुंब आणि शासकीय धोरण व्यवस्था हे दोनच घटक यास जबाबदार आहेत. कुटुंबातून नामशेष होणारी मूल्य व्यवस्था आणि राजकीय पक्षांनी निर्माण केलेले सांप्रदायिक वातावरण युवकांच्या या अवस्थेस जबाबदार आहेत. आपल्या जातीपुरता, धर्म निगडित, प्रांतपरत्वे आणि भाषागणिक या मर्यादेतच जर आपण विचार करणार असू, तर आपली सर्वार्थाने प्रगती कधीच होणार नाही. म्हणून युवकांनी स्वतःला अशा कोणत्याच बंधनात अडकवून न घेता विस्तीर्ण आणि व्यापक झाले पाहिजे. आपल्या आजूबाजूला सामाजिक प्रश्नांच्या अनुषंगाने आणि व्यापक जनहिताच्या दृष्टीने काम करणारी असंख्य माणसे आहेत. ज्यांच्यामुळे सामाजिक स्थैर्य टिकून आहे अशा घटकांशी आपण स्वतःला जोडून घेतले पाहिजे, अन्यथा युवक म्हणून आपले असणे कधी नामशेष होईल याचा थांग लागणार नाही. युवकांच्या दृष्टीने कोणताही काळ हा संक्रमण काळच असतो अशा या संक्रमणावस्थेत स्वतःला सांभाळून सामाजिक जाणिवा विकसित करण्याचे कसब आत्मसात केले तरच आपली सर्वार्थाने प्रगती होणार आहे.

महानुभाव संप्रदायाचे प्रवर्तक श्री. चक्रधर स्वामी यांनी आपल्या शिष्यांना जो उपदेश केला तो शीर्षक रूपाने आपण वाचला तर त्यातून काय अभिप्रेत आहे? एखाद्या कुत्र्याच्या अंगावर गरम पाणी टाकल्यानंतर तो जेवढी तळमळ करतो, तेवढी तळमळ आपल्या मनात असल्याशिवाय आपणास यश मिळणार नाही. हे साधे पण महत्त्वाचे सूत्र प्रत्येकाने जपले तरच आपली प्रगती होऊ शकते. अन्यथा आपल्यासाठी दुसऱ्याने झगडावे हा काळ केव्हाच मागे पडला आहे. युवकांच्या ठिकाणी राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक भाग आल्याशिवाय तो स्वतःची सर्वांगीण प्रगती कसा करू शकेल? केवळ शैक्षणिक प्रगती ही तुम्हाला फार फार तर पैसा कमविण्यासाठी उपयोगात पडेल; परंतु या पैशाचा विनियोग ज्या समाजात राहून करावयाचा आहे, तो समाज देखील तेवढाच प्रगत झाला पाहिजे हे सर्वांनी जाणून असावे.

**(लेखक गोदावरी कला महाविद्यालय अंबड जि. जालना येथे मराठीचे प्राध्यापक आहेत)**

### बोंबाबोंब कशासाठी?

**आजचा शिक्षण घेत असलेला युवक एखाद्या मजुरासारखे अभ्यासामध्ये गुंतून पडतो. गुण पत्रिकेवरील गुण हेच त्याचे सारसर्वस्व असते. त्याने कधीतरी बाहेर डोकावून बघितले पाहिजे. कारण शिक्षण संपल्यानंतर आपल्या शिक्षणाचे उपयोजन याच समाजात करायचे आहे. हे करत असताना आपण एकूण मानवी मूल्य किती आत्मसात केली यास किंमत असणार आहे. शिक्षणामधून मिळणारी मूल्यव्यवस्था आपणास तुटपुंजी वाटायला लागतील म्हणून वेळीच सामाजिक भान कशाने निर्माण होईल? याचे प्रत्येकाने परिशीलन करावे आणि त्यानुसार आपले वर्तन सुधारावे.**



पंकज वसंत पाटील
मो. 9850439579

# महापर्व पर्युषण

आधुनिक केसरी

**मनात उद्भवणारे सर्व वाईट विचार दूर करण्यासाठी जैन बांधवांद्वारे आचारल्या जाणारा उपवास करण्याचा कालावधी म्हणजेच पर्युषण पर्व होय. चातुर्मासातिल भाद्रपद महिन्यात केले जाणारे हे व्रत, मनातील सर्व विकारांपासून मुक्त होण्याचा मार्ग शोधत स्वतःला आत्मशुद्धीकडे नेण्याचे महापर्वच होय. या कालावधीत धर्म जागरण आणि समाजप्रबोधनही केले जाते. भरतखंडात उदयास येऊन भारताचे धर्मभूमी हे नाव सार्थ करणाऱ्या धर्मांपैकी जैन धर्म हा प्रमुख धर्म आहे. ज्यांनी इंद्रियांवर विजय मिळविला अशा जिनाला परमपूज्य मानणाऱ्या लोकांचा जो धर्म तो जैन धर्म हा त्याचा सामान्य अर्थ असला तरी जिना ने ज्या धर्माचे कथन केले किंवा ज्याचा उपदेश केला तो धर्म असा त्याचा दुसरा अर्थ आहे.**

जैन धर्माच्या विचारांचे मूळ स्याद्वाद  व आचाराचे मूळ अहिंसा असून कोणत्याही व कोणाच्याही विचारांना अन्याय न व्हावा आणि कोणत्याही प्राण्याची हिंसा न व्हावी अर्थात सर्वांचे विचार समजून घ्यावे आणि सर्वांनी सर्वांच्या जीवनाची रक्षा करावी हे जिनाच्या उपदेशाचे मूलतत्त्व आहे.

**सर्वज्ञो जितरागादीदोष स्त्रैलोक्यपूजितः।**
**यथास्थितार्थवादी च देवोऽर्हत परमेश्वरः।।**

सर्वज्ञ, राग, द्वेषादिकांवर विजय मिळवलेला, त्रैलोक्य पूजित, यथास्थित अर्थ जाणणारा, परमेश्वरसदृश्य असा सिद्ध पुरुष तो अर्हत् होय. अशा अर्हताकडून प्रवाहित झालेला धर्म तो अर्हत् धर्म होय.

जैन धर्मातील पर्युषण पर्व आत्मशुद्धीसाठी असते. हे पर्व चातुर्मासात येत असून या कालावधीत चांगल्या संस्काराचे बीज साधकावर पेरले जाते. मनातील सर्व विकारांचे शमन करणे तसेच काम, क्रोध, लोभ, वैमनस्य या विकारांपासून दूर राहून स्वतःला शांती प्राप्त करून घेणे म्हणजेच पर्युषण होय.

जैन धर्माच्या खालील पाच सिद्धांताचे म्हणजेच अणुव्रतांचे पालन पर्युषण पर्वात प्रामुख्याने केले जाते.

**अहिंसाणुव्रत :** अहिंसा हा जैन धर्माचा प्राणभूत सिद्धांत आहे. आत्म्याच्या शुद्ध परिणामाचा घात करणे याचे नाव हिंसा होय. जैनांनी संकल्पी, उद्योगी, आरंभी व विरोधी असे हिंसेचे चार प्रकार कल्पिले आहेत. कसाई पशुवध करतो, तशा प्रकारची हिंसा ही संकल्पी. जीवन निर्वाहासाठी केल्या जाणाऱ्या शेती, व्यापार तसेच युद्ध या ठिकाणी होणारी हिंसा ती उद्योगी; सावधगिरी बाळगूनही स्वयंपाकादी करताना होणारी हिंसा ही आरंभी आणि स्वतःच्या किंवा दुसऱ्याच्या रक्षणासाठी केलेली हिंसा ही विरोधी होय.

हिंसेचे द्रव्यहिंसा व भावहिंसा असे दोन महत्त्वाचे प्रकार होतात. एखाद्या जिवाचा प्रत्यक्ष वध करणे ही द्रव्यहिंसा व एखाद्या जीवाचे वाईट करण्याची इच्छा मनात उत्पन्न होणे व एखाद्याला मर्मभेदक बोलणे ही भावहिंसा होय. भावहिंसा हीच खरी हिंसा म्हटले जाते, कारण तिथे कर्त्याच्या मनात दुष्ट भाव असतो. मग त्याच्या हातून प्रत्यक्ष कुणाचा घात घडो व किंवा न घडो. जिथे कर्त्याच्या मनात हिंसेची भाव नसेल तिथे त्याच्या हातून एखाद्याचा जीवघात झाला, तरी ती हिंसा ठरत नाही. जैनांनी हिंसेतला हा विवेक स्वीकारूनच आपल्या शास्त्राची उभारणी केली आहे. मनुष्याने आपल्या स्वार्थासाठी कोणत्याही जीवाला त्रास अथवा पीडा देऊ नये आणि आपला जीवन व्यवसाय करताना त्यात जीवांचे अहित आणि जीवघात कमीत कमी होईल अशी सावधानी ठेवावी असे जैन धर्मशास्त्र सांगते. अशी सावधानी ठेवतो तो जैनमते अहिंसकच  होय. अशा अहिंसेचे ज्यात पालन करायचे असते, त्याला मुनीधर्मात अहिंसाव्रत आणि श्रावकधर्मात अहिंसाणुव्रत म्हटले आहे. अहिंसाणुव्रतासंबंधी सागरधर्मामृतात पुढील श्लोक सांगितला आहे.

**इत्यनारम्भजां जह्याद्  हिंसामारम्भजां प्रति।**
**व्यर्थ्यस्थावरहिंसावद्यतनामावहेद् गृही।।**

**सत्याणुव्रत :** या विषयी जैनधर्मामृतात सांगितले आहे ते असे

**असत्यो लघीयस्त्वमसत्याद्वचनीयता।**
**अधोगतीरसत्याच्च तदससत्यं परित्यजेत्।।**

अर्थात असत्य भाषणाने मनुष्याला लघुता प्राप्त होते, त्याचा अपमान होतो आणि शेवटी तो अधोगतीला जातो. यासाठी असत्य वचनाचा परित्याग करावा. जैन धर्मात सत्य हे अहिंसाव्रताचेच एक अंग आहे. जे वचन दुसऱ्याच्या अंतःकरणाला झोंबते अथवा दुःख देते ते वचन सत्य असले तरी त्यामुळे हिंसा होत असल्यामुळे जैन धर्माच्या दृष्टीने ते असत्यच ठरते.

**अचौर्याणुव्रत :** या व्रताचे लक्षण पुढीलप्रमाणे सांगितले आहे.

**निहितं वा पतितं वा सुविस्मृतं वा परस्वमविसृष्टम् ।**
**न हरति यन्न च दत्ते तदकृशचौर्यादुपारमणम् ।।**


ठेव म्हणून ठेवलेले, पडलेले, विसरलेले व परक्याचे असलेले धन जो स्वतः ग्रहण करत नाही आणि जो ते उचलून दुसऱ्यालाही देत नाही, तो स्थूल चौर्यापासून विरक्त झाला, असे समजावे हेच अचौर्याणुव्रत होय.

**ब्रह्मचर्याणुव्रत :** न तु परदारान् गच्छति परान् गमति च पाप भीतेयर्यत् । सा परदारनिवृत्तिः स्वदारसन्तोषनामापि ।।

जो पुरुष पापाच्या भीतीने परस्त्रीगमन करीत नाही आणि दुसऱ्या कुणाला त्यासाठी प्रवृत्त करत नाही अशा पुरुषाची परस्त्रीपासून निवृत्ती आणि स्वस्त्रीच्या ठिकाणी संतुष्टता ही दोन्ही मिळून ब्रह्मचर्याणुव्रत होय.

**परिग्रहपरिमाणव्रत :** याचे लक्षण पुढीलप्रमाणे सांगितले आहे-

**धनधान्यादिग्रन्थं परिमाय ततोधिऽकेषु निस्पृःहता ।**
**परिमितपरिग्रहः स्यादिच्छापरिमाणनामापि ।।**



अर्थात धनधान्यादी दशविध अपरिग्रहाचे परिमाण ठरवून त्या प्रमाणातच त्यांचा संचय करणे व त्याहून अधिकाविषयी निःस्पृहता राखणे, हे इच्छापरिमाण नावाचे परिग्रहपरिमाण व्रत होय.

या पाच अणुव्रतांच्या जोडीला श्रावकासाठी तीन गुणव्रते व चार शिक्षाव्रते अधिक सांगितली आहेत. ती दिग्व्रत, अनर्थदंड व भोगोपभोगपरिमाण अशी गुणव्रतांची नावे आहेत. देशावकाशिक, सामायिक, प्रोषधोपवास व वैयावृत्य ही शिक्षाव्रतांची नावे आहेत. आयुष्यभर आपले येणे-जाणे व देणे-घेणे या गोष्टींवर मर्यादा घालून घेणे, प्राण्यांना पीडा होईल असे कोणतेही काम न करणे,  सकाळ-संध्याकाळ काही वेळ एकांत स्थळी बसून आत्मध्यान करणे, प्रत्येक अष्टमी व चतुर्दशी या तिथींना उपवास करणे,  भोग साधनांचे निश्चित परिमाण ठरवणे, रोज भोजन करण्यापूर्वी साधू-मुनींना अन्नदान करणे तसेच रात्री भोजन न करणे, पाणी गाळून पिणे, इ.  नियमही श्रावकाने पाळायचे असतात.

संयम, तप व दान ही धार्मिक कर्तव्येही जैनांनी रोज आचारायची असतात. विशेष धर्मश्रद्धेचे लोक पाच अणुव्रते आणि मधू, मद्य व मांस यांचे वर्जन हे अष्टमूलगुण अंगी बाणवणे या गोष्टीला अधिक महत्त्व देतात. तसेच दर्शन, सामायिक (ध्यान-चिंतन), प्रतिक्रमण (पश्चाताप व्यक्त करणे), प्रत्याख्यान (विशिष्ट व्रताच्या पालनाची गुरूजवळ शपथ घेणे), प्रार्थना, रसपरित्याग (विशेषतः पंचमी, अष्टमी, चतुर्दशी या तिथींना विशिष्ट पदार्थ न खाण्याचे व्रत) जलगाळण (पाणी गाळून पिणे), रात्रिभोजनत्याग (रात्री न जेवणे), जप आणि संध्यावंदन (सकाळ-संध्याकाळ प्रार्थना करणे) या गोष्टीही जैनांच्या नित्याचारात मोडतात. या सर्व क्रियाकलापात अष्टमूलगुण, जलगाळण, रात्रिभोजनत्याग, देवदर्शन, देवपूजा, सामायिक आणि स्वाध्याय यांचे महत्त्व विशेष मानले जाते.

जैन धर्मीयांच्या पर्युषण पर्वाची सांगता  संवत्सरी महापर्वाने केली जाते. यात आपण कुणाला दुखावले असेल तर त्यांचीही क्षमा मागितली जाते. 'संवत्सरी' या दिवशी लहान-मोठया सर्वांचीच, अगदी प्राणिमात्रांचीही "मिच्छामी दुक्कडम" म्हणून क्षमा मागितली जाते.

जैन धर्मातील पर्युषण पर्वच मुळी आत्मशुद्धीसाठी असते. मिच्छामी दुक्कडम म्हणजे माझ्या सर्व चुकांसाठी मला क्षमा करा. यात हात जोडून प्रत्येक जण क्षमा मागतो. हे शब्दच मुळी माणसाचे पाय जमिनीवर ठेवणारे शब्द आहेत. आपल्याकडून जाणते अजाणतेपणी झालेल्या चुकांची क्षमा याचना करतांना मिच्छामी दुक्कडम म्हणताना आपल्या मनात असलेल्या निर्मळ भावनांमध्ये माणसात प्रवेश करणाऱ्या जनावराला रोखण्याचे सामर्थ्य असते. हे शब्द उच्चारतांना माणसातला अहं पार गळून गेलेला असतो.

**तेजः क्षमा धृतिः शौचमद्रोहो नातिमानिता ।**
**भवन्ति सम्पदं दैवीमभिजातस्य भारत ।।**

अर्थात तेज, क्षमा, धैर्य, बाह्य शुद्धी, कुणाविषयीही शत्रुत्व न वाटणे आणि स्वतःविषयी मोठेपणाचा अभिमान नसणे ही सर्व दैवी संपत्ती घेऊन जन्मलेल्या माणसाची लक्षणे आहेत.

आपल्या चुका मान्य करणं ही स्वतः मधील परिवर्तनाची असलेली खरी सुरुवात आपल्याला  अहंकार, मोहमाया आणि एकूणच षडरिपूंपासून दूर ठेवत सुख-दुःखाच्या भेदांपलिकडील शाश्वत सुखाची प्राप्ती करुन देवू शकते. 'अहिंसा परमो धर्मः' हा गाभा असलेल्या जैन धर्माचे आदर्श आपण सर्वांनीच आचरणात आणावे असे आहेत. मनातील अहंकार संपवणारा मिच्छामी दुक्कडम संस्कार आपण अनुसरत पर्युषण पर्व आनंदाने साजरे करुया.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं  ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# अशोक गहलोत : काँग्रेस अध्यक्ष होतील ?



प्रकाश महागावकर
संपर्क क्र. 9422007361

आधुनिक केसरी

**सचिन पायलटमार्फत अस्तित्व टीकयायचे असेल आणि राजस्थानसारख्या मोठ्या सिमाराज्यातून कारवाया करण्यासाठी त्यांना अशोक गहलोत ऐवजी सचिन पायलट मुख्यमंत्री होणे सोयीचे आहे. म्हणून त्यांनी सोनिया गांधींचे गळी उतरवले आहे की अशोक गहलोत यांना कॉंग्रेस अध्यक्ष करा, म्हणजे तुमच्या विश्वासू आणि आज्ञाधारक माणसाकडेच पक्ष सुरक्षित राहील. शिवाय त्यांना पक्षाच्या मजबुतीकरणासाठी देशभर फिरवत बसवले की आपोआपच पक्षाची सर्व सुत्रे गांधी कुटूंबाकडेच राहतील. सचिनला न्याय दिल्यासारखे होईल आणि आपल्या भारतविरोधी, पाक धार्जिण्या धोरणानुसार कामही करता येईल.**

राजस्थान या त्यातल्या त्यात मोठ्या राज्यात आज काँग्रेसचे सरकार सत्तेत आहे. अशोक गहलोत या जेष्ठ नेत्याने राजस्थान सांभाळताना आपल्या विरोधकांना (पक्षांतर्गत) काबूत ठेवत सरकार चालवले. जमेल तसे भाजपा आणि मोदी, शाह यांचेवर चिखलफेक करत, भ्रष्टाचाराचे आरोप करत आपले बस्तान शाबूत ठेवले होते. पण दिवसेंदिवस सचीन पायलट डोईजड होतच आहेत. ते सतत पक्षांतर्गत कुरापती काढत आपली शक्ती दाखवत असतात. फारुख अब्दुल्ला यांचे जावई असल्याने गांधी परिवाराशी जवळीक साधून आहेत. कारण काँग्रेसचे जम्मू काश्मीरमधील राजकारण अब्दुल्ला परिवार आणि मेहबूबा मुफ्ती यांच्यावरच चालत असते.

गुलाम नबी आझाद या जेष्ठ, एकनिष्ठ आणि प्रदिर्घ काळ काँग्रेसच्या पहील्या फळीत काम केलेल्या नेत्याने आपले अंग काँग्रेस पासून कांही, सुरक्षित अंतरावर बाजूला ठेवल्यामुळे जम्मू काश्मीरमध्ये काँग्रेसचे अस्तित्व शिल्लक नाही राहीलेले. त्यामुळे खरे तर सचीन पायलट यांचे पिता राजेश पायलट यांचा अपघाती मृत्यू संशयास्पद असूनही आणि त्यांचे मृत्युची चौकशीच गुंडाळलेली असल्याने सचिन पायलट यांनी काँग्रेसपासून फारकत घेणे अपेक्षित होते, आवश्यकही होते. राजीव गांधी यांचे राजेश पायलट, अमिताभ बच्चन, माधवराव सिंधिया हे वैयक्तिक मीत्र असल्याने कांही काळ काँग्रेसमध्ये होते. अमिताभ बच्चन यांनी अत्यंत योग्य वेळी राजकारण सोडून देवून कलाक्षेत्रावर लक्ष केंद्रित करुन तिथे दिपस्तंभासारखे स्वतः चे अढळ स्थान निर्माण केले म्हणून ते अजून जिवंत आहेत. अन्यथा पायलट आणि सिंधियासारखे तेही अल्पजीवी ठरले असते. आणि भारत एका महान, भारदस्त आवाजाच्या, कला सम्राटाला मुकला असता.

असो. मुद्दा हा आहे की कलम 370 आणि 35 ए रद्द झाल्या पासून अब्दुल्ला आणि मेहबुबा मुफ्ती उघडे पडत आहेत. त्यांची राजकीय कारकीर्द मृत्युशय्येवर आहे. फूटिरतावादी मानसिकता, ध्येय आणि चाली पाहता आता ते हद्दपार होतील.

अशावेळी सचिन पायलटमार्फत अस्तित्व टीकयायचे असेल आणि राजस्थानसारख्या मोठ्या सिमाराज्यातून कारवाया करण्यासाठी त्यांना अशोक गहलोत ऐवजी सचिन पायलट मुख्यमंत्री होणे सोयीचे आहे. म्हणून त्यांनी सोनिया गांधींचे गळी उतरवले आहे की अशोक गहलोत यांना काँग्रेस अध्यक्ष करा, म्हणजे तुमच्या विश्वासू आणि आज्ञाधारक माणसाकडेच पक्ष सुरक्षित राहील. शिवाय त्यांना पक्षाच्या मजबुतीकरणासाठी देशभर फिरवत बसवले की आपोआपच पक्षाची सर्व सुत्रे गांधी कुटूंबाकडेच राहतील. सचिनला न्याय दिल्यासारखे होईल आणि आपल्या भारतविरोधी,



पाक धार्जिण्या धोरणानुसार कामही करता येईल. अशोक गहलोत आणि भाजपच्या वादग्रस्त नेत्या, माजी मुख्यमंत्री वसूंधराराजे यांचे संबंध खुप जिव्हाळ्याचे आहेत. अडीअडचणीत त्यांनी अशोक गहलोत यांना बऱ्याच वेळा अप्रत्यक्ष मदत केलेली आहे. आणि येत्या विधानसभा निवडणुकीचे वेळी त्या भाजपमध्ये वाद निर्माण करणारच आहेत. त्यांना भाजप विरोधात बंडखोरी करायला लागणारी कुमक अशोक गहलोत कॉग्रेस मुख्यालयात बसून पुरवू शकतील. आणि सचिन पायलट यांचेवरही अंकुश ठेवू शकतील.

निवडणूक पूर्व काळात सचिन पायलट मुख्यमंत्री राहीले तर ते प्रचारात हिरीरीने भाग घेऊन पून्हा सत्ता आणण्यासाठी धडपडतील. शिवाय दिल्लीत बसून पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून तिकीट वाटपात हस्तक्षेप करणे आणि आपल्या माणसांची वर्णी लावणे सोपे जाईल. सचिन पायलट चे पायात बेड्या ठोकून लगाम घालता येईल. एकाच दगडात अनेक कावळे मारता येतील. म्हणजे बघा अशोक गहलोत पक्षाध्यक्ष झाले तर जून्या जाणत्या नेत्याला आणि गांधी घराण्याचे बाहेरील व्यक्तीला पक्षाध्यक्ष केल्याचे श्रेय सोनिया गांधी यांना मिळेल. जी 23 ग्रुप थोडा समाधानी होईल. सचिन पायलटलाही मुख्यमंत्री पद देऊन शांत करता येईल.

सचिन पायलटचे सासरे यांचेमार्फत भारतविरोधी कारवायाही चालू ठेवता येतील. पक्षाची सर्व सुत्रेही गांधी परिवाराचेच हाती अप्रत्यक्ष एकवटतील. भाकरी फिरवल्याचे पून्य पदरात पडेल. वसुंधरा राजे यांना उचकावत भाजपला राजस्थानात जेरीस आणता येईल. शिवाय वसुंधरा राजे यांचे राजकारण संपवता येईल. आणि अशोक गहलोत ही सर्वोच्च पक्षपद मिळाले म्हणून खुष होतील.

महाराष्ट्रातील पंकजाताई मुंडे-पालवे आणि वसुंधरा राजे यांची राजकारणातील स्थिती सध्या सारखीच आहे. कोणावरच विश्वास नाही आणि स्वतःला सिध्दही करायचे नाही. फक्त जे दिसेल ते मला मिळालेच पाहीजे असा हट्ट करत राहयचा आणि मग माझेवर अन्याय होत आहे, मला सतत डावलले जात आहे असे ओरडत राहायचे.

बघू आता सोनिया गांधी काय आणि कसा निर्णय घेतात ते. गांधी परिवार खरेतर भारताबाहेर पळायची संधी शोधत आहे. परंतु प्रियांका वड्राचे पतीच्या असंख्य एकर जमिनीमुळे ते जमत नाही. पण लवकरच तब्येतीचे आणि ट्रिटमेंटचे नावाखाली गांधी परिवार पलायन करण्याचा दाट शक्यता आहे. जर गांधी परिवार चीनमध्ये आश्रित म्हणून गेला तर भारत सरकार काय करील हे पाहणे महत्वाचे ठरेल.

# निवडणूक : समज गैरसमज



प्रा.श्रावण देवरे
संपर्क क्र. 8830127270

आधुनिक केसरी

**"ओबीसी राजकीय आघाडी" तर्फे येणाऱ्या निवडणूकांमध्ये उमेदवार उभे करीत असतांना कार्यकर्त्यांकडून जे अनेक मुद्दे उपस्थित केले जात आहेत, त्यातून हे सिद्ध होते की गेल्या 75 वर्षांच्या स्वातंत्र्यात प्रस्थापित जातींनी व त्यांच्या राजकीय पक्षांनी जनतेचे कुप्रबोधन केले आहे. आपल्या जात-वर्गीय स्वार्थापोटी त्यांनी निवडणूकांचा संबंध लोकशाहीशी जोडण्याऐवजी तोडण्याचेच काम केलेले आहे. लोकशाही मार्गाने निवडणूका लढवणे, याचा अर्थ असा होतो की, वेगवेगळ्या विचारसरणींचा निकोप मार्गाने प्रचार-प्रसार करणे व त्या आधारावर चळवळी करून निवडणूका लढविणे. जी विचारसरणी जनतेने अधिक प्रमाणात स्वीकारली असेल, त्या विचारांच्या पक्षाचे उमेदवार मोठ्या संख्येने निवडून येतील व सत्ता मिळवतील. भारतीय संविधानाने स्वातंत्र्य, समता व मित्रता, धर्मनिरपेक्षता व वैज्ञानिक दृष्टीकोन ही मूलभूत तत्वे स्वीकारली असली तरी या मूलभूत तत्वाच्या विरोधात असलेल्या विचारसरण्यांवर व त्याआधारित संघटना-पक्षांवर बंदी घातलेली नाही. त्यामुळे संविधानाला व संविधानाच्या मूलभूत तत्वांना विरोध करणाऱ्या आर.एस.एस. सारख्या संघटना याच मूलभूत तत्वांचा गैरवापर करीत फोफावल्या व सत्तेत बसल्यात.**

युरोपमध्ये नव्या उगवत्या भांडवलदारवर्गाने सत्तेचा सदुपयोग करीत आपल्या व जनतेच्या हिताची महाप्रबोधनाची चळवळ (रेनेसान्स मुव्हमेंट) मोठ्याप्रमाणात राबविली. या महाप्रबोधन चळवळीमुळे जनतेच्या मनातील जुने सरंजामी विचार व तत्वज्ञान निष्प्रभ झालेत. जुन्या रूढी-परंपरा कायद्यानेच बंद करण्यात आल्यात. त्यामुळे जुन्या सरंजामी वर्गाची सत्ता मूळातूनच उखडून फेकून देण्यात आली. पुरोगामी कायदे केवळ कागदावर न राहता जनतेने त्या कायद्यांची अमलबजावणी मोठ्या मनाने स्वीकारली. हा सगळा बदल होत असतांना जुन्या विचारसरणीच्या सरंजामी नेत्यांनी व चर्चसारख्या धर्मसंस्थांनी विरोध केलाच! मात्र हा विरोध प्रबोधित झालेल्या जनतेने मोडून काढला व खरीखूरी लोकशाही जनतेत रूजली. आज युरोपमध्ये वंशवाद अधूनमधून डोके वर काढीत असतो, मात्र सर्वसामान्य जनता अशा वंशवादाला रस्त्यावर उतरून ठेचून टाकते, हे आपण अमेरिकेत नुकतेच घडलेल्या जॉर्ज फ्लॉयड(George Floyd) प्रकरणावरून सिद्ध होते. शासनाने काळ्या जॉर्ज फ्लॉयडच्या मृत्युला कारणीभूत असलेल्या गोऱ्या पोलीसाला ताबडतोब निलंबित केले. ही झाली कायद्याची ताबडतोब अमलबजावणी. परंतु कायद्यात नसतांनाही संपूर्ण पोलीस डिपार्टमेंटने गुढघ्यावर झूकून समस्त काळ्या जनतेची माफी मागीतली. तसेच त्या गोऱ्या पोलीसाच्या गोऱ्या बायकोने आपल्या अत्याचारी नवऱ्याला घटस्फोटही दिला. हे आहेत महाप्रबोधन चळवळीचे सुपरिणाम! या चळवळीमुळे जनतेने स्वेच्छेने पुरोगामी विचार स्वीकारलेत व अमलातही आणलेत. त्यामुळे डोनॉल्ड ट्रम्प सारख्या प्रतिगामी सत्ताधाऱ्यांनाही पुरोगामी विचारांपासून ढळता आले नाही.

**उत्तरार्ध**

युरोपातील महाप्रबोधनाच्या चळवळीतून घडलेले ब्रिटिश लोक भारतात राज्यकर्ते म्हणून आल्यावर त्यांनी सतीप्रथा, विधवाविवाह, जरठविवाह सारख्या अन्यायी व क्रूर प्रथा बंद करण्यासाठी कायदे केलेत, मात्र प्रशासनात दुय्यम सत्ताधारी असलेल्या ब्राह्मणांनी विरोध केला. महाप्रबोधनाचे द्वार उघडणाऱ्या फुले, शाहू, आंबेडकर, आगरकर, राजाराम मोहन रॉय आदि क्रांतीकारक व सुधारकांना ब्रिटिशांनी सत्तेचे संरक्षण दिले. या महाप्रबोधनातून भारतात लोकशाही, समाजवाद, समतेचे विचार रूजलेत. त्याच्या परिणामी आपल्याला बाबासाहेब आंबेडकरांकडून लोकशाहीवादी व जातीविरोधी संविधान मिळाले. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतीय जनतेने पुरोगामी विचारांच्या नेहरूंना प्रधानमंत्री केले, मात्र नेहरूंनी सत्तेचा उपयोग जनतेत पुरोगामी विचार रूजविण्यासाठी केलाच नाही. समस्त स्त्रीयांना समतेचे हक्क देणाऱ्या बाबासाहेब आंबेडकरप्रणित हिंदूकोड बीलाला नेहरूंनी पाठींबा दिला नाही. जमीनदारांच्या विरोधात आंदोलन करणाऱ्या तेलंगनाच्या भूमीहिन



शेतकऱ्यांचे आंदोलन मिलिट्री टाकून चिरडून टाकले. जनतेतील 52 टक्के संख्या असलेल्या ओबीसींचा काका कालेलकर आयोग बासनात गुंडाळला, अशा अनेक संविधानविरोधी निर्णयातून नेहरूंनी देशात प्रतिगामी विचारांना प्रोत्साहन दिले व संघ-भाजपासारख्या प्रतिगामी ब्राह्मणी शक्तींना सुपीक जमीन उपलब्ध करून दिली. नेहरूंनी विज्ञानाचा सहारा घेऊन मोठमोठे कारखाने व अणूभट्टीसारखे उपक्रम सुरू केलेत, मात्र वैज्ञानिक दृष्टीकोन निर्माण होण्यासाठी एकही कार्यक्रम हाती घेतला नाही. याउलट सोरटी सोमनाथ मंदीराचा जिर्णोद्धार शासकीय इतमामात करण्याचा कार्यक्रम हाती घेऊन अंधश्रद्धेला प्रोत्साहन दिले. गांधीजींचा खून करणाऱ्या संघावर तात्पुरती बंदी आणली, मात्र कोणत्याही ठोस कारणाशिवाय बंदी उठवली व कायमचे मोकळे रान करुन दिले.

नेहरूंनी निवडणूकांचं राजकारण लोकशाही पद्धतीने न करता धर्म व जातीच्या पद्धतीने केले. त्यामुळे राजकीय हेतूने जाती संघटना व धर्मसंघटना फोफावल्या. मराठा, जाट ठाकुर सारख्या सरंजामदार घराण्यांना दुय्यम सत्तेचा तुकडा देऊन जातीव्यवस्था बळकट केली व भांडवलदारांच्या हिताचे निर्णय घेऊन जातीय व वर्गीय शोषणव्यवस्थेला बळकटी दिली. त्यामुळे निवडणूका जिंकण्यासाठी जात व पैसा लागतो, हा सोयिस्कर गैरसमज जनतेत रूजवीला गेला. कालेलकर आयोग नाकारल्यामुळे देशाच्या अर्ध्यापेक्षाही जास्त लोकसंख्या असलेल्या ओबीसी जाती मुख्य विकासाच्या प्रवाहात आल्याच नाहीत. त्यामुळे निवडणूकांसह सर्वच लोकशाही प्रक्रीयेपासून या जाती वंचित राहील्यात.

माळी, धनगर सारख्या ओबीसी जाती संख्येने निर्णायक मतदान असूनसुद्धा आपले उमेदवार निवडून आणु शकत नाहीत, याचे कारण त्यांचे लोकशाहीकरण होऊच दिले नाही. आजही आम्ही एखादा माळी, धनगर उमेदवार उभा करण्याचा प्रयत्न करतो, तेव्हा ह्या ओबीसी जातीचे लोक म्हणतात- 'निवडणूक लढणे आपले काम नाही.'

ओबीसी, दलित, आदिवासी, मुस्लीम आदी समाजघटकातील व्यक्तीला एखाद्या राजकीय पक्षाने तिकीट दिले तरच ते निवडून येतात, अन्यथा ते निवडून येत नाहीत. या प्रस्थापित पक्षातर्फे निवडून आलेले ओबीसी, दलित, आदिवासी व मुस्लीम उमेदवार आपापल्या पक्षातील उच्चजातीय नेत्यांचे गुलाम असतात. त्यामुळे ते जन्म देणाऱ्या समाजाच्या हितासाठी काम करतच नाहीत, त्यांच्या पक्षांच्या उच्चजातीयांच्या हितासाठी काम करतात.

स्वातंत्र्याच्या 75 वर्षात शेकडो आमदार-खासदार शूद्रअतिशूद्र जातीतून निवडून आलेत, मात्र या जातींचा विकास झालाच नाही. त्यामुळे हिंदू कोड बील, कालेलकर आयोग, जमीनीचे फेवाटप, उद्यागधंदे आदीं पुरोगामी कायदे होउनही त्यांची अमलबजावणी झाली नाही.

धनदांडग्यांच्या व जातदांडग्यांच्या जातीय प्रभावाखालील राजकारणात काही पुरोगामी विचारांनी चळवळीच्या माध्यमातून थोडी का होईना मुसंडी मारली व काही राज्यांमध्ये सत्ता प्राप्त केली. समाजवाद्यांनी उत्तरप्रदेश, बिहार काबीज केला. मार्क्सवाद्यांनी पश्चिम बंगाल व केरळ घेतला, फुलेवादी अब्राह्मणी चळवळ करणाऱ्या ओबीसींनी तामीळनाडूत कायमस्वरूपी सत्ता काबीज केली आहे. त्यामुळे निवडणूका जिंकण्यासाठी पैसाही लागत नाही व प्रस्थापित पक्षाचे तिकीटही लागत नाही, हे सिद्ध होते. वैचारिक चळवळ उभी करून झालेल्या जनजागृतीच्या आधारे आपण आपापल्या समाजघटकांचे उमेदवार निवडून आणू शकतो. हेच निवडून आलेले उमेदवार आपापल्या समाजघटकाच्या हितासाठी विधानसभेत-लोकसभेत कायदे करतील व ते अमलात आणण्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्नही करतील.

गांधीवादाच्या वेषात लपलेल्या टिळक-सावरकरवादी ब्राह्मणी विचाराने काँग्रेसच्या माध्यमातून देशात सत्ता गाजवीली. काँग्रेसने सत्तेचा वापर करून ब्राह्मणी विचारांना प्रोत्साहन दिले. त्यामुळे समाजवादी, मार्क्सवादी, फुलेवादी व आंबेडकरवादी या सर्व डाव्या-पुरोगामी विचारांच्या चळवळी कमजोर झाल्यात. काँग्रेसने सुपीक जमीन उपलब्ध करून देताच टिळक-सावरकरी ब्राह्मणवादाने गांधीवादाचा बुरखा काढून टाकला व हिंदूत्वाचा पारदर्शक वेष धारण करून उघडा-नागडा वैदिक-सनातनवाद पुढे आणला. आज सत्तेत आलेला संघ-भाजपाचा उघडा-नागडा ब्राह्मणवाद सत्तेचा वापर करीत जातीव्यवस्थेचे पुनरूज्जीवन करीत आहे. दलित+आदिवासी+ओबीसींच्या हिताच्या कायद्यांची अमलबजावणी थांबलेली आहे. मनुस्मृतीचे उदात्तीकरण सुरू झालेले आहे. मुस्लीम दलितांचे लिचिंग सुरू आहे.

संघ भाजपा आपला ब्राह्मणवाद मजबूत करण्यासाठी केवळ मनुस्मृतीचा उपयोग करीत नाहीत, तर या नव्या जातीव्यवस्थेचा आर्थिक कणा मजबूत करण्यासाठी ते भांडवलशाहीच्या अर्थशास्त्राचाही उपयोग करीत आहेत. कारण कोणतीहि समाजव्यवस्था आर्थिक कणा मजबूत असल्याशिवाय टिकत नाही. म्हणुनच बाबासाहेब आंबेडकरांनी ब्राह्मणशाही व भांडवलशाही हे दोन शत्रू असल्याचे सांगीतले आहेत. त्यामुळे संघभाजपाच्या जातीय-वर्गीय आक्रमणाला पराभूत करण्यासाठी आपल्याला नव्या राजकीय पक्षाची उभारणी करावी लागणार आहे. त्याची सुरूवात आपण ''ओबीसी राजकीय आघाडी'' स्थापन करून केलेली आहे. येत्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीत योग्य प्रतिसाद मिळाला तर या राजकीय आघाडीला क्रांतीकारी पक्षात रूपांतरीत करता येईल.

## तिरंगा माझी शान



तिरंगा माझी शान आहे तिरंगा माझी शान,
एक मुखाने सारे गाऊ भारत देश महान...
तिरंगा माझी शान... ।। धृ ।।

याच भूमीवर रामायण रचिले
याच भूमीवर महाभारत घडले
याच भूमीला लाभले हो संतांचे वरदान
एक मुखाने सारे गाऊ भारत देश महान...
तिरंगा माझी शान... ।।१।।

याच भूमीवर राजे जन्मले
याच भूमीवर स्वातंत्र्याचे स्वप्न पाहिले
जमवून मावळे त्यांनी घडविला मोठा रणसंग्राम
एक मुखाने सारे गाऊ भारत देश महान...
तिरंगा माझी शान.. ।।२।।

याच भूमीवर इंग्रज आले
याच भूमीवर विराजमान झाले
याच भूमीवर इथले काही झाले हो बेईमान
एक मुखाने सारे गाऊ भारत देश महान...
तिरंगा माझी शान.. ।।३।।

काळ गेला तशी वेळ गेली
अन् देशाला माझ्या जाग आली
जागोजागी पेटू लागले स्वातंत्र्याचे प्राण
एक मुखाने सारे गाऊ भारत देश महान...
तिरंगा माझी शान.. ।।४।।

सळो की पळो मग इंग्रज झाले
गुलामगिरीतून भारताला मुक्त केले
लाखो वीरांनी देशासाठी दिले हो बलिदान
एक मुखाने सारे गाऊ भारत देश महान...
तिरंगा माझी शान.. ।।५।।

याच भूमीत जन्मले साहेब
अन् येथून इंग्रज झाले गायब
इथेच लिहिले आहे त्यांनी भारताचे संविधान
एक मुखाने सारे गाऊ भारत देश महान...
तिरंगा माझी शान.. ।।१।।

गजेंद्र ढवळापुरीकर
संपर्क क्र. : 9623714011

## मै सैनिक हूँ



पहाडोसे लढनेवाला
चट्टानोसे झगडनेवाला
सिनातानके खडा हूं
दुष्मनोसे अडा हूँ
मै सैनिक हूँ
धरती मेरी माँ है
अंबर मेरा पिता
फर्क कहा करता मै
कुराण और गीता
हर रंग मेरा और मै
हर रंग का हूँ मै...
देश मेरी शान है
वतन मेरा मान है
देश के लिये सदा
हथेली पे जान है
रात दिन जगता हूँ मै
ताकी आप चैन से सोये
इस मिट्टी के लिये
न जाने कितनो ने अपने बेटे खोये
जाकी बाजी लगाकर
मै हर दिल मे जिंदा हूँ
मै सैनिक हूँ
रखवाली करते करते देश की
हम भी शहीद हो जायेंगे
तिरंगेमे लिपटकर
सरहद से गावं आयेंगे
सिंदूर मिटाके बिवी मेरी
रो रो के गिरेगी
छाती पिट पिट कर
बुढी मॉं जिंदा रहेकर भी मरेगी
चिता पे डालकर जब
शव मेरा जलेगा
सौगंध भारत की
हर घर देशभक्त मिलेगा
शहीद होकर मै आज
देशभक्ती का बीज बोया हूं
चिखो चिल्लावो मत यारो
क्योकी आज पहिली बार मै
चैन की निंद सोया हूँ
हर ऑख में आसू थे
और हर एक हमारा अपना था
तिरंगा नसीब हो कफन के लिये
ये तो मेरा सपना था

-किरण हरिश्चंद्र निकम
संपर्क क्र. : 9595955736

## संपत आलेल्या चिवड्यात देखील, मीठ जास्त असते

स्वछंद जगण्यासाठी, वयाची मर्यादा नसते,
अहो संपत आलेल्या चिवड्यात देखील, मीठ जास्त असते || धृ ||

Maturity च्या नावाखाली, आपण करतो मिश्किल स्वभावाचा त्याग,
आतल्या आत झुरत राहते, ह्या विरहाची आग,
केवळ लोक लज्जेखातर, मनातली इच्छा मारायची नसते,
अहो संपत आलेल्या चिवड्यात देखील, मीठ जास्त असते || 1 ||

मनसोक्त हसणारा तू आज, फक्त गालातल्या गालातच हसतो,
सुरांच्या मैफिली बसवणारा तू आज, फक्त घरातच गुणगुणत बसतो,
मनात वळवळणाऱ्या किड्याची वळवळ, कोणाकारता थांबवायची नसते
अहो संपत आलेल्या चिवड्यात देखील, मीठ जास्त असते || 2 ||

Perfectionist होण्याच्या हव्यासापायी, आपण फारच व्यस्त असतो,
छोट्याछोट्या सुखांकडेही , दुर्लक्ष करून बसतो,
चुका न होण्याची खात्री, कुठल्याच वयात नसते,
अहो संपत आलेल्या चिवड्यात देखील, मीठ जास्त असते || 3 ||

दादा, मामा, बाबा, आबा, असा चढत्या नात्यांचा आलेख
चाळीशीत हे शोभत का?, साठीत असे वागावे का? ,
होतो अशा वाक्यांचा उल्लेख,
वयाच्या आणि नात्यांच्या बंधनात फार अडकायचे नसते
अहो संपत आलेल्या चिवड्यात देखील, मीठ जास्त असते || 4 ||

व्यावहारिक जीवनाच्या, साचेबद्ध चौकटीतच आपण फसतो
दुसऱ्याच्या चष्म्यातून बघताबघता , आपण आपलीच दृष्टी हरवून बसतो
आपल्या जगण्याची दिशा, दुसऱ्याच्या सांगण्यावरून ठरवायची नसते,
अहो संपत आलेल्या चिवड्यात देखील, मीठ जास्त असते || 5 ||

एकदा अनुभवातरी हे जग, चौकटीच्या बाहेरून,
बिनधास्त जगा, सर्व बंधन मर्यादा झुगारून
मानवी देह मिळण्याची खात्री, प्रत्येक जन्मात नसते
अहो संपत आलेल्या चिवड्यात देखील, मीठ जास्त असते || 6 ||

-डॉ. चंद्रकांत वाळके

## बैलपोळा



श्रावण पिठोरी अमावस्येला
सजवितो हो बैलाला
डोळे माझे भरून येती
कष्टाने ज्यांनी पिकवली माती
हृदयात त्यांच्याप्रती प्रेम
मनापासून करतो पूजन
मानाने मिरवितो पोळ्याला
सर्जा राजा माझे महान
पालन पोषण करा प्रेमाने
नका होऊ कृतघ्न
कृतज्ञता मनात बैलांप्रती
कृषक संस्कृतीचा खरा धर्म

-सुनिल माथने, संपर्क क्र. : 9403282970.

## बैलपोळा आनंदाचा

सर्जा राजाची बैलजोडी सजली
गावा आनंदे मिरवून पुजली ॥ धृ॥

राब राबती शेतामध्ये आनंदे
कष्ट सदैव मातीमध्ये स्वानंदे
बळीराजाची स्वप्नशेती रुजली ॥१॥

शिंगे रंगली बाशिंगही बांधले
झुल चढली अंगीखांदी शोभले
पूजा करूनी पायी पुष्प अंजली ॥२॥

दिन विसावा बैलपोळा आजचा
कष्ट कष्टाचा दिनक्रम रोजचा
कीर्ति कार्याची मनोमनी गुंजली ॥३॥

घाम गाळतो पिकवतो शेतीला
मिळे नवेली हिरवाई मातीला
शालू हिरवा नववधू लाजली ॥४॥

सण सुखाचा बैलपोळा साजरा
करा कार्याला मनातून मुजरा
अशी बैलजोडी वर्षावात भिजली ॥५॥

मिरवणूक उधळली सुखात
गोड घास पुरणपोळी मुखात
गळा मंजुळ घंटामाळ वाजली ॥६॥

सौ . शामला पंडित (दीक्षित)
प्रणाली प्रकाशन, चिंचवड

## बैलांचा सण पोळा

हर्षाचा उल्हासाचा
आज सण बैलपोळा
सर्जा-राजाचा
आनंदाचा सोहळा

मखमली झुलीचा साज
गळ्यात कवड्याच्या माळा
पायात घुंगराच्या वाळा
वाजती खळखळा

हिरवे-तांबडे बाशिंग
शोभती कपाळी
आज नुसता आराम
खाऊनी पुरणपोळी

त्याच्या अपार कष्टानं
पिकते काळी माती
बळीराजासोबत जपतो
माणुसकीची नाती

राब राब राबूनी
आयुष्याचं करतो सोनं
त्यावरी लळा लावूनी
चला जपूया पशूधन

- रवींद्र व्ही. चालीकवार
महागाव, जि. यवतमाळ
संपर्क क्र. : 9011559106



## बाप

सगळे म्हणतात
आईची ती वेडी माया,
आठवा जरा त्या बापाला
जो धरतो घरावर
प्रेमाची छाया.
तो बापच असतो
जो आपल्याला घडवतो
तो बापच असतो
जो आपल्याला वाढवतो.
रविवारच्या सुट्टीत
जो बागेत नेतो तो बाप
लेकरांचा आनंद पहाण्यासाठी
जो तळमळतो तो बाप
जरी वरून
बापाला राग आला
तरी अंतरी त्यांच्या
वाहतो प्रेमाचा झरा
त्या प्रेमाच्या झऱ्याला आठवा
राग निवळल्यावर
जवळ घेतो की नाही ते पहा
जन्मलेल्या त्या जीवाचा
पहिला शिक्षक असतो बाप
वरून थोडा कडक
आत कोमल कापसासारखा
असतो तो बाप
संकटाच्या वेळी
जो धीर देतो तो बाप
आनंदाच्या वेळी
आनंद देणारा तो बाप.

-कु. प्रज्ञा सुनील अंडुरे, उमापूर, जि. बीड

## "जीवनाचे ध्येय"



दुःखात आज मी
मर्म गीत गातो
सुख मिळवाया
आभाळ बांधतो ।।१।।

बियाणे पेरुनी
शेत नांगरतो
पाऊस आजही
फडशा पाडतो ।।२।।

तिर्थ माझे माय
बाप वाली होतो
पंढरपुराला
अनवाणी जातो ।।३।।

बंधू माझा राम
कृष्ण सखा होतो
सुदाम्याचे पोहे
आवडीने खातो ।।४।।

जीवनाचे ध्येय
साधण्या पाहतो
वेळ काळ कैसा
हिरावून नेतो ।।५।।

-प्रदीप बडदे,
नवी मुंबई
मो. ९५९५०२७९९५

# चीन तायवान तणावावर भारताची भूमिका



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**अहवालानुसार, तैवान भेटीमुळे अमेरिका आणि चीन यांच्यातील तणावादरम्यान अनेक आंतरराष्ट्रीय प्रतिक्रिया येत आहेत. पण, भारताने या संपूर्ण प्रकरणात 'वैचारिक मौन' बाळगण्याचा निर्णय घेतला आहे. परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांनीही कंबोडियात भारत-आसियान मंत्रीस्तरीय बैठकीत या विषयावर कोणतेही वक्तव्य केले नाही. रशिया युक्रेन युद्धाच्या पार्श्वभूमीवर भारताने दोन्ही देशांना शांतता राखण्याचे आवाहन केले आहे. पण, तैवानच्या बाबतीत भारताने असे कोणतेही वक्तव्य केलेले नाही.**

अमेरिकेच्या प्रतिनिधी सभेच्या अध्यक्षा नॅन्सी पेलोसी यांच्या नुकत्याच झालेल्या तैवान दौऱ्यानंतर चीनने तैवान प्रदेशात लष्करी सराव तीव्र केला आहे. जर युद्ध झाले तर केवळ चीन आणि तैवानलाच त्रास होईल असे नाही तर संपूर्ण जगासाठी ही समस्या बनू शकते कारण तैवानचे जगातील 50 टक्के सेमीकंडक्टर मार्केटचे नियंत्रण आहे. चीन आणि तैवानच्या मुद्द्यावर, भारतीय परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते अरिंदम बागची यांनी एका पत्रकार परिषदेत सांगितले की , " इतर देशांप्रमाणेच भारतालाही याची चिंता आहे (तैवान आणि चीनमधील वाढता तणाव). आम्ही दोन्ही बाजूंनी संयम बाळगण्याचे आवाहन करतो, स्थिती बदलण्यासाठी एकतर्फी कारवाई टाळावी, तणाव कमी करावा आणि प्रदेशात शांतता आणि स्थिरता राखण्यासाठी प्रयत्न करावेत."
परराष्ट्र मंत्रालयाने (MEA) चीन आणि तैवानला संयम बाळगण्याचे आवाहन करून, भारताला तैवानमधील घडामोडींची चिंता आहे.
एएनआयच्या वृत्तानुसार, वन चायना धोरणावर भारताच्या भूमिकेवर विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना बागची म्हणाले, "यामधील भारताची संबंधित धोरणे सुप्रसिद्ध आणि सुसंगत आहेत आणि त्यांची पुनरावृत्ती करण्याची गरज नाही."
अमेरिकेच्या संसदेच्या अध्यक्षा नॅन्सी पेलोसी यांच्या तैवान दौऱ्यानंतर, जिथे रशिया, पाकिस्तान आणि श्रीलंका यांनी चीनच्या समर्थनार्थ विधाने केली आहेत, भारत या प्रकरणी अत्यंत सावध पाऊल उचलत आहे.

अमेरिकन नेत्याच्या भेटीमुळे संतप्त झालेल्या चीनने तैवानजवळ लष्करी सराव सुरू केला एवढेच नव्हे तर आता तर चीनने तैवानच्या हद्दीत विमाने तैनात केलीत. . चीनने तैवानच्या ईशान्य आणि नैऋत्य सीमेजवळील समुद्रात अनेक डोंगफेंग क्षेपणास्त्रे डागली. नॅन्सी पेलोसी यांच्या भेटीनंतर, चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाने त्वरित प्रतिक्रिया दिली, "जे आगीशी खेळत आहेत त्यांना जाळून टाकले जाईल." गेल्या 25 वर्षांत अमेरिकेतील एवढ्या मोठ्या दर्जाच्या व्यक्तीने तैवानला भेट दिली नव्हती.
मात्र, या संपूर्ण प्रकरणावर भारताकडून कोणतीही प्रतिक्रिया आलेली नाही. दरम्यान, भारताचे परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांनी अमेरिकेचे परराष्ट्र सचिव अँटनी ब्लिंकन यांचीही भेट घेतली, मात्र चीनबाबत कोणतेही वक्तव्य आले नाही. द हिंदू या इंग्रजी वृत्तपत्राने चीन आणि तैवानमधील वादात भारताच्या भूमिकेबद्दल एक विशेष लेख प्रकाशित केला आहे.
वरिष्ठ पत्रकार सुहासिनी हैदर आणि अनंत कृष्णन यांच्या या लेखात असे म्हटले आहे की, सीमावादावर सुरू असलेल्या चर्चेच्या या संवेदनशील वेळी भारताला चीनसोबत कोणताही वाद निर्माण करायचा नाही. मात्र, भारतही 'वन चायना पॉलिसी'ला आपला पाठिंबा व्यक्त करू इच्छित नाही.
अहवालानुसार, तैवान भेटीमुळे अमेरिका आणि चीन यांच्यातील तणावादरम्यान अनेक आंतरराष्ट्रीय प्रतिक्रिया येत आहेत. पण, भारताने



या संपूर्ण प्रकरणात 'वैचारिक मौन' बाळगण्याचा निर्णय घेतला आहे. परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांनीही कंबोडियात भारत-आसियान मंत्रीस्तरीय बैठकीत या विषयावर कोणतेही वक्तव्य केले नाही. रशिया युक्रेन युद्धाच्या पार्श्वभूमीवर भारताने दोन्ही देशांना शांतता राखण्याचे आवाहन केले आहे. पण, तैवानच्या बाबतीत भारताने असे कोणतेही वक्तव्य केलेले नाही. भारताच्या निर्णयाची कारणे वृत्तपत्राने लिहिले आहे की, भारतीय अधिकारी आणि तज्ज्ञांच्या मते, भारत जाणूनबुजून कोणतेही विधान करण्याचे टाळत आहे कारण अशा संवेदनशील मुद्द्यावर अमेरिका आणि चीन यांच्यातील वाद टाळायचा आहे. त्याच वेळी, भारताने या क्षेत्रातील इतर देशांप्रमाणे किमान 2010 पासून "एक चीन" धोरणाचा संदर्भ घेणे बंद केले आहे.
एस जयशंकर भारत-आसियान शिखर परिषदेत सहभागी झाले होते. येथे त्यांनी अमेरिका, ऑस्ट्रेलिया, श्रीलंका आणि व्हिएतनामच्या परराष्ट्र मंत्र्यांची भेट घेतली. जयशंकर यांनी या चर्चेचे वर्णन "उत्पादक" आणि "उबदार" असे केले आणि सांगितले की त्यांनी इंडो-पॅसिफिक, कनेक्टिव्हिटी, कोविड-19, दहशतवाद, सायबर सुरक्षा, युक्रेन आणि म्यानमार यासह आसियान देशांशी अनेक मुद्द्यांवर चर्चा केली आहे. मात्र, त्यांच्या वक्तव्यात तैवानचा उल्लेख नव्हता.
त्याचवेळी अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री अँटोनी ब्लिंकन यांनीही या प्रकरणी कोणतेही वक्तव्य केलेले नाही. ते म्हणाले की, दोन्ही देशांनी जागतिक आणि प्रादेशिक मुद्द्यांवर विचार विनिमय केला. यात रशियाचा युक्रेनवरील हल्ला आणि जगभरातील अन्न संकट यासारख्या मुद्द्यांचा समावेश होता. नॅन्सी पेलोसी यांच्या काळातील चीनची तीक्ष्ण प्रतिक्रिया लक्षात घेऊन भारताने हा निर्णय घेतल्याचे अधिकारी आणि तज्ज्ञांचे म्हणणे आहे. माजी वरिष्ठ निवृत्त अधिकारी म्हणतात, "चीनचा विरोध आणि पाठिंबा या दोन्ही गोष्टी टाळण्यासाठी भारताने मौन हा सर्वोत्तम प्रतिसाद मानला आहे." भारत १९४९ पासून एक चीन धोरणाचा अवलंब करत आहे.मात्र गलवान संघर्षानंतर वन चायना धोरणाबाबत भारताची भूमिका तटस्थ आहे. एकेकाळी चीनच्या वन चायना धोरणाला पाठिंबा दिला होता, पण गलवानमधील हिंसक संघर्षानंतर भारताची भूमिका बदलली आहे. एवढेच नाही तर तैवानच्या तत्कालीन राष्ट्राध्यक्षांच्या शपथविधीमध्येही दोन खासदार अक्षरशः सहभागी झाले होते.
गेल्या काही वर्षात ज्या प्रकारे चीन भारताच्या लडाख आणि अरुणाचल प्रदेशच्या सीमेवर घुसखोरी करून भूसंपादन करण्याचा प्रयत्न करत आहे, त्यानंतर भारत त्याला पाठिंबा देईल हे कसे शक्य आहे का.? तसेच, जेव्हा जेव्हा काश्मीरचा प्रश्न निर्माण होतो तेव्हा चीन पाकिस्तानच्या समर्थनात असतो.या पार्श्वभूमीवर भारताने 'वन चायना धोरणा'बाबत स्पष्ट भूमिका न घेता वैचारिक मौनबाळगणे पसंद केले आहे.

# अशी असावी सासू

आधुनिक केसरी

**सासू या नात्याला लग्न होण्या अगोदर प्रत्येक नवविवाहिता घाबरते, पण प्रत्येक सासू ही एक आदर्श आईसुद्धा असते हे सर्वजण विसरतात. आपण जर तिचं आईपण सांभाळलं तर सासूएवढी प्रेमळ आई तुम्हाला कधीच समजणार नाही.**

मलाही लग्न झाले की आता माझं काय होणार हा भीतीचा प्रश्न मनात घोळत होता, आता आपली अग्निपरीक्षा आहे आणि आपण त्यातून कसे मेरीट येतो हा प्रश्नच होता. लग्न झाल्यावर आपण एका अनोळखी कुटुंबात पाऊल ठेवतो, तेथील सगळं कसं पुर्वीच्या आयुष्यापेक्षा वेगळं असतं, माणसं वेगळे, स्वभाव वेगळे, वातावरण वेगळे आणि या परिस्थितीत स्वतःला सेट करणे म्हणजे संपुर्ण नारी जातीसमोर एक आव्हानच असते असे मला वाटते. हे आव्हान स्विकारण्यास मी मनाची संपुर्ण तयारी केली होती, पण एकदम पुर्वीच्या सवयी बदलणे थोडे अवघड असते हे खरे, मला आठवतंय माझा पहिला स्वयंपाक घरातला दिवस मला सासूबाईंनी भाताचा कूकर लावण्यास सांगितला, इथे माणसांचा अंदाज चुकला की आपले संस्कार बाहेर येणार हे सर्व स्त्रीयांना माहित असते पण तरीही भितीने अंदाज चुकतोच, आणि चुकलाही दोन डबे भरून भात झाला आणि काय, म्हंटल आता माझं काही खरं नाही, पण चुलत सासूने लगेच सांभाळून घेतलं व हसत चला उद्याच्या नाश्त्याची सोय पण सुनबाईने केली अस सावरून घेतलं.
मला रर हुश्यच झालं...
माही सासूबाई म्हणजे एक आदर्श सासूचे उदाहरण सर्वांनी घ्यावयास हरकत नाही, त्यांचे शिक्षण जरी कमी असले तरी व्यवहारज्ञान व इतर बाबतीत त्या खूपच पुढे आहेत, आपण जर त्यांच्या कलेने घेतले तर त्यांना आपलसं करणे खूप सोप्पे असते, त्यांनाही आपण सासू आहोत याचा अभिमान असतोच त्यामुळे कुठे कसं वागायचं हे जमले की तुम्हाला कोणतीच अडचण येत नाही, मला दोन मुलं आहेत व माझे सासू-सासरेच त्यांच्यावर संस्कार करतात, मुलांना आजी-आजोबांएवढे संस्कार दुसरे कोणीच देवू शकत नाही. मी तर म्हणेल ज्या मुलांना आज्जी-आजोबाचे प्रेम मिळते ते खूप नशीबवान असतात.
रोज मला सांभाळून घेणारी मला कधी प्रेमानी तर कधी ओरडून समजावून सांगणारी कधी माझी बहिण, कधी मैत्रिण तर कधी साथीदार बनून नेहमी मला सांभाळून घेणारी अशी माझी आई माझी सासुबाई. प्रत्येक मुलीचं स्वप्न असतं आपल्याला नवरा चांगला भेटावा व त्यापेक्षाही महत्त्वाचे म्हणजे त्या परिवारातील सर्व म्हणजे दिर-भावजय, ननंद, सासरे यांचा स्वभाव चांगला, समजून घेणारा हवा पण हाताची पाची बोटं जशी सारखी नसतात त्याचप्रमाणे सर्व घरांत विविध स्वभावाचे लोकं असतात पण जर आपण सर्वांना व्यवस्थीत हँडल केले तर तुम्हाला कोणताच त्रास होणार नाही, प्रत्येक आई-बापाला आपली मूलगी सासरी सुखात पहायची असते, पण त्यांनी जर मुलीवर चांगले संस्कार केले असतील तर त्यांना काळजीचे काहीच कारण नसते, माझ्या सासुबाई माझ्यावर व मुलांवर खूप प्रेम करतात, मला आईची आठवण सुद्धा येवू देत नाहीत. मी शिकलेली असल्याने त्यांनी मला नौकरी करण्यास प्रवृत्त केले ते फक्त मी स्वावलंबी व्हावे, आयुष्यात कधीही कोणापुढे हात पसरवायची वेळ येवू नये म्हणून.
माझे सासरे शासकीय कार्यालयात आधिकारी होते, त्यांनी आमच्या संसारात कधीही लुडबूड केली नाही, आता रिटायर झाल्यानंतर ते शेती बघतात. आमच्या सासुबाई किंवा इतर कोणालाही जोरात बोलताना, रागावताना मी पाहिले नाही, सासुबाई तशा कडक स्वभावाच्या पण चुकले तर रागावून चूक सुधारणार अन नंतर प्रेमाने लाड पण करणार अशा सासुबाई सर्वांना मिळो हीच मी देवाजवळ प्रार्थना करते. माझ्या सासुबाईचे नाव सौ जयश्री आणि माझे सौ राजश्री आता हा नावाचा अर्थ म्हणजे ज्याच्या पाठीशी ते नेहमी राज्य करणार सगळ्यांच्या मनावर प्रेमानी.
मला खुप आवडते जेव्हा त्या मला अग राजश्री म्हणून हाक मारतात मी स्वतःला भाग्यवान समजते. मला या सर्वांचे ऋण कसे फेडावे हे कळत नाही पण मी निश्चीत या सर्वांना ऋणातून मुक्त करण्याचा प्रयत्न करणार आहे.



सौ. राजश्री कुलकर्णी, पुणे

# शिक्षकांचा अवमान : पुरोगामी महाराष्ट्रातील लांच्छनास्पद घटना



प्रा. प्रशांत खामकर
संपर्क क्र. 9970423204

आधुनिक केसरी

**बहुजनांच्या लेकरांनी शिकून थोरामोठ्यांच्या पंगतीत बसावे; यासाठी सर्वसामान्यांच्या घरात ज्ञानदीप लावण्याचे काम महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांनी केले. त्यांच्या ज्ञानाचा वारसा अखंडपणे पुढे चालवण्याचे काम २१व्या शतकातील शिक्षक करीत आहेत. आदर्श समाज घडविण्याचे पवित्र काम शिक्षक करीत असतात. शिक्षकांमुळेच समाजात मान प्राप्त झालेल्या लोकप्रतिनिधीकडून शिक्षकांचा अपमान करणारे वक्तव्य होणे पुरोगामी महाराष्ट्राला लांच्छनास्पद आहे.**

जिथे शिक्षकांचा म्हणजेच गुरूंचा अपमान केला जातो; तो समाज रसातळाला जातो असा इतिहास आहे. रयत शिक्षण संस्थेमधील शिक्षक गुरुकुल या उपक्रमाच्या अंतर्गत शालेय वेळा व्यतिरिक्त घड्याळी तीन तास कोणताही अतिरिक्त मोबदला न घेता विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांचे मार्गदर्शन करतात.अध्यापनाच्या कामाव्यतिरिक्त अन्य अवांतर कामे शिक्षकांना करावी लागत आहेत. कोविड काळात विद्यार्थ्यांचे झालेले शैक्षणिक नुकसान भरून काढण्यासाठी शाळा स्तरावर सेतू अभ्यास, चाचण्या, अध्ययन स्तर निश्चिती, मागील इयत्तेचा अभ्यासक्रम पूर्ण करून घेणे अशी कामे शिक्षक करीत आहेत.तसेच नियमीत वर्गाचे अध्यापन करणे, खानेसुमारी, विद्यार्थी दाखल करणे, शालेय वेळा व्यतिरिक्त शाळाबाह्य विद्यार्थी सर्व्हेक्षण करणे, वाचन लेखन कार्यक्रम राबविणे, शालेय मध्यान्न भोजन योजना राबवावी लागते. जर स्वयंपाकी न आल्यास स्वतः भात शिजवून शालेय विद्यार्थ्यांना खाऊ घालावा लागतो. सन २०१५ सालापासून शालेय पोषण आहाराचा हिशोब अहवाल देण्याची सूचना आल्यामुळे कागदपत्रांची शोधा शोधा करताना शिक्षक हतबल झाले आहेत. आठवड्यातून एकदा पूरक आहार खरेदी करून तो विद्यार्थ्यांना द्यावा लागतो. शासकीय अनुदान बिलंबानेच येते. अशावेळी स्वतःच्या पगारातील काही हिस्सा या कामासाठी खर्च करावा लागतो.
ऑनलाईन विविध शिष्यवृत्ती प्रस्ताव तयार करावे लागतात.वेळोवेळी येणारे विविध उपक्रम जसे की विविध महापुरुषांचे जयंती व पुण्यतिथीचे कार्यक्रम, स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त विविध उपक्रम शिक्षकांनीच राबविलेले आहेत. आर्थिक व्यवहाराचे अभिलेखे वेळेवर पूर्ण करावी लागतात. विविध शाळा स्तरावरील प्रोसेडींग लिहावे लागते. विविध प्रशिक्षणांमध्ये सहभागी व्हावे लागते.विद्यार्थी आधारकार्ड अपडेट करावी लागतात., विद्यार्थी माहिती ऑनलाईन तात्काळ पाठवावी लागते. अडाणी पालक असतील तर अशावेळी विद्यार्थी बँक खाते उघडण्यासाठी स्वतः बँकेतील कागदपत्रांची पूर्तता करून बँकेत विद्यार्थ्याला घेऊन हेलपाटे मारावी लागतात. गावातील मान्यवरांना बोलावून वृक्षारोपण कार्यक्रम घ्यावा लागतो. एखाद्या मान्यवराला निरोप न पोहोचल्यास त्यांच्या रोशाला सामोरे जावे लागते.विविध स्पर्धा परीक्षांची तयारी करून घ्यावी लागते. क्रीडा स्पर्धांसाठी विद्यार्थ्यांची तयारी करून घ्यावी लागते. विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करून घेऊन त्याद्वारे अपंग, आजारी विद्यार्थ्यांची माहिती आरोग्य विभागाला कळवावी लागते.डिजीटल शाळा बनविण्यासाठी सुट्टीच्या दिवशीही शाळेत येऊन काम करावे लागते. विविध दिन साजरे करावे लागतात. शाळा व्यवस्थापन समिती सारख्या इतरही अनेक समित्या बनवाव्या लागतात. ते बनवत असताना गावकरी आपली प्रतिष्ठा पणाला लावतात परंतु गावच्या राजकारणामध्ये आमचा शिक्षक मात्र भरडला जातो.
बहुतांश शाळा या द्विशिक्षकी आहेत. काही ठिकाणी शिक्षक संख्या कमी आहे. सद्यस्थितीत महाराष्ट्र राज्यात जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये वीस हजार शिक्षकांची कमतरता आहे.शाळेची कामे करतांना शिक्षक जेरीस येतात. दशवार्षिक जनगणनेचे काम, निवडणूक आयोगाने दिलेले काम, प्रत्यक्ष निवडणुका घेताना शिक्षकांची होणारी दमछाक, पोलिओ लसीकरणांमध्ये सहभाग, साथीच्या रोगाच्या काळात आरोग्य सेवक म्हणून पार पाडावयाची जबाबदारी, शौचालयांच्या नोंदींचा सर्वे, वादळ, भूकंप सारख्या नैसर्गिक आपत्तीमध्ये झालेल्या नुकसानीचे पंचनामे करण्याचे काम अशा अनेक अतिरिक्त कामांमुळे विद्यार्थ्यांकडे दुर्लक्ष होते. त्याचा परिणाम शैक्षणिक गुणवत्तेवर होत आहे. त्यामुळे शाळेच्या पटसंख्येवर परिणाम होत आहे.

आज अनेक शाळांमध्ये स्वतंत्र मुख्याध्यापक नाही. स्वतंत्र लिपिक किंवा शिपाई नाही. पुरेशी शिक्षक संख्या नाही. पदवीधर शिक्षकांचा तुटवडा आहे. असे असतानाही सर्व जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडताना शिक्षकांची दमछाक झालेली पाहावयास मिळते.

बऱ्याचश्या शाळांच्या इमारती मोडकळीस आलेल्या आहेत. राज्यातील अनेक शाळांमधील विद्यार्थ्यांना अजूनही मोफत पाठ्यपुस्तके तसेच गणवेश मिळालेली नाहीत. शाळेच्या भौतिक सुविधांसाठी अनुदान नाही. विद्यार्थ्यांना शाळेमध्ये पिण्यासाठी स्वच्छ पाणी उपलब्ध नाही. शौचालय उपलब्ध नाहीत; असल्यास त्यांची दुरावस्था असते. शाळेचे वीज बिल भरण्यासाठी अनुदानाची तरतूदच नसल्यामुळे बऱ्याचशा शाळेचे वीज कनेक्शन कट करण्यात आले आहे. सक्तीचे व मोफत शिक्षणाचा कायदा सन २००९ साली झाला. परंतु तरीही शालेय विकासासाठी लोकसहभागावरच अवलंबून राहण्याची वेळ शालेय शिक्षकांवरती आलेली आहे. शिक्षकांना नोकरीच्या गावी राहण्यासाठी शासकीय निवासस्थाने नाहीत. बऱ्याचशा गावांमध्ये शिक्षकांना राहण्यासाठी खोल्या उपलब्ध होत नाही. अशावेळी शिक्षकांनी आपला कुटुंब-कबीला घेऊन कोठे राहावे ?असा प्रश्न त्यांच्यापुढे निर्माण होतो. परंतु या सर्व बाबींकडे दुर्लक्ष करून लोकप्रतिनिधी द्वारे शिक्षकांना अपमानित करणारी वक्तव्ये विधिमंडळात केली जाणे हे पुरोगामी विचारधारा जपणाऱ्या महाराष्ट्रात अशोभनीय आहे. ज्या गुरूंमुळे आपण घडलो त्यांचाच अवमान केला जातो. अशा कृतघ्न पणाला आळा घालने गरजेचे आहे.

तुकारामनीती
भाग 23

# तुका म्हणे धैर्यवंते । निर्मळचित्ते सरवी ती ॥



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**तुकाराम नीती हे सदर लिहितोय तेंव्हापासून एका वेगळ्या अनुभूतींना सामोरे जातोय याचा मनस्वी आनंद आहे ! दर रविवारी लिहिण्यासाठी अगोदर तुकोबांच्या जीवन आणि साहित्याचे चिंतन करणे माझ्यासाठी एका सत्कार्याला बांधून घेण्यासारखे झाले आहे ! मला वाटतं, हेच आपल्या शिक्षणाचे अनेक सार्थकांपैकी एक महत्वाचे सार्थकच आहे ! झाले आता खरे । शिक्षणाचे सार्थक तुकारामची एक । वांचलिया॥ असे लिहिल्यास अतिशयोक्ती होणार नाही, याचे कारण म्हणजे तूकोबांनी आत्तापर्यंत मराठी सारस्वतातील अनेक प्रज्ञावंत, प्रतिभावंत आणि कार्यवंतांना कृपांकित करून लिहितं-बोलतं अन चालतं सुद्धा केलं आहे ! महात्मा ज्योतीराव फुल्यांपासून ते भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांपर्यंत आणि वैज्ञानिक सी.व्ही.रमन पासून ते डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलामांपर्यंत तुकारामांच्या विचारांचे गारुड सर्वकाळ डोकावते आहे ! एवढंच काय, तुकोबांच्या अनेक अभंगांनी अनेकांना नवसंजीवनी देऊन खडतर संसारासोबत लढायला उभं केलं आहे !**

**तुकोबा आणि त्यांचे अलौकिक अभंग-वाङ्मयम्हणजे नित्य नित्य वाहता सुंदर अमृत प्रवाह असून त्यातूनच अनेकविध लेखक-वाचकांना सहस्त्र अंगाने आनंदांकुर प्रकट झाले आहेत !**

**वाचता तुकोबा मन । होई जीवच तुकोबा।**
**इतरांचा लेखा । कुठे देऊ? ॥**

सहजच अशी भावविभोर अवस्था होते, आणि तुकोबांच्या एका एका विषयावरील विविध अभंग वाचून विचारांचे धक्क्यावर धक्के बसतात. त्याच अनुषंगाने त्यांच्या गाथ्यात वासुदेव, वैद्यगोळी, लळित आदि प्रकारानंतर 'आशीर्वाद' प्रकरणाचे पाच अभंग येतात. हे पाच अभंग म्हणजे तूकोबांनीवाचक-लेखक-चिंतकांना आशीर्वाद म्हणजेच प्रेरणा देण्याचे महत्कार्य केले आहे.

**जीवेंसाटी यत्नभाव । त्याची नाव बळकट ॥**
**विश्वासाची धन्य जाती । तेथें वस्ती देवाची ॥** (शा.अ.गाथा अ.क्र. ४७८)

आज वाचन-लेखन आणि प्रसाराची मुबलक साधनं उपलब्ध असतांना आणि देश स्वातंत्र्याची पंचाहत्तरी ओलांडतोय तरीही लोक तुकाराम महाराजांना देवभोळा आणि टाळ-वीणा घेऊन भंडारा डोंगरावर जाऊन भजन करणारा केवळ वारकरी समजत असतील, तर तो समज आपण दुरुस्त केला पाहिजे ! संत तुकोबांचे हे अभंग तावून-सुलाखून प्रसंगी आपल्या विचारांसाठी लोकांचा मार खाऊन "बुडणारे लोक पहावत नसल्यामुळे, त्यांच्या कळवळ्याने" निर्माण झाले आहेत हे कसे विसरता येईल ? आज आपण लोकशाहीच्या पंचाहत्तरीत बेडरपणाने तुकोबांचा तुकोबांप्रमाने विचार व्यक्त करू शकतो का ? आज घडीला किती कीर्तनकार, महाराज, प्रबोधनकार, समाजसुधारक आणि व्याख्याते इथल्या लोकशाही-मूल्य तुडवणाऱ्या धन-दांडग्या, भ्रष्ट राजकारणी लोकांच्या विरोधात लिहितात आणि बोलतात ? किती कीर्तनकार बिदागी न ठरवता कीर्तन करतात ? किती कीर्तनकार "बिदागी" "बेदाग" आहे का ? असा प्रश्न उपस्थित करतात ? याचे उत्तर "नाही" असेल तर मग हे काम कुणाचे आहे ? याउलट दुर्दैवाने त्यांच्याच "अउत्तम व्यवहारातून जोडलेले काळे धन" घेऊन तुकोबांच्या अभंगांचे विवेचन करणे आणि मूल्य तुडवणाऱ्या लोकांचेच लांगुलचालन आणि उदोउदो करणे सुरु आहे ! तुकोबांच्या अभंग-सिद्धांताच्या दृष्टीने ही तुकोबांच्या विचार-आचारांची पायमल्ली करणे नाही का ? हा जाहीरपणे केलेला खिसेकापूपणा नाही का ? हा मुलभूत, वारकरी विचार करण्याची आणि त्याचा प्रसार करण्याची वेळ आली आहे, अन्यथा येणारी पिढी "तुकारामही असेच कीर्तनकार, प्रबोधनकार होते" अशी धारणा करून बसेल. याउलट, संत तुकोबाराय आपल्या आशीर्वाद या प्रकरणातील अभंगांमध्ये माणसाने आपला जीव म्हणजेच आपले कार्य खंबीरपणे करून आपल्या विचार-वागण्याची नाव बळकट करावी जेणेकरून ईश्वराने मोठ्या विश्वासाने आपल्याला माणूस म्हणून इथे पाठवले आहे, त्याचे काही प्रमाणात का होईना सार्थक झाल्याशिवाय राहणार नाही आणि हा विचार जिथे आहे तिथेच ईश्वराचे वास्तव्य असते. त्याशिवाय पुढील आशीर्वाद प्रकरणातील अभंगात तुकोबा,

**आशीर्वाद तया जाती । आवडी चित्तीं देवाची ॥**
**कल्याण ते असो क्षेम । वाढे प्रेम आगळें ॥** (शा.अ.गाथा अ.क्र. ४७९)

असे सहज आणि संसारापासून काय अपेक्षा ठेवाव्यात आणि त्यातून आपल्याला काय मिळेल ( ?) या प्रश्नांची सहजच उत्तरे देऊन जातात. कोण श्रीमंत आहे अथवा गरीब याचा सहजतेने संबंध जोडतांना धन म्हणजेच माणसाची नम्रता आणि त्यातूनच येणारा विचारप्रवाह इथे प्रकट होत आहे. त्याच अनुषंगाने हरीच्या दासांनी निराश न होता आशावादी राहून लोकांचे क्षेम-कुशल-प्रेम वाढीसाठी आपले मन-चित्त ईश्वरभक्तीत म्हणजे सद्वर्तनी गुंतवून ठेवल्यास यावजीवैत कल्याणाबरोबरच आपलेही कल्याण होईल ! हा वैश्विक आशावाद आणि आशीर्वाद तुकोबाराय इथे ठेवून जातात !

एखादा विशाल-निष्पृह लेखक-कवी-विचारवंत वाचतांना वाचकाची स्थितीही बदलून जाते, हा एक चमत्कारच ! देशातील सर्वच जात-धर्म-पंथातील विद्वजनांनी एकदातरी संत तुकोबांच्या गाथ्याचे वाचन करावे, जेणेकरून वाचकाची जगण्या-मरण्याची दिशा निश्चित झाल्याशिवाय राहणार नाही. याच आशीर्वाद प्रकरणात तुकोबा पुढचा अभंग लिहितांना

**परत्रींचे जे सांगाती । त्यांची याती न विचारीं ॥**
**तुका म्हणे धैर्यवंतें । निर्मळचित्तें सखी तीं ॥** (शा.अ.गाथा अ.क्र. ४८०)

असे लिहून 'भेदाभेद अमंगळ' हा वैश्विक विचार प्रकट करतात. जे सज्जन आणि सत्यासोबत आहेत त्यांचे कुळ किंवा जात विचारू नये. या विश्वात दोनच माणसांना अनन्यसाधारण महत्व असलेले आढळून येईल ते म्हणजे धैर्यवान आणि चित्ताने निर्मळ असलेली माणसं ! धैर्यवान माणसेच जगाला नवी दिशा दाखवू शकतात. जसे छत्रपती शिवाजी महाराज, स्वामी विवेकानंद, फुले दांपत्य, महात्मा गांधी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम ज्यांनी अत्यंत खडतर आणि कठीण काळांत आपल्या जीवनाला आकार देतदेत आपल्या भोवतालचा कालखंड तेजोमय केला ! हाच इतिहास अन्य संत, महापुरुष आणि विचारवंतांचा आहे, ज्यांनी आपल्या अलौकिक



कार्यकर्तृत्वाने आपल्या कार्य आणि विचारांचा अमिट ठसा इतिहासाच्या पानावर कोरून ठेवला ! ही माणसेच हे महान कार्य करू शकली, याचे कारण म्हणजे यांचे मन आणि काम दोन्हीही निर्मळ होते. जिथे निर्मळ मन आणि भावना असतात तिथेच मोठे, दैदिप्यमान कार्य घडून येते. या सर्वच महापुरुषांनी धीरोदात्तपणे आपली खिंड लढवून त्या त्या काळाला मार्ग दाखविण्याचे महान कार्य केले आहे, म्हणूनच तुकोबाराय सुद्धा अशाच माणसांची सख्य करण्याचा उपदेश करतांना लक्षात येतात.

त्याबरोबरच तुकोबाराय या आशीर्वाद प्रकरणात मानवी जीवनाच्या क्षणभंगुरतेचा उल्लेख करून आपण परा, पश्यन्ती, मध्यमा आणि वैखरी या चार वाणीपैकी वैखरी म्हणजेच सामान्य बोलीभाषेतच आपले मत व्यक्त करताना लिहितात,

**तुका म्हणे करी पूजन वैखरी । बोबडा उत्तरी गातों गीत ॥**
(शा.अ.गाथा अ.क्र. ४८१)

आपण सामान्य माणसांची त्यातल्या त्यात "लेकुरांची वेडीवाकुडी उत्तरे" घेऊन हा गाथ्याचा अभंग-प्रपंच लोकांसमोर मांडतात. आपले अनुभूतीपूर्ण अभंग लोकांमध्ये प्रसारित करतांना तुकोबा बडेजावपणा किंवा अधिकाराशिवाय अगदी सामान्य माणसांच्या प्रांजळ हृदयाने आपले वाङ्मय लोकाभिमुख करतात. हाच त्यांचा थोरपणा आणि महान विचार त्यांना सामान्य हृदयांत स्थान देऊन जातो. त्यामुळेच तुकोबांचे लेखन हे विश्व मागणे होऊन जाते. त्यातच या आशीर्वाद प्रकरणाचा शेवट करतांना जगद्गुरू तुकोबाराय

**विचारूनि ठाया ठाव । येथें भाव राहिला ॥**
**आतां तुकयापाशीं हेवा । नाहीं देवा तांतडी ॥** (शा.अ.गाथा अ.क्र. ४८२)

या अभंगाने वाचक-चिंतक यांना विचारप्रवण करतात. तुकोबांचे हे लिहिणे म्हणजे सतत वाचकांचे पाय ते नित्यनेमाने  जमिनीवरच ठेवतात. उच्च विचार तेंव्हाच येऊ शकतो जेंव्हा लेखक स्वतः उच्च-उदात्त, आचार-विचार-कृतीने वागू-बोलू-चालू लागतो ! तुकोबाराय त्यापैकीच एक असल्याकारणाने ते एवढा कोमल, प्रांजळ आणि निर्मळ विचार करू शकले. त्यांच्याकडील हेवा-देवा, द्वेष-मत्सर, आप-पर भाव मावळले असून त्यांचा भाव आणि देव एकच झाले आहेत. त्यांच्या भावना, एक एक विचार आणि अभंग ईश्वरानुभूती झाले असून त्यांना आता माणूस आणि इतर प्राण्यांमध्ये कोणताही भेद दिसत नाही ! त्यांचे जगणे हे "जन-विजन" झाले असून त्यांच्या जळी-स्थळी-काष्टी-पाषाणी केवळ आणि केवळ विठ्ठलच विराजमान झाला आहे !

असा तुकोबांचा आंतर्बाह्य भरलेला स्वच्छ परमार्थ आणि त्यांच्या अभंगांचे अवलोकन केले असता, चिंतक-वाचकाला सुद्धा नवा विचार मिळतो आणि हा विचारच आपल्या सर्वांच्या समग्र बदलाची नांदी ठरू शकतो ! हे आशीर्वाद प्रकरण म्हणजे त्यांनी स्वतःकरीता आणि विश्वाकरिता मागितलेले मागणीपर आशीर्वाद आहेत. त्यात कोणताही स्वार्थ नसून समग्र मनुष्य जातीचे कल्याण अधोरेखित झाले आहे. तुकोबांचे अभंग हे केवळ वाचन-लेखन-कीर्तन करण्यासाठीच नसून ते वाचल्यानंतर माणसाने बदलाची प्रक्रिया सुरु करायला हरकत नाही, याचा जणू ते इशाराच आहेत. त्यांच्या अभंगातील इशारे ज्यांना वेळीच कळाले ते लागलीच तुकोबांना येऊन मिळतात. तुकोबांना येऊन मिळणे जरी एवढे सोपे नसले, तरी त्या पंथाने आपण चालायला लागलो, हे ही नसे थोडके ! तेंव्हा, चला तुकोबांच्या शब्दांचे आणि ओळींचे अर्थ नीटपणे समजून घेऊन संसारातील क्षणिक गोष्टींचे चिंतन करणे थांबवूयात ! आपला विचार आणि कृती वैश्विक मार्गाने कार्यान्वित करूयात ! असे झाल्यास खऱ्या अर्थाने माझ्यासह सर्व वाचक-चिंताकांचे सुद्धा नव्या पद्धतीने चिंतन-मनन होत राहील आणि "तुकाराम नीती" या नियमित सदराचे सार्थक होईल यात तिळमात्र शंका नाही ! जय तुकोबाराय !

**(टीप : लेखक हे व्याख्याता, कवी, लेखक, प्रबोधनकार, प्राणायाम प्रशिक्षक आहेत)**

# (शेरू-Lion, बम बम भोले, I am Kalam, A boy who harnessed the wind)

आधुनिक केसरी

Lion ( शेरू ) हा सिनेमा अगदी थरारक होता . शेरू नावाचा पाच वर्षांचा झोपडीत आई व भावंडांसह राहणारा मुलगा रेल्वेस्टेशनवर हरवतो. चुकून एका रिकाम्या ट्रेनमधून कलकत्त्याला जाऊन पोचतो. तिथे रुळांच्या आसपास भटकताना एका मुले विकणाऱ्या टोळीच्या हाती सापडतो. एवढ्याशा मुलालाही स्पर्शातून ते लोक खरे प्रेमळ नाहीत हे कळते आणि तो तिथून पळून जाऊन सुटतो. कुठेतरी एका फुटपाथवर बसलेला असताना हॉटेलमधला एक भला मनुष्य त्याला घेऊन पोलिसांच्या स्वाधीन करतो. पोलीस त्याला सुधारगृहात पाठवतात. त्याच्या चांगल्या वागण्यामुळे व शिकण्यातल्या हुशारीमुळे ऑस्ट्रेलियाचे एक श्रीमंत, अपत्यहीन पण प्रेमळ जोडपे त्याला दत्तक घेते. मोठेपणी त्याचे एका सुसंस्कृत व संवेदनशील तरुणात रूपांतर होते. त्याला चांगले मित्रमैत्रिणी व प्रेमळ जोडीदारही मिळतात. त्याला लहानपणीच्या आई व भावंडांच्या आठवणी येत असतात. गुगलवरून त्याचे गाव व वस्ती त्याला सापडते. भारतात येऊन तो लहानपणचे घर आणि आईलाही शोधून काढतो. त्यांना भेटतो तेव्हाच त्याच्या मनाला शांती मिळते. त्याचे ऑस्ट्रेलियन पालकही त्याला यासाठी साथ देतात. लहानपणातल्या त्याच्या चुणचुणीतपणामुळे त्याला चांगले पालक व समृद्ध आयुष्य वाट्याला येते. शेरूची भूमिका वठवणारा सनी पवार अविस्मरणीय आहे.

एक सामान्य कामगार, त्याची शाळकरी लहान मुलगी व मुलगा यांची हृदयस्पर्शी गोष्ट बम बम भोले या




सिनेमात दाखवली आहे. मुलीचे बूट मुलगा किती मेहनतीने तिला कसे परत देतो, हा प्रसंग पडद्यावर पाहताना दर्शिल सफारी (तारे जमींपर फेम) चे कौतुक वाटते. त्याचा प्रामाणिकपणा आणि जिवापाड प्रेम अभिनयातून जाणवते.

I am Kalam या सिनेमात एका गरीब मुलाची श्रीमंत मुलाशी मैत्री होते. त्या दोघांच्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीतल्या तफावतीची जाणीव त्यांना नसते. ते अभ्यास व खेळ या दोन्हींमध्ये एकत्रच असतात आणि एकमेकांच्या साथसंगतीचा नेहमीच आनंद घेत असतात. याला श्रीमंत पालक हरकत घेतात आणि मुलांची कोवळी मने या बाबीला कसे तोंड देतात, हे प्रत्यक्षच बघायला हवे.

Aboy who harnessed the wind हा चित्रपट आफ्रिकेतल्या एका वाळवंटी खेड्यात राहणाऱ्या शाळकरी मुलाची जिद्द आणि चिकाटीची कहाणी सांगतो. संपूर्ण अभावाच्या परिस्थितीत तो मुलगा त्याचा उत्साह व सकारात्मक दृष्टिकोन ठेवून कसा कृती करत राहतो आणि अखेर त्याच्या कठीण कामात यशस्वी होतो, हे पाहताना आपण स्तिमित होतो.

या सगळ्या सिनेमांत एक बाब समान आहे , ती म्हणजे आपल्या नेहमीच्या सवयीचे घर व वस्तू इथे नसताना त्या वेगळ्या वातावरणाशी जुळवून घेत जगत राहणे शिकावे लागते . Comfort नसले तरी cope up कसे करायचे हे लहान मुले त्या वयात झटकन आत्मसात करतात. आईपासून लांब राहूनही तिची सतत आठवण येत असूनही आहे त्या परिस्थितीशी जुळवून घेत वेळप्रसंगांतून धडा घेत जगण्याचे ज्ञान आपोआप ते स्वतःमध्ये जमवत राहतात. चित्रपटांतील लहान मुलांच्या भूमिका अतिशय सहजपणे साकार झालेल्या आहेत. ती मुले ते आयुष्य स्वतः जणू जगलीच आहेत. वरील चित्रपट नेटफ्लिक्सवर पाहायला मिळतील.



चित्रपट परीक्षण

नंदिनी देशमुख, संपर्क क्र. 9850018610

# बैल पोळा

आधुनिक केसरी

नुकताच बैलपोळा सण साजरा करण्यात आला खानदेशात शेतकरी बांधव बैलपोळा सण मोठ्या उत्साहात साजरा करतात शेतकरी बंधवाना बऱ्याच दिवसापासून पोळा या सणाचे वेध लागतात मग़ त्याची खरेदी सुरु होते अगदी लहान मूल सुद्धा आपल्या वडिलांना सांगतात बाबा आपण आपल्या बैलाला गळ्यात असा घंटा घेऊ फुगे घेऊ शिंगाना बांधू वर्षभर



तात राबणाऱ्या सर्जाराजाला हयाँ दिवशी मोठा मान असतो आजच्या दिवशी वर्षातून एकदा गावातील प्रत्येक मंदिरात जाऊंन नेवाद्य देण्याची प्रथा आहे घरातील स्त्रिया सकाळी लवकर उठून अकरा वड़े, पापड़या, भज्या, दहीभात असा नेवाद्य करून मंदिरात ठेवतात तर घरातील पुरुष मंडळी गावातील प्रत्येक जाऊंन नारळ फोड़तात आणि तो प्रसाद टला जातो.. घरातील स्त्रिया सर्जा राजाचा सण गाचा स्वयंपाक करतात ज्या घरात बेलजोड़ी असेल त्या घरातील मालक आजच्या दिवशी दिवसभर उपवास करतो आणि आपल्या बैलांना छान नदीवर घेऊन जातो त्याची अंघोळ करून त्यांना सजवल जात शिंगाना रंग लावला जातो फुगे बंधले जातात पायात घुंगरू घातले जातात  अश्या प्रकारे सजउन वाजत गाजत सर्जाराजाची मिरवनुक काढली त्यांना मारोति मंदिराच्या सामोर घेऊन जातात नंतर त्यांची घरी आल्यावर पूजा केली जाते.. जेव्हा वाजण्याचा आवाज ऐकायला आला तेव्हा असे म्हणतात पोळा फुटला दोन वाजता पोळा सनाला सुरवात होते तेव्हापासून शेतकरी बांधव आपल्या बैलांना घरोघर घेऊन जातात ज्या घरासमोर जातात तिथली स्त्री मोठ्या मान सम्मानान त्या बैलाचे पायावर पानी टाकते त्याची पूजा करते त्याच्यासोबत असणाऱ्या त्याच्या मालकाची सुद्धा पूजा करते आणि नारळ देऊन त्याचा मान ठेवला जातो लहान मूल सुद्धा आजच्या दिवशी मागे नसतात नवे कपड़े घालून  बैल घेऊन पळायला त्यांना खूप मज्जा वाटते तर संध्याकाळी सात आठ वाजेपर्यंत बैल घेऊन फिरनारे शेतकरी बांधव आपल्या नजरेंस पडतात वर्षभर शेतात राबणारा हा सर्जा राजा किती कष्ट करतो म्हणून आपल्याला हा घास तरी मिळतो त्याच्यासाठी हा सण सर्वांनी साजरा करायलाच हवा.

**-कविता चव्हाण,** जळगाव

# काँग्रेस का संपत आहे ?



प्रा . संग्राम मोरे,
संपर्क क्र. 8412094000

आधुनिक केसरी

**नुकताच गुलाम नबी आझाद यांनी काँग्रेस पक्षाचा त्याग करून ते आजाद झाले आहेत. वास्तविक पाहता कोणत्याही पक्षाच्या एका ज्येष्ठ नेत्याने किंवा ज्याने आजपर्यंत संपूर्ण आयुष्यभर त्या पक्षाच्या नावावर आमदार, खासदार, मंत्री अशी विविध पदे भूषवलेली असताना अशा पद्धतीने पक्षाला सोडचिठ्ठी देणे हे त्या नेत्याचे आणि पक्षाचे दुर्दैवच म्हणावे लागेल. परंतु काँग्रेसमध्ये अलीकडच्या काळात पक्ष सोडण्याच्या प्रकारांमध्ये वाढ होताना दिसत आहे. म्हणून काँग्रेस संपत आहे का? हा प्रश्न काँग्रेस सह इतर सर्व सामान्य जणांना सुद्धा पडणे स्वाभाविक आहे. म्हणून जर काँग्रेस संपत असेल, तर काँग्रेस का संपत आहे? या प्रश्नाची उकल व्हायला हवी.**

वास्तविक पाहता काँग्रेसची स्थापना स्वातंत्र्यपूर्व काळात इंग्रज अधिकारी ए.ओ.ह्युम यांनी केली. स्वातंत्र्य लढ्यामध्ये संपूर्ण भारत देशातील सामान्य नागरिका पासून ते मध्यमवर्गीय, व्यापारी विविध समाजसेवक या सर्वांनी सहभाग घेतला होता. हा सहभाग घेत असताना या विशाल समुदायाला एक संघटित नाव असणे आवश्यक होते आणि ते नाव काँग्रेस या शब्दांमधून लोकांना सापडले. म्हणून ब्रिटिश विरुद्ध तमाम भारत देशातील नागरिक म्हणजेच काँग्रेस असा स्वातंत्र्यलढा झालेला आपण पाहतो. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर जेव्हा देश स्वतंत्र झाला तेव्हा काँग्रेस नावाच्या लोक चळवळीचे रूपांतर एका राजकीय पक्षामध्ये होऊन भारतीय राष्ट्रीय काँग्रेस हा त्या काळातला सर्वात मोठा पक्ष निर्माण झाला. स्वाभाविकपणे नुकताच झालेला स्वातंत्र्यसंग्राम, त्या स्वातंत्र्यसंग्रामाचे नेतृत्व करणारे विविध नेते हे सर्वजण काँग्रेसमध्येच असल्याने स्वातंत्र्यप्राप्तीनंतर काही काळ काँग्रेस पक्ष हा स्वतंत्र भारतातील सत्ताधारी पक्ष बनला. पंडित जवाहरलाल नेहरूंच्या पंतप्रधान पदाच्या कारकीर्दीमध्ये स्वतंत्र भारतासमोरचे विविध प्रश्न, त्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी केलेले विविध उपाय, नव्या भारताची प्रशासकीय, सामाजिक, आर्थिक, राजकीय पुनर्रचना, आंतरराष्ट्रीय संबंध, परराष्ट्र धोरण या सगळ्या बाबी काँग्रेसच्या नेतृत्वाखाली पार पडत होत्या. दरम्यानच्या काळामध्ये देशात इतरही अनेक छोटे छोटे पक्ष होते परंतु काँग्रेसला बाजूला सारून नवा पक्ष सत्तेवर येण्याची लागलीच काही शक्यता नव्हती. नंतरच्या काळामध्ये जनता पक्षाच्या रूपाने ती शक्यता वास्तवात आली. या बाबीत खोलवर जाणे इथे महत्त्वाचे नाही. या ठिकाणी महत्त्वाचे हे आहे की, काँग्रेस पक्षाची बांधणी आणि काँग्रेस पक्षाची वाटचाल कशी झाली हे पाहणे.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर पूर्ण सत्ता मिळालेला काँग्रेस पक्ष हा पुढच्या काळामध्ये अनेक ठिकाणच्या प्रदेश आणि त्या प्रदेशातील तत्कालीन वजनदार लोकांच्या नेतृत्वाखाली गेलेला दिसतो. म्हणजेच साध्या भाषेत सांगायचे म्हटले तर काँग्रेसने त्या त्या भागातल्या वजनदार लोकांना काँग्रेस पक्षाची एजन्सी दिली म्हणायला हरकत नाही. सुरुवातीची काही वर्षे गेल्यानंतर काँग्रेस पक्षामध्ये नेतृत्व हे त्या भागातील नेत्याच्या स्वतःच्या भोवती निर्माण झालेले दिसून येते. म्हणजेच त्या भागातील स्वतःच्या अस्तित्वावर किंवा सामर्थ्यावर उभे असलेले नेतृत्व हेच काँग्रेसचे नेतृत्व झाले. अगदी दिल्लीपासून तर गल्लीपर्यंत काँग्रेस पक्ष हा त्या त्या भागातील वजनदार नेत्यांमार्फत एजन्सी रूपाने वाढत गेला. अगदी जिल्हा पातळीवर किंवा तालुका पातळीवर आजही आपण परिस्थिती बघितली तर एका घराण्याच्या भोवती काँग्रेस आणि जर ते घराणे वजनदार असेल तर त्या ठिकाणी काँग्रेसची सत्ता असेच समीकरण झालेले आहे. म्हणजे विचार, धोरण, ध्येय आणि उद्देश यापेक्षा त्या भागातील व्यक्ती विशेष नेत्यावरच काँग्रेसची संघटना उभारलेली दिसून येते. याचा परिणाम असा झाला की पक्षापेक्षा ती व्यक्ती महत्त्वाची ठरू लागली. आणि पक्षाचे कार्यकर्ते यांच्या ऐवजी त्याच्या त्या भागातील नेत्याचे कार्यकर्ते असाच उल्लेख सातत्याने होत गेला. उदाहरणार्थ आजही आपण पाहिले तर आम्ही या साहेबांचे कार्यकर्ते आहोत किंवा आम्ही भैयाचे कार्यकर्ते आहोत अशा प्रकारची वाक्य आपल्या कानावर पडताना दिसतात. आणि खरी गंमत त्याच ठिकाणी झाली. कारण पक्ष म्हणून पक्षाचा कार्यकर्ता कोणीच बनायला तयार नाही, पण साहेबांचा कार्यकर्ता बनण्यामध्ये सर्व कार्यकर्त्यांमध्ये स्पर्धा लागलेली आहे. याचाच परिणाम म्हणून पक्षांमध्ये विविध नेते आणि त्यांचे कार्यकर्ते असे विभाजन झाल्याचा प्रकार सातत्याने निर्माण झाला. पक्षाचा कार्यकर्ता न बनता त्या त्या नेत्याचा कार्यकर्ता बनत गेला, वाढत गेला आणि त्या दोन नेत्यांमध्ये स्पर्धा लागत राहिली. जेव्हा निवडणूक जाहीर होते आणि पक्षाने दोन नेत्यांमधून एका नेत्याला उमेदवारी दिली तर दुसरा नेता हा त्याच्याभोवती असलेल्या कार्यकर्त्यांच्या जीवावर काँग्रेसलाच आव्हान देऊन बंडखोरी करू लागला. यामध्ये अनेक बंडखोर यशस्वी होऊ लागले पर्यायाने काँग्रेसचा पराभव काँग्रेसच करू लागली.



दुसरे असे होत गेले की जेव्हा जेव्हा पक्ष म्हणून पक्षासमोर संकट निर्माण झाले तेव्हा तेव्हा कार्यकर्ता हा दूर जाताना दिसून आला. खरे पाहता पक्षावर संकट आल्यावर पक्षाचा कार्यकर्ता अधिक जिद्दीने एकवटायला हवा. परंतु काँग्रेसमध्ये नेमके उलटे घडत गेले. या ठिकाणी आणखी एक बाब लक्षात घेतली पाहिजे की काँग्रेसच्या स्थापनेपासून गांधी नेहरू आणि पुन्हा गांधी हे नेतृत्व केंद्रीय नेतृत्व स्थानी राहिले आहे. थोडक्यात काँग्रेसमध्ये या नेतृत्वाला देवत्व प्राप्त झाले आहे. म्हणून सुरुवातीच्या काळात जेव्हा काँग्रेस भरभराटीत होती तेव्हा गांधी घराण्याला देवत्व प्राप्त करून दिले पण जेव्हा काँग्रेस अडचणीत आली तेव्हा गांधी घराण्याचा बळी गेला हे सुद्धा नाकारता येत नाही. आजही जेव्हा काँग्रेस अडचणीत आहे तेव्हा सोनिया गांधी, राहुल गांधी, प्रियंका गांधी हे नेतृत्व काँग्रेसचा किल्ला लढवताना दिसतात आणि त्या उलट ज्या लोकांनी काँग्रेसच्या नावावर संपूर्ण आयुष्यभर राजकीय सत्ता उपभोगली ते लोक काँग्रेस अडचणीत असताना तळ्यात मळ्यात अशी अवस्था करून घेताना दिसत आहेत. त्यावर कहर म्हणजे ज्यांना आपल्या पक्षाचे भवितव्य उज्वल वाटत नाही ते लोक आपल्याच पक्षावर टीका करून पक्षांतर करत आहेत किंवा काहीजण मूग गिळून गप्प आहेत. या दोन्ही बाबी काँग्रेस पक्षाच्या संपण्याकडे मार्गक्रमण करणाऱ्या आहेत.

तिसरी बाब अशी की काँग्रेस पक्षाचे नेते हे अनेक वर्ष सत्तेवर राहिल्यामुळे त्यांना सत्ते शिवाय राजकारण आहे ही कल्पनाच मान्य होत नाही. सत्ता असेल तरच राजकारण या गोष्टीचा त्यांच्यावर प्रचंड परिणाम झाल्यामुळे सत्ता असेल तेव्हा काँग्रेस भोवती नेत्यांची प्रचंड गर्दी असते पण सत्ता नसताना पक्षाच्या कार्यालयाकडे कोणीही फिरताना दिसत नाही. याचा परिणाम असा की सुरुवातीपासून काँग्रेसमध्ये कार्यकर्ते कमी आणि नेते जास्त अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

दुसरीकडे काँग्रेसचेच कार्यकर्ते काँग्रेसच्या नेत्यांवर अशी टीका करतात की पक्षात तरुणांना वाव दिला जात नाही. पण वस्तुस्थिती अशी की तरुणांना वाव दिला तर ज्येष्ठ दूर जातात, आणि जेष्ठांना वाव दिला तर तरुण दूर जातात. म्हणजेच धरलं तर चावतय आणि सोडलं तर पळतय या मध्ये काँग्रेस सापडली आहे आणि त्याही पुढे जाऊन काँग्रेसने एकदा एखाद्या नेत्याला नेतृत्व बहाल केले तर त्याच्या पुढच्या काही पिढ्या याच नेतृत्व स्थानी राहतात. सामान्य कार्यकर्ता मात्र नेतृत्व स्थानापर्यंत कधीच पोहोचू शकत नाही. त्याची मजल फक्त पंचायत समिती जिल्हा परिषद यापुरतीच मर्यादित राहते आणि पुढच्या निवडणुकीत त्या कार्यकर्त्याला तुम्हाला मागच्यावेळी संधी दिली आता इतरांना संधी द्या म्हणून डावलले जाते. पण तुम्हाला मागच्या वेळी आमदारकी दिली म्हणून पुढच्या वेळी तुम्ही दुसऱ्या कार्यकर्त्याला संधी द्या असे शब्द नेत्यांना सुनावले गेले नाहीत. त्यामुळे एकच नेता त्याचं पूर्ण आयुष्यभर नेतृत्व स्थानी राहिला आणि त्याच्या निवृत्तीनंतर त्याचा मुलगा त्या स्थानावर थेट पोहोचला. म्हणजे काँग्रेसमध्ये कार्यकर्ता कार्यकर्ताच राहिला आणि नेता नेत्याच्या पोटी जन्म घेतच राहिला ही बाब देखील काँग्रेसच्या संपण्यासाठी तितकीच महत्त्वाची आहे.

आणखी एक धोरणात्मक बाब अशी की आज जरी आपण सध्याच्या सरकारच्या आर्थिक धोरणांवर सडकून टीका करत असलो तरी सामान्य मतदाराला पूर्वीच्या सत्ताधाऱ्यांमध्ये आणि आत्ताच्या सत्ताधाऱ्यांमध्ये फारसा फरकच दिसत नाही. कारण आजचे सत्ताधारी हे तेच करत आहेत जे कालचे सत्ताधारी करत होते. उदाहरणार्थ आज आपण सरकारच्या खाजगीकरणाच्या धोरणावर सडकून टीका करतो परंतु वस्तुस्थिती अशी की या खाजगीकरणाची सुरुवात काँग्रेसच्याच काळामध्ये झालेली आहे. म्हणजेच दोन्ही सत्ताधाऱ्यांमध्ये फरक करायला वावच उरत नाही. शेवटी एक मुद्दा महत्त्वाचा आहे तो म्हणजे केंद्रीय नेतृत्वाचा. आपल्याकडे भारतीय राजकारणाच्या प्रवाहाकडे पाहिले असता एक बाब प्रकर्षाने लक्षात येते ती म्हणजे भारतीय राजकारणामध्ये ज्याची हवा आहे त्याच्या बाजूने राजकारण वळताना दिसते आहे. आणि यामध्ये महत्त्वाची भूमिका प्रसार माध्यमे पार पडत आहेत. प्रसारमाध्यमांच्या बाबतीत सुद्धा ज्यांची हवा आहे त्यांच्याच बाजूने प्रसार माध्यमे झुकताना दिसत आहेत. म्हणजेच देशभरामध्ये व्यक्तिमत्व म्हणून, भाषण म्हणून, संबोधित करण्याचे कौशल्य म्हणून, भावनिक मुद्द्यांना देण्यात येणाऱ्या महत्त्वावरून जर मोदींची हवा सुरू झाली तर प्रसार माध्यमे सुद्धा आपोआप मोदींच्या बाजूने झुकतात आणि काँग्रेसकडे ना हवा उरते, ना प्रसारमाध्यमे उरतात ना कार्यकर्ते उरतात ना नेते उरतात. या सर्वांचा परिणाम काँग्रेसच्या संपण्याकडे होत आहे.

खरंतर याचा विचार कार्यकर्त्यांनी नाही तर नेत्यांनी करायला हवा. परंतु अलीकडच्या दहा वर्षात नेतृत्वाकडून अशा प्रकारचा विचार होताना दिसत नाही. म्हणून कार्यकर्त्यांनीच काँग्रेस मधील नेते सुधारण्याची चळवळ सुरू करायला हवी. परंतु प्रचलित काळात नेतृत्वाला जाब विचारण्याची पद्धत अद्याप तरी काँग्रेसमध्ये सुरू झालेली दिसत नाही. केवळ केंद्रीय नेतृत्वाच्या अपयशावर खापर फोडायचे आणि स्थानिक नेतृत्वाचा पिढ्यानपिढ्या जयघोष करायचा अशी वृत्ती कार्यकर्त्यांमध्ये दिसून येते. म्हणून यशाचे मालक अनेक नेते मात्र अपयशाचे धनी केवळ गांधी घराणे अशी अवस्था काँग्रेसची झाली आहे.

काँग्रेस पक्ष वाढावा का न वाढावा हा स्वतंत्र चर्चेचा विषय होईल. परंतु सत्ताधारी पक्ष जेवढा एक संघ असेल तेवढाच एकसंघ विरोधी पक्ष असायला हवा. म्हणून काँग्रेस नेतृत्वाने अनेक धोरणांमध्ये बदल केले पाहिजेत. उदाहरणार्थ एकट्याच्या बळावर, आपल्या विचारसरणीवर संघटन उभे करणे, स्वतःच्या संघटन सामर्थ्यावर स्वबळावर निवडणुका लढवणे, पराजित जागांवर संघटन वाढवणे, कार्यकर्त्यांना वैचारिक प्रशिक्षण देणे सत्ते शिवाय राजकारणाची सवय लावणे आणि सातत्याने नेतृत्वात बदल करून नवनवीन नेतृत्व निर्माण करणे ही काँग्रेससाठी काळाची गरज आहे म्हणून काँग्रेसच्या कार्यकर्त्यापासून केंद्रीय नेतृत्वापर्यंत या बाबींवर चर्चा व्हायला हवी.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अंत्ययात्रेच्या चित्रिकरणासाठी यांना राहते घर, छापखाना विकावा लागला

आधुनिक केसरी

**६ डिसेंबर १९५६... महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिवस... अन्यायाविरुद्ध, विषमतेविरुद्ध धगधगणारा लावा, कडाडणारी तोफ शांत झाली होती... नऊ कोटींची जनता क्षणात पोरकी झाली होती... प्रत्येकाच्या पायातील युगांयुगाचा गुलामगिरीचा साखळदंड आपल्या विध्वतेंन तोडणारा तो करोडांचा कैवारी आता निघून गेला होता... त्यांचं दिल्लीत निधन झाल्याची बातमी वाऱ्यासारखी देशभर पसरली... आपल्या लाडक्या नेत्याच्या अंत्ययात्रेला अवघा देश लोटला... जस कळेल तसं शहरातून, खेडोपाड्यातून पाऊल मुंबईच्या दिशेने पडू लागली होती... या अंत्ययात्रेसाठी उसळलेल्या जनसागराच्या असवाने मुंबईचा रस्ता ओलाचिंब झाला होता... या सगळ्यात एक समांतर गोष्ट घडत होती... या गोष्टी पुढं यायच्या सोडून काळाच्या ओघात गडप झाल्या.... त्या शेवटच्या क्षणांना कायमच कैद करणारे, त्यासाठी आपलं राहत घर आणि आपला छापखाना विकणारे आजही सर्वांसाठी अनभिज्ञच आहेत, ही माहिती पुढं आली नाही ही खुप मोठी शोकांतिका आहे...**

माजी आमदार, दलित मित्र नामदेवराव व्हटकर यांच्याविषयी बऱ्याच जणांना माहिती नसावी... कोल्हापूर जिल्ह्यातील मसूदमाले गावात २४ ऑगस्ट १९२१ मध्ये त्यांचा जन्म झाला... तर ४ ऑक्टोबर १९८२ साली मृत्यू... एकाचवेळी त्यांनी साहित्यिक, संपादक, नाट्यरंग, चित्रपट, नभोवाणी, स्वातंत्र्य सैनिक, प्रगतिशील शेतकरी अशा पंधराहून अधिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिलं आहे... जन्मापासून बसलेल्या जातीयतेच्या चटक्यामुळे संपूर्ण आयुष्य त्यांनी अस्पृश्यता निवारणासाठी काम केलं... एकदा दाढी करत असताना नाव्ह्याने विचारलं तुम्ही कोणत्या जातीचे... यावेळी दलित म्हणून दिलेल्या उत्तराने नाव्ह्याचा वास्तरा गाल कापून गेला... तो चेहऱ्यावरचा डाग घालवता येणार नाही, पण या देशावरचा अस्पृश्यतेचा डाग मला पुसून काढावा लागेल असा प्रण करून त्यांनी अख्ख आयुष्य यासाठी खर्ची घातलं... वर सांगितलेल्या सर्व क्षेत्रातून त्यांनी या विरोधात आवाज उठवला... त्याच्या या कामाची महाराष्ट्र सरकारने दखल घेऊन त्यांना पहिला 'दलित मित्र' पुरस्कार देऊन सन्मानित केलं...

६ डिसेंबर रोजी ते मुंबईतच होते...त्यांना बाबासाहेब गेल्याचं कळल्यानंतर अतीव दुःख झालं... त्यांची अंत्ययात्रा चित्रित करून ठेवावी असं त्यांच्या मनात आलं...चित्रपट, नाटक यामुळे त्यांच्या





अनेकांशी ओळखी होत्या... त्यांनी अनेकांना विचारलं पण कुणी तयार होत नव्हतं, काहींनी तर "त्याच आम्हाला काय, तो तुमचा नेता आहे, अस्पृश्यांचा नेता आहे आम्ही करणार नाही" असं स्पष्ट शब्दात उत्तर दिलं... कुणीतरी हे करेल अशी त्यांची भाबडी अशा फोल ठरली होती... येणाऱ्या काळासाठी या चित्रीकरणाच महत्व त्यांनी ओळखलं होत... कुणी मदत करो न करो, मी स्वतः करतो असं त्यांनी ठरवलं... पण ही इतकी सहजसोपी गोष्ट नव्हती... त्याकाळी व्हिडीओ रेकॉर्डिंग साठी कॅमेरा आणि त्यासाठी रील या इतक्या खर्चिक गोष्टी होत्या की त्याचा आज अंदाज देखील लावता येत नाही...


अंदाजे तीन हजार फूट निगेटिव्हची रील, कॅमेरा आणि कॅमेरामन यासाठी जवळपास तेराशे ते चौदाशे रुपये खर्च येईल असा अंदाज त्यांनी बांधला... आता पैसा कुठून उभा करायचा हा मोठा प्रश्न होता... काही किरकोळ कारणांसाठी काहीतरी तारण ठेऊन ते एका मारवाड्याकडून पैसे घेत असत... पण यावेळी रक्कम मोठी होती, त्यासाठी त्यांनी आपला एकमेव छापखाना गहाण ठेवावा लागला... त्यांना याच्या बदल्यात एकूण दीड हजार रुपये मिळाले... धावत - पळत ते शंकरराव सावेकर या कॅमेरामनकडे गेले... त्यांनी दीडशे रुपये प्रतिदिवस भाड्याने एक कॅमेरा आणला... आणि रात्री १०-११ च्या सुमारास राजगृह गाठले... बाबसाहेबांचं पार्थिव पहाटे आले... एका ट्रकवरून अंत्ययात्रेला सुरुवात झाली.. याच ट्रकवर कसाबसा कॅमेरालावून उभा राहण्याची जागा मिळाली... पहिला शॉट खोदादाद सर्कल वर घेण्यात आला... यानंतर अंत्यदर्शनासाठी लोटलेल्या अलोट गर्दीचं दिवसभर चित्रीकरण सुरूच होत... सायंकाळी पार्थिव दादर चौपाटीवर पोहचलं... याठिकाणी शाही मानवंदना देण्यात आली... चंदनाच्या लाकडावर पार्थिव ठेवण्यात आलं... त्यांच्या मुखाजवळ शेवटचं लाकूड ठेवण्यापर्यंत चित्रीकरण सुरूच होतं... बाबासाहेबांचा शेवटचा चेहरा याठिकाणी चित्रित झाला... चितेला अग्नी दिल्यानंतर ही चित्रीकरण करण्यात आले...

या सगळ्या चित्रीकरणासाठी एकूण २ हजार ८०० फूट रील संपली होती... दुसऱ्या दिवशी बाँबे फिल्म लॅबोरेटरीत ही फिल्म प्रोसेसला देण्यात आली... आता ही फिल्म धुणे, दुसऱ्या पॉझिटिव्हवर रशप्रिंट काढणे आणि एडिटिंग करणे यासाठी अडीच ते तीन हजार खर्च येणार होता... त्यासाठी पुन्हा त्याच मारवाड्याकडे जाऊन त्यांनी राहत घर गहाण ठेऊन तीन हजार रुपये आणले... पुढं या तारण ठेवलेल्या मिळकती सोडवत्या आल्या नाहीत... त्यामुळे त्या कायमच्या गेल्या... मुंबई सोडावी लागली...

मालमत्ता गेली तर गेली... पण बाबासाहेबांच्या शेवटच्या स्मृती जपता आल्या, त्यांच्या उघड्या चेहऱ्याचा या जगातील शेवटचा क्षण युगांयुगासाठी कैद करता आलं, याच समाधान त्यांना होतं... आज आपण पाहतोय त्या शेवटच्या क्षणांची नामदेवराव यांनी केलेलं हे जगातील एकमेव चित्रफीत आहे... या गोष्टींचं कधीही श्रेय घेतलं नाही किंवा याच भांडवल केलं नाही...

**(यातील चित्रीकरण आणि त्यावेळच्या आठवणी हा संदर्भ त्यांच्या "कथा माझ्या जन्माची" या आत्मचरित्रातून घेतला आहे... नामदेवराव व्हटकर समजून घ्यायचे असतील तर हे आत्मचरित्र नक्की वाचा.)**

**संगम कांबळे**




# चतु:सूत्रीतून गणिताचा पाया मजबूत

आधुनिक केसरी



श्रीमती छाया खेडकर
संपर्क क्र. 8888780568

**अ) गणिताची मुलभूत संकल्पना : संख्यांचे प्रकार**

१४) परिमेय संख्या : परिमेय संख्यांचे दोन प्रकार पडतात.

१) साध्या परिमेय संख्या : घनसंख्या, ऋणसंख्या शून्य आणि अपूर्णांकसंख्या मिळून तयार होणाऱ्या संख्या संचास साध्या परिमेय संख्या म्हणतात.

उदा. 12, 23, -18, -5, 0, 4/5, -7/3.... इत्यादी.

२) दशांश रुपातील परिमेय संख्या : ज्या संख्यांचे दशांशरुप खंडीत आणि अखंड आवर्ती असते, त्या प्रत्येक संख्येला दशांश रुपातील परिमेय संख्या म्हणतात.


* खंडीत दशांश रुप : छेदाने अंशाला भाग दिल्यानंतर पूर्ण भाग जातो. याला खंडीत दशांशरुप म्हणतात.

उदा. 3/6 = 0.5

* अखंड आवर्ती दशांशरुप : छेदाने अंशाला भाग दिल्यानंतर तीच संख्या किंवा विशिष्ट संख्यांचा गट पुन्हा : पुन्हा येतो याला अखंड आवर्ती दशांशरुप म्हणतात.

उदा : १) 1/3 = 0.33333... = 0.3 (२) 43/12 = 3.583

लक्षात ठेवा : १) पुन्हा : पुन्हा येणाऱ्या संख्येस किंवा संख्यांच्या गटास आवर्त म्हणतात.




२) कोणत्या संख्येचा किंवा संख्यांच्या गटाचा आवर्त आहे हे दर्शवण्यासाठी त्या संख्येच्या किंवा संख्येच्या गटाच्या वरच्या बाजूस आडवी रेघ किंवा टींब देतात.

उदा. : 2.5, 7.2365

**ब) गणिताच्या मुलभूत संकल्पना प्रश्नसंच :**

१) साध्या परिमेय संख्यात कोणत्या संख्यांचा समावेश असतो?

२) 10 ही परिमेय संख्या आहे का?

३) दशांश रुपातील परिमेय संख्यात कोणत्या संख्या असतात?

४) 5.4 या संख्येत कोणत्या अंकाचा आवर्त आहे?

५) 2. 34567 या उदाहरणात आवर्त गट कोणता आहे?

**क) उखाणा :**

१) नवरा शब्दाचा समानअर्थी शब्द आहे कांत, धन, ऋण, शून्य, अपूर्णांक संख्या मिळून तयार होणाऱ्या साध्या परिमेय संख्या असतात.

२) माळी बागेची रखवाली करतात, दशांशरुपातील परिमेय संख्या खंडीत आणि अखंड आवर्ती दशांशरुपात असते.

**ड) कविता : क्रमांक १०**

(क्रमशः)

# अपवित्र अंत:करणातून दिव्य-दृष्टीचा उदय होत नाही



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**शुद्ध चिताच्या ठायी दुर्गुण स्थिरावत नाही. म्हणुन आपलं चित्त, अंतःकरण हे सदैव पवित्र ठेवता आलं पाहिजे. कारण अपवित्र अंतःकरणातुन दिव्य दृष्टीचा उदय होत नाही. प्रत्येक व्यक्ती आपल्या जीवनात काहीतरी उत्तम, अतिउत्तम, किंवा सर्वश्रेष्ठ व्यक्तिमत्व होऊन नावलौकिक होण्यासाठी प्रयत्न करत असतो. आपल व्यक्तित्व घडत असताना अनेक वेगवेगळे गुण कौशल्य कारणीभूत असतात आणि या सगळ्यामध्ये महत्वाची बाब आहे ते म्हणजे पवित्र अंतःकरण आणि आपलं अंतःकरण शुद्ध ठेवता येण खुप आवश्यक आहे. त्यासाठी आपले संस्कार, सहवास, संगत, वातावरण याचा प्रभाव पण बऱ्यापैकी जबाबदार असतोच.**

जीवन म्हणजे जणुकाही वेगवेगळ्या घटना घडामोडी. दुर्घटना, अपघातांनी भरलेला रणसंग्राम शच असतो. आणि यामध्ये आपला विवेक आणि दृष्टी ही दिव्य असली पाहिजे. तेव्हा या समरातील आपला विजय निश्चित असतो आणि दिव्यदृष्टी असण्यासाठी पवित्र अंतःकरण असणं गरजेचं आहे. कारण अपवित्र अंतःकरणातुन दिव्य अशी दृष्टी प्रकट होत नाही. आपणं चांगले दिसावेत यासाठी आपणं काय करत नाहीत...? आंघोळीसाठी वेगवेगळे उटणे, साबण वापरतो, एवढ्यावरच न थांबता चांगलं दिसलं पाहिजे या विवंचनेतून आपण वेगवेगळ्या पद्धतीची सौंदर्य प्रसाधने वापरून चेहरा सजवतो. तसेच जास्तीतजास्त चांगल्या पद्धतीचा पेहराव आपण करण्याचा प्रयत्न करतो. मग अंतःकरण शुद्ध असलं पाहिजे असा विचार आपण कधी केलेला आठवतो का....?? आणि केला असेल तर मग आपण नक्कीच स्वतःच्या नजरेत तरी योग्य आहेत. निसर्गातील कोणतीही चांगली गोष्ट निर्माण होण्यासाठी, योग्य पुरक, सकारात्मक, निसर्गाशी सुसंगत अस वातावरण अपेक्षित असतं. पोषक आणि योग्य अशा वातावरणात चांगल्या बाबींचा उदय होत असतो. म्हणून जर आपल अंतःकरण अशुद्ध, अपवित्र, असात्विक असेल तर त्याचा आपल्या जीवनावर तसेच दृष्टीवर दुरदृष्टीने नक्कीच परिणाम जाणवेल. कारण अपवित्र अंतःकरणातुन दिव्य अशी दृष्टी प्रकट होत नाही. आणि दिव्यदृष्टी नसेल तर जीवनात विविध अपघातांना सामोरे जावे लागते. म्हणून आपण आपलं अंतःकरण कसं शुद्ध आणि सात्विक राहील यासाठी निरंतर प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे.

शुद्ध बीजा पोटी फळे रसाळ गोमटी....!

शुद्धता-पवित्रता ही जीवनात असण खुप महत्वाची बाब आहे. वरकरणी बाह्य शुद्धतेपेक्षा अंतर्गत अंतःकरणाची पवित्रता शुद्धता ही खूप आवश्यक असते. ज्याचं अंतःकरण सात्विक आहे. त्याच मन बुद्धी, विवेक, आणि दृष्टी ही सुद्धा सात्विक असते. आणि आचरण आपोआप पवित्र असत. त्यासाठी काही वेगळे प्रयत्न करण्याची आवश्यकता भासत नाही. म्हणून आपलं अंतःकरण हे सदैव सात्विक आणि पवित्र ठेवता आलं पाहिजे. कारण आपलं अंतःकरण जसं आहे तसं आपली व्यक्तिगत व सार्वजनिक क्षेत्रातील वागणूक आचरण असतं. आणि आपली दृष्टी पण त्याच पद्धतीची असते. म्हणूनच आपलं इतरांच्या विषयीच मत हे आपल्या अंतःकरणातील कार्यरत असणारा जो स्थिर भाव आहे त्या नुसार ठरत असतं. मग ते कोणत्याही विषयावरील मत असो किंवा आपली भुमिका असो. त्याचा मुख्य स्तोत्र हा आपलं अंतःकरणच असतो. म्हणून अंतःकरणातील शुद्धता सात्विकता, पवित्रता, ही जाणीवपुर्वक जोपासली पाहिजे. जेणेकरून आपल्या अंतःकरणातुन दिव्यदृष्टीच प्रकट होईल. कारण अपवित्र अंतःकरणातुन कधीच दिव्यदृष्टी प्रकट होत नाही. याचे साक्षीदार हे युगांयुगापासुन निर्माण झालेल्या घडामोडी, निसर्ग, विविध धार्मिक ग्रंथ व इतिहास आहे.

पवित्र, निष्पाप, निष्कलंक, निःसंदिग्ध अंतःकरण हे साक्षात पवित्र अशा तिर्थक्षेत्रा इतकं महान असत. जर आपल अंतःकरण पवित्र निर्मळ, निष्पाप असेल तर आपली दृष्टी ही दिव्यच असते. कारण अपवित्र अंतःकरणातुन कधीच दिव्यदृष्टीचा उदय होत नाही. हा निसर्गाचा अलिखित नियम आहे. आपलं अंतःकरण चित्त शुद्ध राहण्यासाठी आध्यत्मिक ज्ञान, वाचन, सात्विक वृत्ती जोपासणं न्याय, निती, धर्म शास्त्रानुसार आचरण, सुसंगत, सहवास, सकारात्मक विचारांचा प्रभाव, आजुबाजूला असणार वातावरण चांगल्या पद्धतीच असणं आवश्यक असतं, जेणेकरून आपलं अंतःकरण आपोआप शुद्ध आणि सात्विक होईल व आपली दृष्टी दिव्य होईल......!!!!!.

# सकारात्मकतेने परिपूर्ण 'मर्मबंधातली ठेव'



अस्मिता प्रदीप येंडे
संपर्क क्र. 9619035195

आधुनिक केसरी

**बालपण, तारुण्य आणि वृद्धावस्था ह्या मानवी जीवनातल्या अवस्था आहेत. माणसाचे आयुष्य हे चढ -उतारांनी भरलेले असते. जगण्यासाठी संघर्ष हा करावाच लागतो. प्रत्येकाच्या संघर्षाचे स्वरूप वेगवेगळे असते. आयुष्य म्हणजे सुख-दुःखाची मालिका असते. एकामागून एक येत राहते. सतत सुखाचा वर्षाव होईल असे नाही, दुःखाची सोबतही असते. काही जण दुःख उराशी कवटाळून बसतात तर काही जण दुःखातून बाहेर पडून जगण्याला महत्त्व देतात. शेवटी दृष्टीकोन महत्वाचा असतो. संकट, दुःख, वेदना कोणाला नाहीत ? सगळ्यांना आहेतच या ना त्या स्वरूपात... दुःख-सुख गरीब-श्रीमंत असा भेद करत नाही. पण या संकटांशी दोन हात करून लढणारी व्यक्ती धीटपणे जीवन व्यतीत करते. आयुष्य प्रत्येकाच्या वाट्याला येतं, पण ते तुम्ही कसे जगता, यावर तुमचं सुख - समाधान अवलंबून असते. आयुष्याकडे सकारात्मक दृष्टीने पाहिलं तर आयुष्य हे जीवनगाणे बनून जाते.**

कविवर्य मंगेश पाडगावकर 'सांगा कसं जगायचं' या कवितेत म्हणतात,

**'पेला अर्धा सरला आहे**
**असं सुद्धा म्हणता येतं**
**पेला अर्धा भरला आहे,**
**असं सुद्धा म्हणता येतं**
**सरला आहे म्हणायचं की**
**भरला आहे, म्हणायचं,**
**हे तुम्हीच ठरवा !'**

आयुष्याकडे पाहण्याची सकारात्मक दृष्टी देणाऱ्या ह्या ओळी आहेत. स्मरणशक्ती म्हणजे मानवाला मिळालेलं वरदानच आहे. जे जे क्षण आपण वर्तमानात जगतो त्याच क्षणांच्या आठवणी निर्माण होतात. अनेक सुख-दुःखाचे क्षण माणूस आपल्या मनात साठवून ठेवतो आणि त्या पुन्हा पुन्हा स्मरत राहतो. काही वेळा असेही होते, जे विसरायचे असते तेच नेमके आठवणीत राहते, आणि जे आठवणीत राहावे असे वाटते तेच नेमके विसरले जाते. पण पाटीवरील अक्षरे जशी सहज पुसता येतात तशा आठवणी सहज पुसता येत नाहीत. नाही का !!

अशाच काही आठवणीचा लेखाजोखा पुस्तकरूपात मांडता आला तर किती छान कल्पना आहे ना ! लेखिका वर्षा महाजन लिखित 'मर्मबंधातली ठेव' हे पुस्तक म्हणजे आयुष्याची स्मरणिका आहे. या पुस्तकाचे शब्दांकन लेखिका संपदा वागळे यांनी सुंदररित्या केले आहे. लेखिका वर्षा महाजन या निवृत्त प्राध्यापिका असून वयाच्या या ठराविक टप्प्यावर येऊन त्यांनी ही आठवणींची पोतडी पुस्तकरूपात वाचकांसाठी खुली केली आहे. खरेच आयुष्य कसे जगावं, कसे सार्थकी लावावे याचा उत्तम वस्तुपाठ म्हणजे हे पुस्तक. या पुस्तकात एकूणच लेखिकेचा जीवनप्रवास मांडलेला आहे. बालपण, आई-बाबा, शिक्षण, नोकरी, लग्न, आईपण आणि शिक्षिका म्हणून केलेले कार्य याचा संपूर्ण लेखाजोखा यात वाचायला मिळतो. पुस्तकातील विविध प्रकरणं, त्यासोबत छायाचित्रे, पुस्तकाची प्रथमपुरुषी निवेदनशैली, ओघवती आणि साधी - सोपी भाषाशैली आणि कुठेही बडेजावपणाचा लवलेश न दाखवता सर्व आठवणी सहजतेने मांडल्या आहेत, त्यामुळे पुस्तक वाचताना प्रत्येकाला या पुस्तकात आपल्या जीवनाचे प्रतिबिंब दिसायला लागते.

वर्षा महाजन यांनी ३६ वर्षे अध्यापनाचे कार्य केले. त्यादरम्यान विद्यार्थ्यांशी जुळलेले ऋणानुबंध, शिक्षक म्हणून असणारी तळमळ, आपल्या कामात स्वतःला झोकून देण्याची वृत्ती, मेहनती, जिद्दी, धाडसीपणा आणि ध्येयवादी जीवन जगणाऱ्या महाजन यांचं व्यक्तिमत्त्व प्रेरणादायी आहे. मुलांशी असलेले त्यांचं नातं पुस्तक वाचताना जाणवते. शिकवत शिकवता लेखिका सर्व विद्यार्थ्यांच्या लाडक्या बाई कधी झाल्या, हे कळतच नाही.

पुस्तक सुरू होतं ते, बालपणाच्या प्रवासापासून. आई-वडिलांच्या संस्कारात लहानाची मोठी झालेली लेखिका, घरातील वातावरण, मित्र- मैत्रिणी, शाळा या आठवणी आजही ताज्या वाटतात. ह्या आठवणी लिहिताना लेखिका भूतकाळात नक्की विसावल्या असतील. महाविद्यालयातील त्यांचं जीवन तसेच गिरगावातील त्यांचं वास्तव्य, चाळीतील गणपती उत्सव, तेथील आपलेपणा, संघटित वृत्ती आणि जोडलेली माणसे हीच त्यांची खरी संपत्ती !

प्रकरण जसेजसे पुढे जात राहते, वाचण्याची ओढ वाढत राहते. पुढे पती विजय महाजन यांच्यासोबत बांधलेली लग्नगाठ आणि त्यांचा संसार, संसार करताना आलेल्या अडचणी, मतभेद किंवा तडजोड याबाबत अगदी बारकाईने आठवणी लिहिल्या आहेत.जोडीदारासोबतचा प्रवास, उडालेले खटके आणि नात्यातील प्रेम हे सगळे सांभाळताना एक पत्नी म्हणून, सून म्हणून असलेली सर्व कर्तव्ये त्यांनी पार पाडली. कधीच प्रश्न निर्माण केले नाहीत तर त्यावर उत्तर शोधले.

घर, संसार आणि त्यात मुलांचा जन्म ह्या सुखावणाऱ्या घटना. आई म्हणून त्यांनी मुलांना चांगले संस्कार दिले, व्यक्ती म्हणून घडवले. यासोबतच लेखिका आणि त्यांच्या सासूबाई यांच्यातील स्नेह कसा वाढत जातो, हेही विशद




केले आहे. घर आणि मुलांना सांभाळताना त्यांनी अध्यापनही केले. घरातील कर्तव्ये पार पाडतानाच त्यांनी स्वतःचं अस्तित्व जपण्यास सुरुवात केली. अध्यापन करणे हे त्यांच्या आवडीचे काम. त्यामुळे त्या मुलांना शिकवण्यात रमून जात असत. 'अध्यापनातील सोनेरी दिवस' हे प्रकरण खरेच स्मरणीय झाले आहे. शिक्षक हे देशाचे नागरिक घडवत असतात, पुढील पिढी निर्माण करत असतात, त्या पिढीवर चांगले संस्कार करण्याची आणि विद्यादान करण्याची जबाबदारी शिक्षकांवर असते.या प्रकरणातून त्यांच्यातील हाडाच्या शिक्षिकेचे दर्शन घडते.

लेखिकेची कन्या 'प्राची' आणि लेखिकेची आई म्हणून असणारे प्रेम, जिव्हाळा, मुलीचं बालपण सुद्धा यात अनुभवायला मिळते. पती विजय महाजन यांची या प्रवासात उत्तम साथ आणि पाठिंबा मिळाल्याचे पुस्तकात पदोपदी जाणवते. या पुस्तकासाठी बारीक सारीक आठवणी लिहिताना तारखेसकट सूक्ष्म नोंदी लिहिण्यासाठी विजय यांची मोलाची मदत झाल्याचे ही त्या आवर्जुन सांगतात.

'चिंतामणी पर्व' या प्रकरणातून घरासंबंधी असलेला विशेष स्नेह मनाला भावतो. घर म्हणजे नुसत्या चार भिंती नसतात, घरातल्या माणसांनी, त्यांच्या वास्तव्याने, स्नेहबंधाने घराला घरपण येतं ही भावना यातून व्यक्त होताना दिसते. एक आदर्श शिक्षिका, एक उत्तम पत्नी, आदर्श गृहिणी, सून, आई आणि आता आजी अशा सर्व भूमिका लेखिकेने उत्तमरीत्या निभावल्या आहेत. आपल्या शिक्षणाचा त्यांनी योग्य रित्या सदुपयोग केला आणि जीवन समृद्ध केलं. या प्रवासात ज्यांची ज्यांची साथ मिळाली, त्यांचा नामोल्लेख करायला त्या विसरल्या नाहीत.

'माणिकबाग' ह्या प्रकरणातून महाजन यांची निसर्गात रमण्याची वृत्ती तसेंच बागकामाची असलेली आवड, शेतीची आवड दिसून येते. ही काही एकरांची जमीन माणिकबाग होतानाचा प्रवास विलक्षण आहे. त्यांनी केलेल्या जगभ्रमंतीचं वर्णनही यात समाविष्ट आहे. 'सुप्रा केमिकल्स' या स्वतःच्या व्यवसायाची सुरुवात, लोकांचा मिळणारा प्रतिसाद आणि उत्पादन वाढवून व्यवसाय पुढे नेण्यासाठी मुलाची मिळालेली साथ यामुळे त्यांचा व्यवसाय कसा फुलत गेला, हे वाचण्यासारखे आहे.

आयुष्यातील सर्व जबाबदाऱ्या पार पाडल्यानंतर लेखिका आपले छंद जोपासताना दिसतात. निवृत्तीनंतरचे जीवन कसे जगावे आणि मिळालेल्या आयुष्याचे सोने कसे करायचे, याचे उत्तम उदाहरण म्हणजे हे पुस्तक होय. उदवैली बूक्स तर्फे हे पुस्तक प्रकाशित केलेले असून पुस्तकाचा आकृतिबन्ध, पुस्तक बांधणी उत्तम आहे. जीवनाकडे सकारात्मकतेने पाहण्याची एक नवी दृष्टी देणारी ही मर्मबंधातली ठेव वाचनीय आणि सकारात्मक ऊर्जा निर्माण करणारी आहे !

# चिंचेचे आत्मवृत्त



भूमिपुत्र वाघ
संपर्क क्र. 9172972482

आधुनिक केसरी

**माझा जन्म सातशे वर्षांपूर्वी सातेफळ तालुका कळंब जिल्हा धाराशिव या ठिकाणी झाला. जसं गाव हळूहळू मोठं व्हायला लागलं; तेव्हा गावातल्या काही समजदारांनी, लेकरा बाळांच्या सावलीसाठी चार झाडे लावावित, असे ठरऊन, त्यांनी नियोजन करून,खूप मोठी जागा मोकळी ठेवून, मला मारुतीच्या मंदिराच्या डाव्या बाजूला लावलं. सोबत उजव्या बाजूला वडाची लांबची झाडे लावली. समोर पिंपळाचे झाड लावलं. माझ्या बाजूला माझ्या बहिणीलाही लावलं.**

मला खूप आनंद झाला होता. त्याचं महत्त्वाचं कारण असं की भविष्यात मी या गावातल्या लेकरा बाळांना सावली, चिंचुण्या, चिंचा ऑक्सिजन देणार सगळ देणार. गावातल्या करत्या तरुणांनी माझ्या भोवताली काटाडया लावून मला सुरक्षित केलं. याचा मला खूप आनंद झाला होता. कारण गावांमध्ये भरपूर बकऱ्या असायच्या, त्या बकऱ्याची मला कायम भीती वाटायची. काठाड्या लावल्यामुळे मी आता बिनधास्त झाली होती. लोक सकाळपासून ते संध्याकाळपर्यंत आपापल्या वेळेनुसार माझ्या आजू बाजूला बांधलेल्या आडावर यायचे. आड कायम गच्च भरलेला असायचा. त्यावेळी लोक पोहरा लावून आडातलं पाणी शेंदून, ते खांद्यावर घेऊन घरी जायचे. पाणी शेंदून घेत असताना थोडं थोडं पाणी खाली सांडायचं. सांडलेल्या पाण्याला छोटीशी वाट करून ती माझ्या भोवताली सोडलेली. मी रोज हवं तेवढ पाणी पीत होते. आणि रोज मी वाढत होते. माझ्यापासून माझी बहीण ही पन्नास पावलावरती पुढच्या बाजूला होती. आढावरून सांडत आलेलं पाणी, माझ्यापर्यंत आणि माझ्यापासून माझ्या बहिणीपर्यंत पुढे जायच. आम्ही दोघी खूप मोठ्या दिमाखात वाढलो. आम्हाला पाण्याची कधीच चिंतन नव्हती. आमचं नुकसान होऊ नये, जनावरानी खाऊ नये, कोणी फांद्या तोडू नये, म्हणून आमच्या भोवती काटेरी कुंफण लावलं होतं. आम्ही अगदी निवांत होतो. माझी जशी जशी वाढ होईल तसे तसे लोक माझं कौतुक करत. आता नवी पालवी फुटली. आता नव्या फांद्या आल्या. आता थोडं उंच झालं. आता छान झालं. असं म्हणत म्हणत काही वर्षांमध्ये माझी बरीचशी वाढ झाली होती. माझा हळूहळू गोलाकार येत होता.माझी सावली तयार होत होती.

छोटी छोटी लहान लहान लेकरं माझ्या सावलीचा आसरा घेत होती. आता मी पंधराएक वर्षाची झाली होते. माझं नव तारुण्य, नवचैतन्य बहराला येत होतं. हळूहळू मला फुलं यायला लागली. चिंचुणी लागायला लागल्या. जेव्हा फुल आणि चिंचुण्या लागायच्या तेव्हा गावातल्या सगळ्या छोट्या छोट्या ईवल्या, इवल्या पोरी माझ्या भोवताली यायच्या. अलगद अलगद माझ्या फांदीला खेचून माझ्या फुलांना आणि चिंचण्यांना त्या तोडून खायच्या. मला खूप आनंद वाटायचा. लेकरं माझ्या भोवताली येतात. खेळतात, नाचतात. याचा आनंद मला वाटायचा.मुलांना हवी तेवढी फुल आणि चिंचुण्या मी द्यायची. दातृत्वाचा आनंद वाटायचा.

चींचा मोठ्या व्हायच्या, पिकायच्या तेव्हाही खूप मुली मुलं माझ्याकडे येऊन चिंचा घेऊन जायचे. कुणी माझ्या अंगावरती चढायचे खेळायचे, हसायचे, उड्या मारायचे. खूप मजा यायची. मुलांनी मन लावून चिंचा खाव्यात मी सर्वांना भरभरून चिंचा द्यायचे. आनंद वाटायचा. पंचमी सणाच्या दिवशी तर सांगायलाच नको. माझ्या वेगवेगळ्या फांद्यांना झोके बांधून गावातील लेकर दिवसभर झोके खेळायची. खूप मजा यायची. माझी जशी जशी फांदी हालेल तसं तसं त्यांनाही खूप मजा यायची. दिवसभर लेकरं माझ्या बहुतालची हलणारच नाहीत. रोज जेवढी लेकरं बाळ माझ्या सावलीत बसत असायची, खेळायची तेवढाच मला आनंद वाटायचा. पण रात्र झाली की सर्वजण आपापल्या घरी जायचे. मी मात्र एकटीच गावाच्या बाजूला पुन्हा उजडणाऱ्या दिवसाची वाट पहात...

मी माझ्या गावातल्या सहासे सातशे पिढ्या पाहिल्या असतील. प्रत्येक पन्नास शंभर वर्षांमध्ये खूप बदल झालेले मी माझ्या नजरेने पाहिले. ओला दुष्काळ पडायचा तेव्हा मला खूप आनंद वाटायचा. पण जेव्हा कोरडा दुष्काळ पाडायचा तेव्हा माझ्याही मनाची आणि शरीराची लाही लाही व्हायची. गावाच्या गावं ओस पडायची. माणसं लेकर बाळ पोटाची आग विझविण्यासाठी मिळेल त्या दिशेने निघून जायची. तेव्हा मात्र मी एकटीच वाट बघत असायची. कधी पावसाळा येईल गावातून निघून गेलेली लेकरं बाळ कधी परत येतील. माझ्या भोवतीने खेळतील. माझ्या सावलीत बसतील. असं मला खूप वाटायचं. परंतु तेवढा कालावधी त्यांना घालवणे क्रम प्राप्त असायचं. कारण इकडे जनावरांना, माणसांना खायला प्यायला नसायचं. असे काही उन्हाळे पावसाळे मी माझ्या नजरेनी पाहिले.

मी आत्ता बरीच मोठी झाली होते. मध्यंतरीच्या काळामध्ये गावातल्या लोकांनी मला लागलेल्या चिंचेचा हारास काढला. मला दुसऱ्या गावातल्या बागवानाला विकले. त्यांनी मात्र सपासप माझ्यावर चढून सगळ्या चिंचा काढून घेऊन जायचे. त्यावेळेला मला मात्र वेदना होत होत्या. कारण तो चिंचेसाठी माझ्या कवळ्या कवळ्या फांद्या तोडायचा. बऱ्याचश्या फांद्या माझ्या तोडल्या गेल्या होत्या. कारण तो माणूस चिंचेसाठी यायचा. माझ्या संरक्षणासाठी नव्हता!!! हे इथल्या गावातल्या लोकांना खरंच समजलं नाही. जेव्हा लोक मला दरवर्षाला विकायचे.तेव्हा मला अगदी गाय कसायला विकतात असीच माझी केवीलबाणी अवस्था व्हायची. माझी भावना चिंच विकणाऱ्या गावातल्या माणसांना, आणि विकत घेणाऱ्या त्या माणसाला कळत नसायची. तो चिंच विकत घेणारा माणूस पूर्ण फांद्याची वाट लावायचा. मन उदास व्हायचं. खूप वेदनादायी ते क्षण होते.

जर मला वाणी असतील तर या सर्वांना ओरडून सांगितलं तरी असतं. की बाबा रे मला विकू नका. कारण माझी उंची खुंटते आहे. माझ्या फांद्या तुटतात. असतीच वाणी तर नक्की ओरडून सांगितलं असतं. पण माझ्या भावना या लोकांना कशा कळनार. नाहीच समजलं यांना!!!! परंतु नंतरच्या काळामध्ये लोकांना वृक्षाचं महत्व कळू लागलं तसं तसं मला विकायचं बंद केलं. तेव्हापासून मी आनंदी असते. लेकर बाळ हवे तेवढ्या चिंच घेऊन जातात. ते मात्र माझ्या डेठालाही हात लावत नसायचे. याचा मला समाधान वाटायचं. काळा मागे काळ जाताना मानवनिर्मित आणि निसर्गनिर्मित संकट लोकांचे वरती यायची. ती संकटे पाहून मनामध्ये घालमेल व्हायची.

छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य भरभराटीस येतानाही मी पाहिलं. किल्ल्यामागे किल्ले महाराज सर करत होते. उभ्या महाराष्ट्रामध्ये नवचैतन्य प्रसरले होते. गड किल्ले रुबाबामध्ये उभा रहात होते. प्रत्येक किल्ल्यावरती भगवे पडकत होते. अथांग पसरलेला समुद्र आणि पहारा देत असणारा सह्याद्री डौलाने उभा होता. इथल्या लेकी बाळी, बाया पोरी,सुरक्षित आणि आनंदी होत्या. प्रत्येक शेतकरी सन्मानाने जीवन जगत होता. भरभराटीस आलेलं वैभव माझ्या नजरेने मी पाहिलं. त्या काळात मी खूप सुखी होते. मा. जिजाऊचे प्रभावशाली विचार घेऊन छत्रपती शिवाजी महाराजांनी उभा महाराष्ट्र गाजवला. शिवाजी महाराजांच्या नंतर शंभूराजे यांनी शत्रूला सळो की पळो करून सोडले होते. प्रत्येक माणूस त्या काळामध्ये निश्चिंत होता. मात्र शंभू महाराजांचा घात झाला. आणि पूर्ण भारत देश अस्वस्थ झाला. हळहळला, भेदरला, चारी बाजूने अंधकार पसरला होता. समाज दुखी झाला, भयभीत झाला, सह्याद्रीच्या कड्या कपारी थरथरल्या. ते पर्व मात्र खूप अस्वस्थ वेदनादायी असुरक्षित महाकाय काळा कुट्ट अंधारच जणू पसरला होता. दिवसा मागुण दिवस वर्षामागून वर्ष बरीच सरून गेली होती. मध्यंतरीचा काळ निजामाचा होता.

या काळामध्ये भेसूर अवस्था झालेली. गावातल्या बाया, पोरी, जनावर, माणसं, कुणीच सुरक्षित राहिली नव्हती. छोटी छोटी वासर, जनावर, शेरड, कोकर ही निजाम राजवटीतल्या नौकरदाराने ओढून न्यायची; ती कापून खायची. हे मला पाहवत नव्हतं. गावातल्या बाया पोरी रजाकाराने वापरल्या, पळऊन नेहल्या. कुठे गेले असतील??? काय झालं असेल??? आई-वडिलांची, भावंडाची काय अवस्था झाली असेल??? सांगता नाही!!!!. सारी गावे हातबल झालेली.ते मी उघड्या डोळ्यांनी पाहिलं. पण माझा नावीलाच होता. मी गुमान सर्व घडत असणाऱ्या घटनांच्याकडे बघत राहायची. कधी कधी वाटायचं मला हात असते पाया असते तर तर ह्या रजाकाराचे कोथळे फाडले असते. त्यांचे खून केले असते.परंतु मला ना बोलता येत नव्हतं. ना चालता येत नव्हतं. नाहीतर मी एकालाही सोडलं नसतं. 1972 चा दुष्काळ गावावरती पडला होता. अडातलं पाणी आटलं. शिवार करपून गेला. माझ्या भोवताली फिरणाऱ्या लोकांनी लेकरा बाळानी गावं सोडली. शेतं उजाड झाली. रानं करपून गेली. धानं जागीच जळाली. झाडाला पान शिल्लक राहिले नाही. चिमण्या पाखरे जानवरे पटापटा मरूत होती. मी मात्र तशीच पानं झडून गेलेल्या फांद्या घेऊन पावसाची प्रतीक्षा करीत उभी होते. दोन वर्षाचा कालावधी गेला. परंतु पावसाने फिरवूनही पाहिलं नाही. त्यावेळी मात्र मी घायाळ झाले. माझ्या अंगाची लाही लाही झाली होती. फांद्या तुटून फांद्यावर फांद्या पडत होत्या. दुष्काळाने केलेला कहर मलाही सोसवत नव्हता. वीजा कडाडून पडाव्यात तशा माझ्या मोठमोठ्या फांद्या खाली कोसळत होत्या. तेही सोसण्याचा खूप प्रयत्न केला.

दोन वर्षांनी दिवस बदलले. आणि पुन्हा पावसाच्या सरी कोसळल्या. पुन्हा माझं नवं चैतन्य फुलले. गाव सोडून गेलेली लेकरं, बाळ, बाया, पोरं सगळी गावात आली. आनंदाचे डोही आनंद तरंग या म्हणीप्रमाणे पुन्हा सर्व गाव जमा झालं. परंतु ज्यांना शेती नव्हती, घरे नव्हती, ती माणसं मात्र परत कधीच आली नाहीत. त्यांनी कायमच गाव सोडलं. गावाचं वैभव पुन्हा फुलयला सुरुवात झाली. गावामध्ये वर्षभराचे चालत असणारे रीतीरीवाज, सन, उत्सव, महोत्सव त्यावेळेला सर्व गाव आनंदाने साजरा करत असायचं. गावात रामायण लावलं जायचं. लक्ष्मण शक्तीचा कार्यक्रम, दिपवाळीचा कार्यक्रम, पंचमीचा सण, तरुण पोरी लग्न होऊन परगावी गेलेल्या दिवाळीत यायच्या मला भेटल्यानंतर खूप खूप बरं वाटायचं. या सर्वजणी आठवण करीत राहायच्या. नागपंचमीच्या वेळेला झोका खेळताना मलाही त्याना खूप झोका देताना बरं वाटायचं. आज किती वर्णन करू सांगायला शब्दही कमी पडतात.

गेले 50, 60 वर्षांमध्ये गावातल्या लोकांनी माझी खूप काळजी करायचं पुन्हा ठरवलं. कारण मी आता थकले भागले म्हणून सर्व गावकऱ्यांनी माझ्या भोवताली दगड माती मुरूम टाकून खूप मोठा ओठा बनवला आहे. त्यामुळे माझी सुरक्षितता थोडीशी सुधारली आहे. त्या ओठ्यावरती गावातली लहान थोर माणसं येऊन बसतात. कोणी शांत निवांत झोपी जातात. लेकरं बाळ खेळत असतात. माझ्या उजव्या बाजूची एक मुळी वाकडी झालेली. तिचा आकार मात्र जीपच्या दरवाजा सारखा. त्या खोपडीत बसून मुलांना जीप चालवायचा मोठा आनंद वाटतो. दिवसभर त्या खोपडी मध्ये मुलं बसून गुई गुई करून मोटार फिरवण्याचा आनंद घेत असतात. खूप बर वाटत.

गेली सातशे वर्षांपूर्वी पिंपळाला, वडाला लावून लोकांनी सावली केली. निसर्ग फुलवला. ऑक्सिजन निर्माण केला. परंतु त्यानंतरच्या तीन-चारशे वर्षाचे दरम्यान कुठेही नवीन झाड लावलं नाही. आम्ही आता म्हातारी झालेली झाडे वाळून गेलो तर, पुन्हा सावली कोण देणार??? याची मात्र भीती आज वाटते. आमची वंशवेल वाढली पाहिजे. ते जतन झालं पाहिजे. मानवांनो तुम्हाला जसा जगण्याचा अधिकार मिळालेला आहे. तसा आम्हालाही जगण्याचा अधिकार आहे. आम्हालाही जगवा, वाढवा तरच आम्ही तुमच्या कामी येऊ. अजून काय सांगणार!!!!

जाता जाता नक्की सांगेन की माझ्यासारखे चिंच, वड, पिंपळ असे महाकाय वृक्ष लावा. आणि आम्हाला जतन करा.. तुम्ही आम्हाला जतन केलं की, आम्ही नक्कीच तुम्हाला सावली, फळ, ऑक्सिजन देऊ.....

# धुळ्यात फॅशन डिझाईन व इंटेरियर डिझाईनचे सेमिनार

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** अनेकांसाठी प्रेरणा आणि करिअर घडवण्याचे स्त्रोत म्हणजे फॅशन डिझाईन व इंटेरियर डिझाईन कोर्स "ज्यात अनेकांचे भवितव्य उज्वल झाले आहे. सदर हा कोर्स करण्यासाठी धुळ्यातील विद्यार्थ्यांना नासिक, पुणे, मुंबई सारख्या शहरांमध्ये जावे लागले मात्र आता आयडीटी धुळे संस्थेच्या माध्यमातून आपल्या धुळे शहरात फॅशन डिझाईन व इंटेरियर डिझाईन कोर्ससाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. या संदर्भात आज सक्सेस स्टोरी या विषयावर विद्यार्थी व पालकांसाठी सेमिनारचे आयोजन करण्यात आले होते. या सेमिनारचे उद्घाटन संस्थेचे डायरेक्टर महेंद्र शेवाळे यांच्या हस्ते झाले तसेच त्यांनी यावेळी आयडीटी च्या धुळे संस्थेतील विद्यार्थी व पालकांना सखोल असे मार्गदर्शनही केले आहे. फॅशन डिझाईन व इंटेरियर डिझाईन कोर्स संदर्भातील फायदे व त्यातून आपले उज्वल भविष्य यासंदर्भात विद्यार्थ्यांना कानमंत्र हे यावेळी महेंद्र शेवाळे यांनी दिला आहे. विद्यार्थ्यांना फॅशन डिझायनिंगचे जग आणि मूलभूत संकल्पना आणि अभ्यास समजून घेण्यास आणि त्यांना फॅशन डिझाईन उद्योगाशी पारंगत होण्यास मदत व्हावी याकरिता आयडीटी धुळे संस्थेच्या वतीने मार्गदर्शनही करण्यात आले आहे. तसेच पालकांना व विद्यार्थ्यांना धुळे जिल्ह्यात सुरू असणाऱ्या इंटेरियर डिझाईन व फॅशन डिझाईनच्या विद्यार्थ्यांना विशेष ॲडमिशन संदर्भात मार्गदर्शन करण्यात आले.

या कार्यक्रमात आयडीटी धुळे संस्थेतील विद्यार्थी व पालक यांनी या कार्यक्रमाला हजेरी लावली. सदरील कार्यक्रमाचे आयोजन आयडीटी धुळे संस्थेचे सेंटर कॉर्डिनेटर रेखा जगताप तसेच संस्थेचे फॅशन डिझाईन व इंटेरियर डिझाईनचे प्राध्यापक पुष्पा साळुंखे, वैशाली दंडगव्हाळ, ऐश्वर्या मोरे, मनोहर खैरनार यांनी या कार्यक्रमाचे आयोजन व सूत्रसंचालन केले.



# नांदातांडासह परिसरात पोळा सण उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** तालुक्यातील नादातांडासह परिसरात पोळ्याचा सण उत्साहात साजरा करण्यात आला. वर्षभर शेतात राबणाऱ्या सर्जा राजाला (बैलांना) सजवून नादातांडा गावाच्या वेशीतून वाजत गाजत बैलाची मिरवणूक मोठ्या थाटामाटात काढण्यात आली होती.

विशेष म्हणजे भाजपचे जिल्हा उपध्याक्ष जयप्रकाश चव्हाण, सरपंच मोरसिंग चव्हाण, भाजपा तालुका उपध्याक्ष प्रदीप चव्हाण, युवा उद्योजक सचिन राठोड यांनीही सर्जा राजाची पुजा करुन त्यांना पुरणपोळीचे जेवण देऊन पोळा निमित्ताने मिरवणुकीत सहभाग घेतला. यंदा खरिपाची पेरणी वेळेवर झाली. यामुळे बळीराज्याचे कपाशी, मुग, सोयाबीनसारखी पिके सध्या चांगली जोमात आहे. पोळा हा सण साजरा करण्यासाठी शेतकरी यांच्या खिशात दमडी देखील नसताना शेतात रात्रंदिवस राबणाऱ्या सर्जा राजाला सजावट करून पुरण पोळी खाऊ घालायला शेतकरी मागेपुढे पाहीले नाही. मोठ्या आनंदात पोळा हा सण साजरा केला. परिस्थिती तंगीची असली तरी शेतकरी बैल 'पोळा' सण मोठया उत्साहाने साजरा केला. गावातील मारुती मंदिराजवळ सर्व शेतकऱ्यांनी बैलांना सजवून आणले होते. यावेळी नादातांडा येथे फर्दापूर येथील पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक देवीदास वाघमोडे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरिक्षक रणजित कासले, बीट जमादार मिरखाँ तडवी, डी.एन.नप्ते यांनी बंदोबस्त ठेवण्यात आला होता. अशा प्रकारे पोळा हा मोठ्या आनंदात नादातांडा येथे साजरा करण्यात आला.

# अंगणवाडी सेविका मदतनीसांचे तिसरे अधिवेशन

आधुनिक केसरी न्यूज

**चिखली :** तालुक्यातील अंगणवाडी सेविका मदतनीसांचे ३ रे तालुका अधिवेशन संघटनेच्या राज्य कौन्सिल मेंबर कॉ.मंदाताई डोंगरदिवे यांच्या अध्यक्षतेखाली रविवार दि. २८ ऑगस्ट रोजी सकाळी १०.३० वाजता पंचायत समितीच्या सभागृहात चिखली येथे आयोजित करण्यात आले आहे.

या अधिवेशनाला उद्घाटक म्हणून मो. आसिफ भाई उपस्थित राहणार असून संघटनेचे जिल्हाध्यक्ष कॉ.पंजाबराव गायकवाड हे उपस्थितांना मार्गदर्शन करणार आहेत. तसेच या अधिवेशनासाठी तालुका प्रकल्प अधिकारी संदिप गवळी, तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष इफ्तेखार खान, मुक्त पत्रकार



सत्य कुटे, साहित्यिक सुरेश साबळे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. या अधिवेशनास चिखली तालुक्यातील अंगणवाडी सेविका मदतनिसांनी आवर्जून वेळेवर उपस्थित रहावे, असे आवाहन संघटनेच्या वतीने सरिता पवार, शैला उबरहंडे, पुष्पलता खरात, नंदा मोरे, संगीता मादनकर, ॲड.विद्या बडुटकर, कल्पना गवयी, उर्मिला खेडेकर, विजेता राऊत, शोभा परिहार, मंगलाताई ठेंगा, स्नेहलता बोर्डे, वर्षाताई पाटील, सुनिता घाडगे इत्यादीनी केले आहे.

## महादेव साखर बारव येथे पोळा सणाच्या निमित्ताने दीपोत्सव

आधुनिक केसरी न्यूज

**बिडकिन :** शुक्रवार दि.२६ रोजी सायंकाळी बिडकिन येथील राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्यकाळात तयार झालेल्या बाजारतळातील महादेव साखर बारव येथे दिप उत्सवाचा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ११०० पणत्या चा वापर करत दिपप्रज्वलन केले होते. असून पुर्ण बारवावर भव्यदिव्य रांगोळी काढत सजविण्यात आला होता.

यावेळी बिडकिन येथील युवावर्ग यांच्या मदतीने हा दिपोत्सव पर पणत्या लावत व रांगोळी काढत करण्यात आले. यावेळी जिल्हा परिषद सदस्य विजय चव्हाण, सहायक पोलिस निरीक्षक संतोष माने यांच्या हस्ते पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले व दिपप्रज्वलन करत दिपोत्सव साजरा करण्यात आला. याप्रसंगी निकेश राऊत, निलेश धडे, कचरु शिंदे, महेमुद शहा, पिनु मुरदाडे आदींसह बिडकिन व परिसरातील नागरिकांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.



## तान्हा पोळ्याच्या दिवशी शेतकऱ्याने आवळला 'गळफास'

आधुनिक केसरी न्यूज



**यवतमाळ :** जिल्ह्यात काल शुक्रवारी पोळा सण साजरा करण्यात आला. आज तान्हा पोळा साजरा करण्यात येत आहे. मात्र मारेगाव तालुक्यातील नरसाळा येथील अल्पभूधारक शेतकऱ्याने झाडाला गळफास लावून जीवनयात्रा संपविली. ही घटना आज शनिवारी २७ ऑगष्ट रोजी सकाळी ८ वाजताचे दरम्यान उघडकीस आली.

गजानन नारायण मुसळे (२८) रा. नरसाळा असे गळफास लावून आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याचे नाव आहे. त्यांचेकडे चार एकर कोरडवाहू शेती आहे. यंदाच्या अतिवृष्टी ने पिकांची वाढ खुंटली आहे. त्यातच शेतात पिकापेक्षा तन वाढले आहे. येणाऱ्या उत्पादनात कमालीची घट होण्याची संभाव्य शक्यता आहे. मागील काही दिवसांपासून तो आर्थिक विवंचनेत राहत होता. आज नेहमी प्रमाणे तो गुरे चारण्यासाठी सकाळी शेतात गेला. रस्त्यालगत असलेल्या निंबाच्या झाडाला त्याने गळफास घेत जीवनयात्रा संपविली. या घटनेने गावात हळहळ व्यक्त होत आहे.



## पोरगाव व पंचक्रोशीत पोळा सण उत्साहात साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**कचनेर :** पैठण तालुक्यातील पोरगाव व आजूबाजूच्या पंचक्रोशीतील गावांमध्ये पोळा सण मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. भारत हा एक कृषिप्रधान देश आहे. भारताचे अर्थव्यवस्था ही प्रामुख्याने शेतीवर अवलंबून आहे. भारतात बैल गाय म्हैस शेळ्या मेंढ्या इत्यादी शेतीवर अवलंबून असणाऱ्या प्राण्याचे खूप महत्त्व आहे. त्यामध्ये शेती ही बैलावर अवलंबून असल्यामुळे बैलाला खास महत्व आहे.

बारा महिने आपल्या शेतामध्ये राब राब राबणाऱ्या बैलाविषयी कृतज्ञता व्यक्त करणारा पोळा हा सण आहे. शेतकऱ्याकडून पोळा हा सण दोन दिवस साजरा केला जातो. पहिल्या दिवशी बैलाला स्वच्छ धुवून काढले जाते. आणि ज्या खांद्याने तो बारा महिने नांगर ओढतो त्या खांद्याची तुपाने व हळदीने खांदा मळणी केली जाते. दुसऱ्या दिवशी सकाळपासूनच या साहित्याने बैलाला सजवल्या जाते त्या साहित्याची रंग रंगोटी सुरू केली जाते. बैलांच्या शिंगणा रंग लावला जातो त्यांना घागरमाळी, मोरक्या, शिंगदोऱ्या, गोंडे व त्यांच्या अंगावरती झुलीने पांघरले जाते. अशा प्रकारे बैलाला एकदम सुंदर प्रकारे सजवून शेतकरी त्यांना गावातील प्रमुख मंदिरासमोर घेऊन जाऊन देवाची मनोभावे पूजा करतो. व नंतर बैलांना घरी आणले जाते. बैलाची पूजा केली जाते. त्यांना पुरणपोळीचा नैवेद्य दाखवला जातो व त्यांना पुरणपोळी खाऊ घातली जाते. त्यांच्याकडे बैलं नसतात ते लोक मातीच्या बैलाची पूजा करतात. अशा पद्धतीने ग्रामीण भागात पोळा मोठ्या उत्साहाने साजरा झाला.

## सावळदबारा येथे बैलपोळा हनुमान मंदिरावर उत्साहात साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथे कोरोनाच्या काळापासून दोन वर्षापासून सण, धार्मिक उत्सव, पोळा सण बंदच होता. परंतु यंदा शासनाने नियम स्थिल केल्यामुळे यंदा हाणुमान मंदीरावर बैलपोळा हा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. काळ्या मातीतून सोनं पिकविण्यासाठी, आपला प्रपंच चालविण्यासाठी शेतीत हाडाची काढं करणाऱ्या शेतकऱ्याला मदत लाभते ती बैलाची..! या बैलाच्या उपकाराची परतफेड फेडता- पडल्या जात नाही, परंतु एक दिवस का होईना याच बैलांना नवरदेवाप्रमाणे सजवून पुरणपोळीचा नैवेद्य देऊन पोळा या सणाच्या रूपाने त्याचा आदर केला जातो. म्हणून बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करणारा सण म्हणजे बैलपोळा आणि तो आज सर्वत्र उत्साहाने साजरा केला जातो.

कवयित्री बहिणाबाई आपल्या पोळा या कवितेत म्हणतात "वडे वखर नांगर नाही कष्टाले गणती, चला पूजा ज्याच्या जीवावर शेती"..! भारताची संस्कृती तशी जगात सर्वश्रेष्ठ आहेच. माणसाबरोबरच प्राण्यांचाही इथे विचार केला जातो. प्राण्यावर प्रेम करा, त्याची हत्या करू नका, असे कितीतरी संदेश याच भूमीतील संत- महात्म्यांनी दिले. वर्षभर राब-राब राबणाऱ्या बैलांच्या उपकाराची परतफेड करण्यासाठी त्याचा सन्मान म्हणून दरवर्षी मोठ्या उत्साहाने शेतकरी वर्ग पोळा सण साजरा करीत असतो. वर्षभर पोशिंद्या शेतकऱ्यासोबत राहून जगाला पोसणाऱ्या ऋषभ राज्याच्या उपकाराचं दिन म्हणजे पोळा सण. महाराष्ट्रात ग्रामीण भागात मोठ्या उत्साहात श्रावण महिन्यात पिठोरी अमावस्येला हा सण येतो. अगदी प्राचीन काळापासून बैल शेतकऱ्याचा मित्र आहे. शेतकऱ्यासाठी राबराब राबतो ग्रामीण भागात सर्जा-राजा, ढवळ्या-पवळ्या अशा नावाने बैलजोडी प्रसिद्ध असते. बैलाचे ऋण व्यक्त करण्यासाठी या



दिवशी बैलाच्या अंगावर रंगीत नक्षी काढून पाठीवर रंगीबेरंगी टाकतात. त्याची मिरवणूक काढून घरोघरी सुहासिनी बैलाची पूजा करून त्याला ओवाळतात आणि पुरणपोळीचे जेवण बैलाला जेवू घातले. प्राण्यावर देखील जीवापाड प्रेम करावे हा संदेश बैलपोळ्याच्या निमित्ताने दिला जातो. कृषी प्रधान आपल्या देशात शेतीची कामे करणाऱ्या या बैलांना साधारण महत्व आहे.

विशेषतः शेतकरी वर्ग बैलाचे ऋण फेडण्याच्या उद्देशाने हा पोळा सण साजरा करताना दिसतात. घरात आनंदी वातावरणही या सणाला दिसून येते. सकाळपासून बैलाला आंघोळ घालून तदनंतर शिंगाची रंगरंगोटी, पाठीवर झूल, पायात पैंजण, गळ्यात घंटा, घुंगरू असा साज करून सामूहिक शिकविणे बैलांचा पोळा हाणूमान मंदीरावर भरविण्यात आला होता. पोळ्यामधे कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडू नये याकरिता फर्दापूर पोलीस ठाण्या अंतर्गत सपोनि देवीदास वाघमोडे यांच्या मार्गदर्शनाखाली सावळदबारा बिटजमादार मिरखाँ तडवी यांनी चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

## यावर्षी श्रीरामपूरचा बैल पोळा उत्साहात साजरा, उत्कृष्ट बैलजोडीला रोख बक्षीसे

आधुनिक केसरी न्यूज



**पुसद :** तालुक्यातील श्रीरामपूर ग्रामपंचायत येथे बैलपोळा हा सण साजरा करण्यात येतो. यावर्षी 26 ऑगस्ट 2022 रोज शुक्रवारला हा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सर्ज्या राज्याची वाजतगाजत मिरवणूक काढण्यात आली. शेवटी संकटहरण हनुमान मंदिराच्या प्रांगणात मोठ्या प्रमाणात शेतकरी बांधव, बालगोपाळ, समस्त गावकरी मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मानाच्या बैलजोड्यांचे मंगलाष्टके म्हणून लग्न लावण्यात आले. याप्रसंगी कापूस पणन महासंघाचे उपाध्यक्ष ययाती नाईक, वसंत नगर पो.स्टे. ठाणेदार प्रवीण नाचनकार, सरपंच आशीष कालबांडे, सचिव भगत, माजी सरपंच मिलिंद उदेपुरकर, परीक्षक ग्रामगीताचार्य गणेश धर्माळे, नरेंद्र जाधव, वडते यांनी केले. सकाळ समूहातर्फे कलेक्टर यांच्या आदेशानुसार हरणार नाय लढणार शपथ मंगलाष्टके गुरूदेव सेवा मंडळातर्फे भूमिका धर्माळे, देवश्री काळबांडे यांनी सादर केली. प्रथम ३००१ रू. भुजंगराव जाधव, द्वितीय २००१रू. दिलीप कदम, तृतीय १००१ देवानंद पारध, प्रोत्साहनपर चतुर्थ दिनकर ठेंगे ७०१ त्याचप्रमाणे स्व. सदाशिवराव काजळे यांचे स्मृतिप्रीत्यर्थ सर्व बैलजोडींना प्रत्येकी ५०१ रु. मान्यवरांच्या हस्ते बक्षीस देण्यात आले.

ग्रामविकास अधिकारी अनिल भगत, सदस्य दिनेश राठोड, मधुकर कलिंदर, विजय राठोड, सचिन भिताडे, राहुल सहारे तसेच राजेश आसेगावकर, बालाजी भेंडे, वीरेंद्र इंगोले, मुख्याध्यापक जोशी, गोविंद कदम, प्रमोद कदम, राजूभाऊ डहाके, सुधाकर शिंगनजुडे, यशवंत देशमुख, निवृत्तीनाथ बैस्कार, बाळकृष्ण मंदाडे, चाकोते, अशोक चंद्रवंशी, प्रा.आनंद सरोदे, ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांसह हजारो ग्रामवाशी उपस्थित होते. ग्रामपंचायत कर्मचारी हरी मस्से, गणेश धर्माळे, यशवंत देशमुख यांनी झडत्या दिल्या.



## सण बैलाचा मान मात्र माऊलीचा

आधुनिक केसरी न्यूज

### आध्यात्मिक विचारांनी आपेगावात फुटला पोळा

**पैठण :** आपेगाव ता. पैठण येथे अनेक वर्षापासुन वेगळ्या पध्दतीने पोळा सण साजरा केला जातो. पोळा म्हटलं कि मानाचा विषय येतो मात्र आपेगाव येथे पोळा फोडण्याचा मान संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानच्या बैलासह माऊलीला आहे.

गेल्या अनेक वर्षापासून आपेगावात पोळ्याचा मान माऊलीला असल्यामुळे सर्व ग्रामस्थाच्या हजेरीत मारोती मंदीरासमोर वेशीत मानाचे तोरण लावून गावकरी माऊलीच्या बैलाची वाजत गाजत मिरवणूक मारोती मंदिरा समोर आणून विधीवत पुजा होवून ज्ञानेश्वर महाराज संस्थानच्या वतीने बैल पोळ्याचे मानाचे तोरण तोडल्यानंतरच पोळा फुटतो. मात्र मानाचेच माऊलीचे बैल वेशीतून जाताना व गावातील बैल दुसऱ्या मार्गाने आपआपल्या घरी पुजेसाठी नेतात. माऊलीच्या पाठीमागे आजपर्यंत कोणीही बैल वेशीतून घेवुन जात नसल्याने अध्यात्मिक विचारांनी आजही आपेगावात माऊलीलाच बैल पोळ्याचे तोरण तोडण्याचा मान आहे.

# जनार्दन कसारे यांना तत्काळ न्याय द्या : संदीप मानकर

## मातंग एकता आंदोलनाच्या वतीने औरंगाबाद जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** गायरान जमिनीच्या वादातून औरंगाबाद शहराजवळील पिसादेवी परिसरात मातंग समाजातील जनार्दन कसारे यांचा जातीय द्वेष भावनेतून कुऱ्हाडीचे घाव घालून भरदिवसा खून करण्यात आला असून मातंग एकता आंदोलनाच्या वतीने औरंगाबाद जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले आहे.

या निवेदनात खालील मागण्या केल्या आहेत. मयत जनार्दन कसारे यांचा खून करणाऱ्या सर्व फरार आरोपींना पाठीशी न घालता त्यांचा तात्काळ शोध घेण्यात यावा., जनार्दन कसारे यांच्या मारेकऱ्यांना फाशीची शिक्षा देण्यात यावी., जनार्दन कसारे यांच्यासहित राज्यभरात आजपर्यंत घडलेल्या घटनेतील मातंग परिवारांस 50 लाख रुपयांची आर्थिक मदत देण्यात यावी., गायरान जमिनीच्या वादांतून हा खून झाला असल्याने शासनाने या गायरान जमिनीचा सातबारा कसारे परिवाराच्या नावे तात्काळ करावा., जनार्दन कसारे यांच्या परिवारातील एका सदस्यांस शासकीय नोकरी देण्यात यावी., जनार्दन कसारे यांचा खून करणाऱ्या आरोपींचा खटला फास्टट्रॅक कोर्टा मार्फत



व अंडर ट्रायल चालवावा., मातंग समाजावर वारंवार होणाऱ्या घटनांची चौकशी करण्यासाठी उच्च न्यायालयातील निवृत्त न्यायाधीशांची त्रिसदस्यीय समिती स्थापन करण्यात यावी. अशा विविध मागण्यांचे लेखी निवेदन मातंग एकता आंदोलनाचे संस्थापक अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्याचे माजी गृहराज्यमंत्री रमेश दादा बागवे यांच्या मार्गदर्शनाखाली औरंगाबाद जिल्हाधिकारी यांना देण्यात आले.

यावेळी या प्रकरणात रीतसर कारवाई करुन आरोपींना कठोरातील कठोर शासन करण्यासाठी आम्ही अग्रेसर राहुत कारण कुठल्याही वादातून एखाद्या व्यक्तीला कायमचा संपून टाकणे असे कुठल्याही कायद्यात लिहले नसून जो या कायद्याचा भंग करेल किंवा कायद्याला चॅलेंज करेल त्यांना कुणीही माफ करणार नाही असा शब्द त्यांनी मातंग एकता आंदोलनाच्या शिष्टमंडळाला दिला. याप्रसंगी मातंग एकता आंदोलनाचे मार्गदर्शक व सल्लागार तथा जिल्हा नियोजन समितीचे सदस्य राजु आहिरे, जिल्हाध्यक्ष संदीप मानकर, जिल्हा सचिव अशोक शिरसाठ, शहराध्यक्ष किशोर तुपे, महिला आघाडी जिल्हाध्यक्षा राजश्री साठे, जिल्हा संघटक भरत मानकर, ज्योतीताई जाधव, पत्रकार समाधान वाणी, पत्रकार उमेश नेमाडे, सुरेश चंदनशिव, विलास भालेराव, आडगांवचे उपसरपंच विलास खोतकर, कुणाल कांबळे, सचिन पाचूंदे, कचरु गायकवाड, दगडू रायटे, सकल मातंग संघर्ष समिती पैठणचे पदाधिकारी अविनाश मिसाळ, युवा नेते नामदेव शरणागत, अंकुश मिसाळ, भगवान मिसाळ, अनिल ताकवाले आदींची उपस्थिती होती.

मातंग एकता आंदोलनातर्फे अत्यंत संयमी मार्गाने निवेदन देऊन सुद्धा पिडीत परिवाराला शासनाच्या व प्रशासनातर्फे न्याय मिळाला नाही अथवा फरार आरोपींना 30 तारखेपर्यंत गजाआड करता आरोपींना पाठीशी घालण्याचा प्रयत्न झाला तर मातंग एकता आंदोलन रस्त्यांवर उतरून राज्यभर तीव्र व आक्रमक आंदोलन छेडेल असा इशारा यांवेळी जिल्हाध्यक्ष संदीप मानकर यांनी दिला आहे.




# डॉ.सौ.इं.भा.पा. महिला कला महाविद्यालयात 'स्वास्थ्यासाठी आहार' विषयावर व्याख्यान

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** डॉ. सौ इंदिराबाई भास्करराव पाठक महिला कला महाविद्यालय येथे 'स्वास्थ्यासाठी आहार' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

'सर्वंकष निरामय स्वास्थ्य' समितीच्या वतीने दि.27 ऑगस्ट 2022 रोजी आहार तज्ञ, प्राध्यापिका रसिका देशमुख यांनी 'स्वस्थ्यासाठी आहार' या विषयावर मार्गदर्शन करताना सांगितले की, निरामय स्वास्थ्यासाठी शारीरिक, मानसिक, सामाजिक व आध्यात्मिक आरोग्याचे संतुलन साधणे आवश्यक आहे. दासबोध, गीता, पुराण ग्रंथ हे वाचूनच नाहीतर ते आचरणात आणणे, आपली जीवनपद्धती सुधारणे, आहार, विहार, विश्रांती, मनशांती हे सर्व आरोग्यासाठी आवश्यक आहे, असे प्रतिपादन केले.

अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्या डॉ. वसुधा पुरोहित यांनी मानसिक व शारीरिक स्वास्थ्य जपले पाहिजे, असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सुनिता बाजपाई यांनी केले तर, आभार प्रगटन प्राध्यापिका लंका मंडवत यांनी केले.

# गोमाता जगली तरच राष्ट्र, धर्म, समाज जगेल : प.पू. आचार्य गोविंदगिरीजी महाराज

आधुनिक केसरी न्यूज




**गेवराई :** येथे दि.23, 24, 25 रोजी भव्य सुरभियाग यज्ञ आयोजित केला होता. त्या सुरभियाग यज्ञात प.पु. गोविंदगिरीजी महाराज यांनी गोसेवा व गोरक्षण भारत देशासाठी किती महत्वाचे आहे व यावर आपली अर्थव्यवस्था अवलंबून आहे याची महती आपल्या प्रवचनातून विषद केली. कालच्या समारोपाच्या प्रवचनात भारतदेश बदल रहा है ! असेही गौरवोद्गार काढले. जम्मू-कश्मीर मधील ३७० कलम, अयोध्येतील प्रभु श्रीराममंदीर पुर्ण करुन देशाला आर्थिक महासत्ताकडे नेणारे सध्याचे नेतृत्व आहे असे म्हटले.

या बरोबर प्रत्येक युवकांनी आपल्या देशासाठी काहीतरी चांगले योगदान दिले पाहिजे, त्यामुळे देशाची प्रगती होऊन आपल्या समाजाला, गावाला, राष्ट्राला दिव्यत्व प्राप्त होईल, असे त्यांनी म्हटले. गोमाता, संत, सज्जनशीलता यावर सर्वानी श्रध्दा ठेवली पाहिजे. जसे की प्राचीनकाळी गोधनावरून आपली संपत्ती मोजली जायची. ९ लाख गायी होत्या. त्यांना नंदलाल म्हणतात असे त्यांनी प्रवचनात सांगितले. गाय ही आपल्या घरची सदस्य आहे. त्यामुळे आपली व देशाची अर्थव्यवस्था सुरळीत राहते, असे त्यांनी मार्गदर्शन केले. संजनशीलता व संतामुळे आपल्या देशात संस्कार धर्म रक्षणाचे कार्य व्यवस्थित चालू आहे असेही त्यांनी प्रवचनत सांगितले. तिन दिवस चालू असलेल्या या सुरभियाग यज्ञान पहिल्या दिवशी अंधचक्षू ह.भ.प. मुकुंदकाका जाटदेवळेकर महाराज यांचे हरिकिर्तन झाले. दुसऱ्या दिवशी गाथा मंदिर देहु येथील ह.भ.प पांडूरंग घुले यांचे हरी किर्तन झाले. सकाळी ७ वाजल्यापासून तीन दिवस हवन चालत असे. शेवटच्या दिवशी पुन्हा ह.भ.प मुकूंदकाका जाटदेवळेकर महाराज यांचे काल्याचे किर्तन झाले. चिंत्तेश्वर संस्थान गेवराई येथील ह.भ.प. महंत गुरुवर्य मसाननाथ महाराज यांच्या मार्गदर्शन व माजी नगराध्यक्ष गेवराईचे राधेश्याम अट्टल, बाहुबली जैन, अशोक जंवजाळ, दत्ताजी पत्की, डॉ.हेमंत वैदय, गोविंद जाटदेवळेकर, व गेवराई सुकन्या- श्रीमती शंकुतला पाटील व समितीच्या प्रेरणेने सुरभियाग यज्ञाचे गेवराईतील वाणी मंगलकार्यालय आयोजन केले होते. हा याग यशस्वी व उत्साहात पार पाडण्यासाठी सर्व गेवराईकरांचे मोलाचे सहकार्य लाभले महाप्रसादाने यज्ञाची सांगता झाली.

# मला बदनाम करण्यासाठी गुन्हा दाखल करण्यात आला : माजी नगरसेवक अफसरखान

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** मला बदनाम करण्यासाठी विरोधकांशी हातमिळवणी करून माझ्या विरोधात खोटा गुन्हा सिटीचौक पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित पोलिस अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करावी अशी मागणी पत्रकार परिषदेत माजी विरोधीपक्षनेते अफसरखान यांनी केले आहे.

त्यांनी पुढे सांगितले, माझ्या मालकीचे मिल कॉँर्नर येथे रेस्टॉरंट, लॉँजिंग आहे. त्यापैकी हॉल एका संस्थेला भाडे करारनामा करून सोशल एक्टिविटीज करण्यासाठी दिला आहे. तेथे बुध्दिबळ, सोशल क्लब व विविध सोशल एक्टिविटीज संस्थेचे सदस्य करत असतात. येथे जुगार अड्डा नसून दोन दिवस अगोदर सिटीचौक पोलिस ठाण्यातील पथकाने छापा टाकला व पन्नास लोकांवर माझ्यासहीत जुगार खेळत असल्याचा खोटा गुन्हा कोणतीही शहानिशा न करता दाखल करण्यात आला. मी शहरातील प्रतिष्ठित नागरिक आहे. पाच



वेळा विविध वार्डातून विजय मिळवत नगरसेवक बनलो. तीनवेळा मनपात विरोधीपक्षनेते पदावर काम केले. माझे शहरात मोठे सामाजिक कार्य सर्वांना माहीत आहे तरीही राजकीय भवितव्य खराब करण्यासाठी विरोधकांशी हातमिळवणी करून या गुन्ह्यात माझे नाव गोवण्यात आले. हे षडयंत्र करुन माझी बदनामी करण्यात येत असल्याचा आरोप अफसरखान यांनी केला आहे. माझ्या राजकीय जीवनात मी कधीही अवैध धंदे केले नाही, करणारही नाही. शहरात कायदा व सुव्यवस्था बाधित होवू नये यासाठी नेहमी पोलिस प्रशासनाला सहकार्य केले. कर्तव्यदक्ष पोलिस आयुक्त यांनी या प्रकरणी न्याय मिळवून द्यावा नसता आंदोलन तथा न्यायालयात दाद मागण्याचा इशारा त्यांनी त्यांच्या संपर्क कार्यालय येथे आयोजित पत्रकार परिषदेत दिला आहे.

# भगवान कोकाटे सरपंचपदी कायम

आधुनिक केसरी न्यूज

**लोणार :** तालुक्यातील आदिवासी गाव म्हणून ओळख असलेल्या टिटवी ग्रामपंचायतचे सरपंच भगवान कोकाटे यांनी मालमत्ता कराचा भरणा केला नसून निवडणूक शपथ पत्रामध्ये खोटी माहिती दिल्याच्या तक्रारीची सखोल चौकशी करून धनंजय गोगटे अप्पर जिल्हाधिकारी बुलढाणा यांनी भगवान कोकाटे हे सरपंचपदी कायम असल्याचा महत्त्वपूर्ण निकाल एका आदेशाने दिला आहे.

तालुक्यातील ग्रामपंचायत कार्यालय टिटवी निवडणूक झाल्यानंतर भगवान कोकाटे यांचे येथील संपूर्ण पॅनल बहुमताने निवडून आले होते. यावेळेस सरपंचपदी भगवान कोकाटे यांची बिनविरोध निवड करण्यात आली होती परंतु त्यांनी आपल्या



पदाचा गैरवापर करून मालमत्ता कराचा भरणा केला नसून निवडणुकीच्या वेळेस निवडणूक शपथपत्रामध्ये खोटी माहिती दिल्याची तक्रार सरपंच सचिव ग्रामपंचायत टिटवी व गटविकास अधिकारी पंचायत समिती लोणार यांच्या विरोधात माजी पंचायत समिती सदस्य ज्ञानेश्वर गणपती चिभडे यांनी जिल्हाधिकारी बुलढाणा यांच्याकडे केली होती. या तक्रारीवरून दोन्हीकडील वादी-प्रतिवादीच्या कागदपत्राची संपूर्ण पडताळणी केल्यानंतर ज्ञानेश्वर चिपडे यांचा तक्रार अर्ज खारीज करुन टिटवी ग्रामपंचायतच्या सरपंचपदी भगवान कोकाटे कायम असल्याचा महत्त्वपूर्ण निर्णय अप्पर जिल्हाधिकारी धनंजय गोगटे यांनी दिला आहे.



# बिडकीनजवळ तिहेरी वाहनांच्या धडकेत तिघे ठार

## उपचारादरम्यान रात्री उशिरा एकाची प्राणज्योत मालवली; विनानंबरचा हायवा ट्रक चालक घटनास्थळावरून पसार

आधुनिक केसरी न्यूज

**बिडकिन :** बिडकिन पोलिस ठाणे हद्दीतील शेकटा ते बिडकिन रोडवरील गिधाडा गावानजीक सायंकाळी भयानक अपघात झाला. तिहेरी वाहनांचा अपघात झाला असून यात तीन जण हे ठार झाले आहे तर एक जणाचा औरंगाबाद येथे उपचार सुरू असताना रात्री उशिरा मयत झाला आहे.

पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, बिडकिन ते शेकटा रोडवरील गिधाडा गावानजीक दोन मोटारसायकल चालक हे प्रवास करत असताना त्यांना विनानंबर हायवा चालकाच्या चुकीमुळे दोन्ही मोटारसायकल चालकाला जोराची धडक दिल्याने एक मोटारसायकल ही हायवाच्या दोन्ही चाकामध्ये गुतुन दुरपर्यंत फरफटत नेली गेली. हायवा चालकाचा ताबा सुटल्याने हा हायवा दोन्ही मोटारसायकलला धडक देऊन रोडच्या खाली गेला आहे. मृत व्यक्ती एका खासगी कंपनीतील कामगार असून शिफ्ट सुटल्यानंतर दोन वेगवेगळ्या दुचाकीवरून दुचाकी क्र. एम एच २० जीबी ८४८३ आणि एम एच २३ आर ९९६८ हे या दोन्ही दुचाकीने घरी निघाले होते. दरम्यान याचवेळी



भरघाव वेगाने जाणाऱ्या हायवा ट्रक ने दोन्ही दुचाकीला जोराची धडक दिली. सदरील घटनेत दत्तात्रय कैलास गावंडे वय 30 वर्षे, रा.रामनगर पिशोर ता.कन्नड हा जागीच ठार झाला तर ज्ञानेश्वर शामराव उबाळे वय ३० वर्षे रा.अंधारी ता.सिल्लोड यास उपचारासाठी औरंगाबाद येथे नेत असताना त्याची प्राणज्योत मावळली आणि शासकीय रुग्णालयात उपचार दरम्यान गजानन विश्वनाथ बडक वय २० वर्षे रा.पळशी ता.सिल्लोड हा गंभीर जखमी होता. रात्री उशिरा मयत झाला आहे. तिहेरी अपघात एवढा भयानक होता की यात एक मोटारसायकलचा चुराडा झाला आहे तर एक मोटारसायकलचे ही मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.

घटनास्थळी सहायक पोलिस निरीक्षक संतोष माने, पोलिस उपनिरीक्षक महेश घुगे, धनवे, आधाट, तोडकर आदींसह मोठ्या प्रमाणावर पोलिस विभागाने धाव घेत घटनास्थळावरून स्थानिक नागरिकांच्या मदतीने मयत व जखमींना रुग्णालयात उपचारासाठी पाठविण्यात आले. तिहेरी अपघाताप्रसंगी मोठ्या प्रमाणावर बघ्याची गर्दी मोठ्या प्रमाणावर झाली होती. बिडकिन व परिसरातील घटनेने हळहळ व्यक्त





केली जात आहे.

यावेळी पोलिसांच्या वतीने हायवा ताब्यात घेण्यात आला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक महेश घुगे हे करीत आहेत.

# होल्डिंग हँड्स पुणे शाखेची मोफत नृत्य कार्यशाळा

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** होल्डिंग हँड्स पुणे शाखेतर्फे आजपासून मोफत नृत्य कार्यशाळा आयोजित



करण्यात आली आहे. ५ ते १३ वयोगटातील मुलांसाठी ही कार्यशाळा असून बऱ्याच मुलांनी या नृत्य कार्यशाळेत सहभाग नोंदविला आहे. ही कार्यशाळा २५ ऑगस्ट ते ५ सप्टेंबर अशी आहे. आज पहिला दिवस होता. प्रशिक्षक म्हणून होल्डिंग हँड्स पुणे शाखेच्या जिल्हाध्यक्षा अपर्णा मेहता यांनी काम पाहिले. सुरेश सिरसीकर संस्थापक व अध्यक्ष असलेल्या औरंगाबादची होल्डिंग हँड्स बहुउद्देशीय संस्था ही राज्यभरात सक्रिय असून राज्यभरात या संस्थेच्या शाखा आहेत. राज्याच्या बाहेर ही पंजाब, गोवा व कर्नाटकात या संस्थेच्या शाखा आहेत. ही संस्था आरोग्य, शिक्षण, पर्यावरण, सांस्कृतिक आणि सामाजिक बांधिलकी असलेले अनेक उपक्रम राज्य व राज्याबाहेर राबवित असते.

# अंत्यसंस्कारासाठी आता लाकडाऐवजी ब्रिकेट गट्टूचा वापर

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** अंत्यसंस्कारासाठी लाकुड वापर करताना मोठ्या प्रमाणात वृक्ष तोड होते. त्याचा पर्यावरणावर परिणाम होतो. कार्बन उत्सर्जन प्रमाण कमी करणे अंत्यसंस्कार करणेसाठी लाकडाचा वापर केल्यामुळे होणारा वृक्षतोड थांबविता यावी यासाठी लाकडा ऐवजी ब्रिकेट्स (Briquettes गटु) चा वापर करणे आवश्यक आहे, यासाठी औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे आता अंत्यसंस्कारासाठी या गट्टू चा वापर केला जात आहे, हे गट्टू पंजाब रिनिव्हेबल एनर्जी सिस्टम्स प्राइवेट लिमिटेड कंपनीकडून उत्पादित केले जात आहे, अशी माहिती कंपनीचे प्रकाश झा यांनी प्रसिद्धी माध्यमांशी बोलताना दिली.

भीमनगर भावसिंगपुरा येथील स्मशानभूमीचे स्मशान जोगी चंद्र शेळके यांनी याबाबत प्रसिद्धी माध्यमांना माहिती



दिली की, अंत्यसंस्कार करण्यासाठी आवश्यक असलेला उष्मांक ३६०० ते ३९०० ब्रिकेट्सच्या वापरामध्ये उपलब्ध होतो. तसेच राखेचे प्रमाण कमी असते. ब्रिकेट्सचा वापर केल्यामुळे ज्वलनानंतर उत्पन्न होणाऱ्या विषारी वायु उत्पन्न होत नाही. यापूर्वी काही प्रसिद्धी माध्यमांनी माझ्या नावाने चुकीची बातमी प्रकाशित केली होती की या गट्टूमुळे अंत्यसंस्काराचे दहन बरोबर होत नाही आणि यातून दुर्गंधी निर्माण होते हे अत्यंत चुकीची बातमी आहे याचे मी खंडन करतो. गट्टू तयार करण्यासाठी शेतातील घटकांचा वापर केला जातो. उदाहरणार्थ गव्हाचा भुसा, मक्याचे कणीस, कापसाच्या फसाड्या इत्यादी याशिवाय उत्पादकांमार्फत शेतकऱ्यांकडून हे सर्व विकत घेण्यात येते तसेच ग्रामीण भागात रोजगार निर्मिती होऊन आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत होते. फक्त औरंगाबाद शहरात एका वर्षात अंत्यसंस्कारासाठी येणारे लाकडांसाठी अंदाजे १५००० झाडे तोडावे लागतात. यामुळे पर्यावरणावर परिणाम होतो. ब्रिकेटचा वापर केल्याने ही बाब टाळता येणे शक्य आहे. अंत्यसंस्कारासाठी बायोमास ब्रिकेट्स वापर करा आणि झाडे वाचवा, पर्यावरण वाचवा या मधल्या खाली ही अभिनव योजना औरंगाबाद महानगरपालिका मार्फत सुरू करण्यात आलेली आहे. महापालिकेचे तत्कालीन प्रशासक आस्तिक कुमार पाण्डेय, शहर अभियंता एस.डी. पानझडे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. पारस मंडलेचा यांच्या संकल्पनेतून ही योजना राबविण्यात येत आहे.

# बनावट लग्न फसवणूक प्रकरणाचा तपास अजूनही गुलदस्त्यातच

आधुनिक केसरी न्यूज

**कचनेर :** पैठण तालुक्यातील बालानगर येथील एका शेतकरी तरुणासोबत बनावट लग्न करून दोन लाख रुपये लुबाडूक करणारे त्या फरारी आहेत. बनावट नवरी सोबत लग्न लावून देणारे टोळीतील प्रमुख आरोपी घरापासून फरारी असून आरोपी मोकाट फिरत असल्याने पोलिसाकडून हे प्रकरण गुलदस्त्यात ठेवण्यात आले की काय अशी चर्चा तालुक्यात जोर धरत आहे.


पैठण तालुक्यातील बालनगर येथील नाना रानुजी गोडे शेतकऱ्याचा विश्वास संपादन करीत जालना जिल्ह्यातील एकाने आपल्या मुलासाठी आमच्याकडे चांगले स्थळ आहे आपण दोन लाख रुपये दिल्यास आम्ही तुमच्या मुलीचे लग्न लावून देऊ असे सांगत शपथपत्रावर त्याबाबत कराराही करून दिला. त्यानंतर पैठण येथील एक मंगल कार्यालयात नाना गोडे यांनी सर्व खर्च करीत दिनांक



२० जुलै रोजी मुलाचे लग्न निकिता सखाराम गोळे या मुली सोबत लावून दिले. माझं लग्नाच्या तिसऱ्या दिवशी नवरीच्या संशयास्पद हालचालीमुळे नवरदेव मुलाला संशय आला. कुटुंबीयांना सांगत आपली फसवणूक झालेचे निदर्शनास आणून दिले. त्यानंतर उपविभागीय पोलीस अधिकारी डॉक्टर विशाल नेहूल यांना माहिती देण्यात आली. या प्रकरणाचा तपास पैठणचे पोलीस निरीक्षक किशोर पवार यांनी केला. चौकशीत निकिता सखाराम गोळे (रा. काजळा ता. जि.जालना) ही विवाहित असून तिला एक मुलगा असल्याचे स्पष्ट झाले.

मुलांच्या वडीला कडून दोन लाख रुपये घेऊन बनावट लग्न लावून दिल्या प्रकरणी टोळीतील गणेश शंकर गाडेकर (रा.सुपारी हनुमान औरंगाबाद), शिवाजी भागोजी धनेधर (रा. रामनगर औरंगाबाद), गणेश सखाराम गोळे (रा.काजळा जालना), शेख पाशा (पूर्ण नाव व पत्ता नाही) यांच्यासह बनावट नवरी निकिता गोळे च्या विरोधात गुन्हा दाखल करीत पोलिसांनी त्यांना अटक केली होती. परंतु या टोळीतील फसवणूक करणारे चार प्रमुख वऱ्हाडी मंडळी महिनाभरापासून फरारी असून पैठणचे पोलीस उपनिरीक्षक तपास करीत आहेत. दरम्यान सदरील बनावट लग्न प्रकरणाचा तपात गुलदस्त्यात ठेवण्यात आला का अशी चर्चा तालुक्यात होत आहे.

# सुखी जीवनाचा मंत्र





डॉ. विजय दहिफळे

## हार्मोन्स - पुरुष आणि स्त्री...

आधुनिक केसरी

**5) इस्ट्रोजन :** MC रेग्युलेशन, फीमेल सेक्स ऑर्गन्स, गर्भाशयाची म्युकोसल वाढ करणे हे कार्य करते. पाळी बंद झाल्यानंतर (मेनोपॉज) इस्ट्रोजन अतिशय कमी होते व पाळी बंद होते. योनीअंग कोरडे होणे, पेन होणे, झोप आणि मूड यावर याचा परिणाम होतो.

**6) DHEA (एक्झायटेशन हार्मोन) :** यामध्ये मोठ्या प्रमाणात असलेली अण्ड्रोजन स्त्रियांमध्ये उत्तेजना, भावना तयार करण्याचे महत्त्वाचे काम करतात.

**7) टेस्टोस्टेरोन :** सेक्स ड्राईव्ह तयार करणे, डोपॅमीन, इपीनेफरीन व वासोप्नेसीन तयार करणे, सिरोटोनीन, ओपीऑईड व प्रोलॅक्टीनची मात्रा कमी करणे. ही कामं हे हार्मोन करते.

**8) हायपोगोनॅडिझम :** ३०० नॅनोग्रॅम प्रति डेसीने वाढलेल्या मात्रा यामुळे स्त्रियांमध्ये अनियमित पाळी, शरीरावर केस येण आवाजात बदल होणे, PCOD अशा समस्या उद्भवतात.

**9) वासोप्रेसीन :** कामभावना तयार करणे त्यावर लक्ष केंद्रित करणे हे यामुळे घडते. हृदय हे सुद्धा एक छोटं ब्रेन आहे.

**10) PEA (फिनाईलइथेनालामाईन) :** प्रेमात पडलं की में काम करत नाही असं म्हणतात. यात हार्मोन्सचा काही रोल आहे का ? तर होय. प्रेमात पडलेले, ते जवळ आल्यानंतर तळहाताला घाम येणे, श्वास वाढणे, वैचारिक शक्ती बदलणे, पोटात गुदगुल्या होणे अशा क्रिया घडू लागतात. फक्त प्रेयसीच्या नजरेला नजर दिली किंवा हाताचा स्पर्श झाला किंवा उत्साहवर्धक संगीत, पुस्तक वाचलं तरीही या भावना तयार होतात. PEA हे एक नैसर्गिक केमिकल असून, ते लव-मॉलिक्युल्सन तयार करते आणि हे सगळं न्यूरो ट्रान्समीटर्सच्या माध्यमातून नॉरश्पीनेफरीन, इपी नेफरीन, सिरोटोनीन, PEA, डोपॅमीन आणि विटामीन - B6 मुळे हे तयार होते. PEAR900 - डोपॅमीन आणि नॉर इपीनेफरीन हे उत्तेजना व ईच्छा तयार करते.

**(क्रमशः)**

संपर्क : डॉ. दहिफळे युरॉलॉजी ॲण्ड प्लास्टीक सर्जरी हॉस्पीटल, जिल्हा न्यायालयासमोर, अदालत रोड, बाबा पेट्रोल पंपाजवळ, औरंगाबाद, मोबा. : 9822326248, फोन 0240-2364858
Email : drvijaydahiphale@gmail.com,
Website : www.dahiphalecosmeticurology.com

# सुसाईड नोट लिहित विद्यार्थिनीने घेतला गळफास

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** देवगिरी महाविद्यालयातील मुलींच्या वसतिगृहात एका विद्यार्थीनीने शाल वापरून, सुसाईड नोट लिहीत गळफास घेतला वेदांतनगर पोलीस ठाण्यात या प्रकरणी आकस्मित मृत्यूची नोंद झाली आहे अशी माहिती पोलीस निरीक्षक सचिन सानप यांनी दिली.

आरती सर्जेराव कोल्हे (२०) रा. गुरुपिंप्री ता घनसावनगी जिल्हा जालना असे आत्महत्या केलेल्या तरुणीचे नाव आहे. वाणिज्य प्रथम वर्षात शिकत होती एक महिन्यापूर्वीच ती होस्टेलवर राहण्यास आली होती.

संध्याकाळी ५ वा. हॉस्टेलमधून वेदांतनगर पोलीस ठाण्यात आरती ने गळफास घेतल्याचा फोन आला.

घटनास्थळी पोलीस निरीक्षक सचिन सानप यांनी भेट देत मृतदेह शवविच्छेदनासाठी घाटी रुग्णालयात पाठवला.

मयत आरती ने सुससीड न म्हणून एक निबंधच लिहिला होता जीवन खूप सुंदर आहे पण टी जीवनाला कंटाळली आहे, असा उल्लेख करत आरती ने गळफास घेतला तिच्या सोबत आणखी तीन मुली राहात होत्या. त्या खाली तिची वाट पाहात थांबल्या होत्या आरती आली नाही म्हणून तिला पाहण्यास त्या खोलीत गेल्या आरती ने आतून दार लोटले होते ते उघडताच आरती छताला लटकलेली दिसली. या प्रकरणी पुढील तपास पीएसआय उत्तरेश्वर मुंढे करत आहेत.

काही गुप्त गोष्टी
कुणाला सांगता येत नाहीत

(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी,
वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व
उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)



डॉ. शेख ए.एच.

नवजीवन
आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in